*कष्टकरी जनता, भूषण भारता । वंदन करितो पददलिता ।।*

महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे नियतकालिक

संपादक
**रामचंद्र मुटाटकर**

# हाकारा (त्रैमासिक)

कार्यकारी संपादक
**ग. शां. पंडित**

**वर्ष : ३१ वे** | **जुलै–सप्टेंबर २०१०** | **अंक : तिसरा**

# अनुक्रमणिका

संपादकीय ---------------------------------------- २

**डॉ. जयवंत इंगळे यांचे लेखन–साहित्य**

१) आदिवासी समाजाची आणि अर्थव्यवस्थेची वैशिष्ट्ये ---------------- ३

२) विविध आदिवासी जमातीतील विवाह पद्धती --------------------- १३

३) आदिवासी समाजातील न्यायपंचायत ------------------------- २७

४) आदिवासी समाजातील लग्नगडी आणि घरजावई पद्धत --------------- ४३

◆ **पत्रव्यवहाराचा पत्ता**
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद
६४, आनंद पार्क, औंध,
पुणे – ४११ ००७.
दूरध्वनी : (०२०)२५८९७२९८

◆ **अक्षर जुळणी**
नंदू हि. दिघे

◆ **मुद्रण स्थळ**
ओम एंटरप्राईजेस, पुणे


◆ **मुद्रक व प्रकाशक**
रा. के. मुटाटकर
अध्यक्ष, महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद

◆ **मुखपृष्ठ**
'वारली' चित्रकला

**अंक मूल्य ४०/– रूपये**

**या अंकात व्यक्त झालेल्या लेखकांच्या विचारांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.**

या अंकास महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाने अनुदान दिले असले तरी अंकात व्यक्त झालेल्या
लेखकांच्या विचारांशी मंडळ व राज्य शासन सहमत असेलच असे नाही.



# संपादकीय

डॉ. जयवंत इंगळे यांच्या 'मोखाडा तालुक्यातील सामाजिक व आर्थिक पाहणी अभ्यास' या शोधप्रबंधावर आधारीत 'हाकारा'च्या पहिल्या जोड अंकांनंतर हा तिसरा अंक मोखाड्यातील आदिवासी समाजाची व संस्कृतीची वैशिष्ट्ये विशद करणारा आहे.

ठाणे जिल्ह्यातील 'मोखाडा' हा आदिवासी तालुका निसर्गरम्य; परंतु तेथील कुपोषणामुळे बहुचर्चित झाला आहे. कोकणा, महादेव कोळी, वारली, ढोरकोळी, कातकरी, क ठाकूर, म ठाकूर या सात आदिवासी जमाती प्रामुख्याने येथे राहतात. मोखाड्याच्या डोंगराळ भागात गाव-पाड्यांमध्ये विखुरलेल्या या जमातींपैकी प्रत्येक जमातीची वेगवेगळी वैशिष्ट्ये असली तरी भौगोलिक समानता व राहणीमानाची काही समान वैशिष्ट्ये देखील या सातही जमातींमध्ये आढळून येतात. लेखकाने त्यांच्या समाजाची व अर्थव्यवस्थेची थोडक्यात व मुद्देसूद वैशिष्ट्ये विशद केली आहेत.

ठाणे जिल्ह्यातील आदिवासी जमातींचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्ये म्हणजे येथे विविध आदिवासी जमाती एकत्र राहताना दिसतात. काही समान गोष्टी त्यांच्यात आढळत असल्या तरी प्रत्येक जमातीच्या त्यांच्या स्वत:च्या अशा काही परंपरा, प्रथा, रुढी, पध्दती त्यांनी अजूनही जपलेल्या दिसतात. उदाहरणार्थ विवाह पध्दती. ठाकूर, वारली, कोकणा, ढोरकोळी, महादेव कोळी, कातकरी इत्यादी जमातींमधील विवाहाच्या पध्दतींमध्ये अनेक बाबतीत वेगळेपण आढळून येते. त्यापैकी काही जमातींच्या विवाहपध्दतींची माहिती लेखकाने करुन दिली आहे.

'वारली' ही आदिवासींमधील एक वैशिष्ट्यपूर्ण जमात. यांची चित्रकला 'वारली आर्टस्' या नावाने आज जगभरात मान्यता पावली आहे. प्रत्येक आदिवासी जमातीला निसर्गाविषयी प्रचंड प्रेम व आदर. वारली चित्रकलेत त्याचे पदोपदी दर्शन घडते. अशा या वारल्यांची न्यायपंचायत देखील तितकीच वैशिष्ट्यपूर्ण म्हणावी लागेल. कोर्टकचेरीपेक्षाही त्यांची न्यायदान पध्दत ही गोरगरीब आदिवासींना खरोखर न्याय देणारी आहे. त्यांच्या या न्यायपंचायतीमुळेच आजही त्यांची संस्कृती टिकून असे म्हटले तर वावगे ठरू नये. काळानुरुप तिच्यात बदल अपरिहार्य असला तरी अजूनही ती त्यांच्या जीवनाशी निगडीत असल्यामुळे पुढेही ती टिकून राहावी अशी लेखकाने केलेली अपेक्षा गैर नाही.

गरिबी किंवा दारिद्र्य हा आदिवासींसाठी जणू एक शापच म्हणावा लागेल. कुपोषणाचे एक महत्त्वाचे कारण गरिबी किंवा दारिद्र्य आहेच; परंतु मनुष्य जीवनाचा अविभाज्य भाग असलेला विवाह किंवा लग्न हे देखील या दारिद्र्यामुळे आदिवासींना शापप्रदच ठरते, हे त्यांच्यातील लग्नगडी व घरजावई पध्दत पाहिल्यावर लक्षात येते. आदिवासींना वन जमिनींचा हक्क मिळाल्यावर निश्चितच या पध्दतीमध्ये बदल होईल; परंतु शासनाने त्या कायद्याची अंमलबजावणी करणे महत्त्वाचे आहे. तरच या वेठबिगारीला आळा बसू शकेल.

लेखकाने मोखाड्यातील आदिवासी समाजाची व संस्कृतीची करुन दिलेली ओळख वाचकांना निश्चितच माहितीप्रद व रंजक वाटेल. अंकाबद्दलच्या अभिप्रायांचे स्वागत आहे.

ग. शां. पंडित
कार्यकारी संपादक

# आदिवासी समाजाची आणि अर्थव्यवस्थेची वैशिष्ट्ये

**डॉ. जयवंत इंगळे**

### आदिवासी समुदायाची वैशिष्ट्ये

भारतातील ग्रामीण आणि शहरी समुदायापेक्षा आदिवासी समुदाय बऱ्याच बाबतीत निराळा आहे. मोखाडा तालुक्यातील आदिवासी समाजाची आढळून आलेली काही वैशिष्ट्ये थोडक्यात खालीलप्रमाणे दिली आहेत.

### १. जंगल व डोंगराळ भागात वास्तव्य

जंगल आणि आदिवासी या एकाच नाण्याच्या दोन बाजू वाटाव्यात एवढा या दोहोंचा एकमेकांशी घनिष्ठ संबंध आहे. आदिवासींना दाट झाडी असलेल्या ठिकाणी किंवा जंगलात आणि डोंगराळ प्रदेशात वास्तव्य करणे आवडते. ठाणे जिल्ह्यातील मोखाडा तालुक्यात जंगले आणि डोंगराळ भाग मोठ्या प्रमाणात असून बहुसंख्य आदिवासींचे वास्तव्य तेथेच आहे.

### २. लहान-मोठया पाड्यात वास्तव्य

आदिवासी जंगलात, डोंगरावर आणि डोंगराच्या पायथ्याला छोटे-छोटे पाडे वसवून राहतात. चार घरांपासून वीस ते बावीस घरांचा एक पाडा असतो. एकाच विशिष्ट ठिकाणी वसलेल्या थोड्या घरांचा एक समूह म्हणजे पाडा होय. एक पाडा दुसऱ्या पाड्यापासून पाव किलोमीटर ते तीन किलोमीटर एवढ्या अंतरावर असतो. अशा प्रकारे आदिवासींचे पाडे सर्वत्र विखुरेलेले असतात. एका ग्रामपंचायतीत दहा ते बारा पाडे आढळतात.

### ३. साधी व लहान घरे

जंगलातील बांबू, गवत, सागाच्या झाडाची पाने इत्यादीपासून तयार केलेल्या झोपडीवजा घरात आदिवासी राहतात. अशी घरे प्रामुख्याने गरीब आदिवासींची आहेत. काही आदिवासींच्या झोपड्यांवर शासनाने दिलेली कौले आढळून येतात. सधन आदिवासींची घरे सिमेंट, विटांची व पक्की असतात.

### ४. किरकोळ मालमत्ता

बहुसंख्य आदिवासी गरीब असल्याने थोडी भांडी, दोन-चार दिवस पुरेल एवढे धान्य, एक-दोन कोंबड्या, एखादी भाकड गाय एवढीच मालमत्ता घरात असते. सधन आदिवासीकडे बऱ्यापैकी मालमत्ता असते. परंतु अशा कुटुंबांचे प्रमाण खूपच कमी आहे.

### ५. हिंदू धर्मीय

अभ्यास केलेल्या मोखाडा तालुक्यातील सर्व आदिवासींवर हिंदू धर्माचा प्रभाव अधिक आहे. ख्रिश्चन किंवा अन्य धर्माचा प्रभाव त्यांच्या जीवन पद्धतीवर पडलेला नाही. तसेच धर्मांतराचा प्रश्नही तेथे निर्माण झालेला नाही. शिवसेना, भा.ज.पा.सारखे हिंदूवादी पक्ष तेथे सक्रिय आहेत. कदाचित यामुळेच ख्रिचन मिशनरी धर्मांतराच्या उद्देशाने आदिवासी भागात येत नसावेत.

### ६. देव धर्मावर विश्वास

सर्वच आदिवासी आस्तिक असून देव, धर्मावर विश्वास ठेवणारे आहेत. आदिवासींच्या स्वतःच्या अशा देव देवता आहेत. उदाहरणार्थ वाघदेव, हिमाई इत्यादी त्यांचे देव आहेत. आदिवासी आपल्या देव-देवतांबरोबरच बिगर आदिवासी हिंदुंचे देव सुद्धा पूजतात. राम, कृष्ण, विष्णू, लक्ष्मी, शंकर, पार्वती यांची चित्रे आदिवासींच्या झोपडीत आता सर्रास दिसतात.

### ७. पितृसत्ताक जमाती

मोखाडा तालुक्यात ज्या विविध आदिवासी

जमाती आढळतात त्या सर्व पितृसताक आहेत. म्हणजे या जमातीत आडनाव वडिलांचे लावले जाते. पितृसत्ताक पद्धती असली तरी आदिवासी स्त्री सुद्धा पुरूषांच्या बरोबरीने किंबहुना त्याहीपेक्षा जास्त काबाडकष्ट करत असते. त्यामुळे स्त्रियांना कुटुंबात प्रतिष्ठा असते.

### ८. वेषभूषा

आदिवासी स्त्री-पुरूषांचा वेष बिगर आदिवासींच्या तुलनेत खूपच वेगळा आणि वैशिष्ट्यपूर्ण आहे. आदिवासी स्त्रिया रंगीबेरंगी-उदाहरणार्थ लाल, हिरव्या आणि पिवळ्या भडक रंगाच्या कापडांना अधिक पसंती देतात. स्त्रिया अंगावर लुगड्याप्रमाणे जे कापड वापरतात त्यास फडकी असे म्हणतात. सण, जत्रा, विवाह याव्यतिरिक्त त्यांच्या अंगावर जुनी किंवा जीर्णच फडकी असतात. आता काही शिकलेल्या आणि नोकरदार आदिवासी पुरूषांच्या बायका बिगर आदिवासीप्रमाणे सहावारी गोल साड्या वापरू लागल्या आहेत. परंतु त्यांचे प्रमाण नगण्यच आहे. आदिवासी पुरूष पांढऱ्या कपड्यांना तसेच कमी रंगीत कपड्यांना प्राधान्य देतात. वृद्ध आदिवासी लंगोटी वापरतात. सुशिक्षित आदिवासी विजार किंवा पँटला पसंती देतात.

### ९. स्वतंत्र बोली भाषा

प्रत्येक आदिवासी जमातीची स्वतंत्र अशी बोलीभाषा आहे. परंतु बोली भाषेला लिपीचे रूप देण्यात आलेले नाही. आदिवासी बोलीभाषा मराठीच आहे. परंतु त्यांचे उच्चार आणि काही शब्द वैशिष्ट्यपूर्ण वाटतात. उदाहरणार्थ आदिवासी मुलग्याला 'पोशा' म्हणतात. मुलगीला 'पोशी' म्हणतात. वृद्ध पुरूषाला 'डवऱ्या' म्हणतात. वृद्ध स्त्रीला 'डवरी' म्हणतात. छोट्या आकाराच्या (रूंदीच्या व उंचीच्या) पाण्याच्या विहिरींना 'बुडके' म्हणतात. रानात राखणीसाठी जी छोटीशी झोपडी बांधलेली असते तिला 'भोंगी' असे म्हणतात.

### १०. नातेसंबंध

आदिवासींचे बहुसंख्य नातेवाईक किंवा पै-पाहुणे ते राहत असलेल्या पाड्यावर, पाड्याच्या आसपास किंवा गावातच असतात. वाहतुकीच्या साधनांची प्रगती झाली असली तरी नातेवाईक तालुक्यातील किंवा जास्तीत जास्त आजुबाजूच्या तालुक्यातील असतात. बहुसंख्य आदिवासी शेजारच्याच गावात आपल्या मुली देतात. तसेच गावातच अगदी घराशेजारीसुद्धा मुली देतात. त्यामुळे नातेवाईक दूर अंतरावर नसतात.

### ११. विवाह पद्धती

आदिवासी आपल्या जमातीतच विवाह करतात. जमातीबाहेर विवाह करणे गुन्हा मानतात. बहुतेक आदिवासी युवक युवती स्वत:चा जोडीदार स्वत:च निवडतात. जत्रा, उत्सव, शाळा, महाविद्यालये ही जोडीदार निवडण्याची केंद्रे आहेत. काही आदिवासी जमातीमध्ये 'मेढिंगा' आहेत. मेढिंगा म्हणजे लग्न लावण्याचा विधी करणाऱ्या आदिवासी समाजातील व्यक्ती होत. हे मेढिंगा लग्नाचे विधी करतात. वारली जमातीत लग्नाचे विधी करणाऱ्या स्त्रीस 'धवलेरीण' असे म्हणतात. काही आदिवासी जमातीत ब्राह्मणाक डूनही लग्ने लावली जातात.

### १२. साधा आहार

आदिवासींचा आहार त्यांच्या परिस्थितीनुसार साधाच असतो. जेव्हा मजुरीची कामे सुरू असतात म्हणजे हातात पैसे असतात तेव्हा त्यांच्या आहारात नागली किंवा तांदळाची भाकरी, भात, तूरडाळीचे किंवा उडदाचे वरण इत्यादी पदार्थ असतात. आहारात आठवडयातून दोन-चार वेळा सुके मासे असतात, तसेच ओले मासेही असतात. सर्व प्रकारची मासळी आदिवासी आवडीने खातात. घरात पाळलेल्या कोंबडीचे मटण, अंडी इत्यादी महिन्यातून-दोन महिन्यातून एकदा आहारात

असतात. बहुसंख्य गरीब आदिवासी कोंबडी, अंडी विकूनच टाकतात. त्यांचा उपभोग घेत नाहीत. कातकरी, ढोरकोळी इत्यादी जमातीतील आदिवासी सर्व प्रकारचे पशु-पक्षी मिळेल तेव्हा खातात. आदिवासींच्या आहारात दूध आणि फळांचा अभावच असतो. आदिवासीप्रमाणे जनावरांचीही वर्षातील सहा महिने उपासमार होत असल्याने जनावरे अशक्त असतात. पावसाळ्यात दोन-तीन महिनेच जनावरे दूध देतात. गरिबीमुळे हे दूध आदिवासी विकून टाकतात. जांभळे, आंबे इत्यादी फळे सुद्धा उपभोग न घेता विक्री करतात. गाई, म्हशी प्रमाणे शेळयाही अशक्त असतात. त्यांचे दूध त्यांच्या पिलांनाच पुरत नाही. उपासमारीच्या काळात आदिवासींच्या आहारात भाकरी, भाताचे प्रमाण खूपच कमी असते. तर रानभाज्या, कडू कंद जास्त प्रमाणात असतात.

### १३. उत्सवप्रियता

आदिवासी भागात लहान-मोठ्या यात्रा किंवा बोहाड्यासारखे उत्सव साजरे होत असतात. आपले दु:ख व दारिद्र्य विसरून आदिवासी अशा उत्सवात आनंदाने सहभागी होतात. तालुक्याच्या ठिकाणी साजऱ्या होणाऱ्या बोहाड्यासारख्या उत्सवात आदिवासी १५ ते २० किलोमीटर अंतर पायी चालत येतात. आदिवासी मुली, विवाहित स्त्रिया अशा उत्सवाच्या वेळी डोक्यात जंगली फुलांच्या माळा किंवा प्लॅस्टिकच्या परंतु दिसावयास सुंदर व आकर्षक असणाऱ्या मोत्यांच्या माळा आणि रंगीबेरंगी पारंपरिक फडकी गुडघ्यापर्यंत नऊवारी साडीप्रमाणे नेसून उत्साहाने जत्रा-यात्रात सहभागी होत असतात. आदिवासी पुरूषही आपल्या लहान लेकरांना डोक्यावर, खांद्यावर बसवून आनंद लुटत असतात.

### १४. नृत्य, चित्रकला आणि संस्कृती

आदिवासींचे नृत्य आणि चित्रकला इत्यादी बाबी वैशिष्ट्यपूर्ण आहेत. विवाह प्रसंगी तसेच अन्य शुभप्रसंगी आदिवासी स्त्री-पुरूष एकत्र नृत्य करतात आणि हास्यविनोद करीत आनंदाची उधळण करतात. विविध आदिवासी जमातीपैकी वारली आदिवासींची चित्रकला तर जगभर प्रसिद्ध आहे. आदिवासी स्त्रिया, मुली अगदी सहजपणे झोपडीच्या शेणाने सारवलेल्या भिंतीवर सुंदर सुंदर चित्रे काढतात. आदिवासी पुरूष काही वाद्ये स्वत: तयार करतात आणि उत्कृष्टपणे वाजवतात.

आदिवासींची स्वत:ची अशी वेगळी संस्कृती असून स्थलांतराच्या आणि इतर माध्यमातून बिगर आदिवासींच्या सतत संपर्कात येऊनही त्यांनी आपली संस्कृती टिकवून धरली आहे. आपल्या संस्कृतीचा आणि पिढ्यान्‌पिढ्या चालत आलेल्या प्रथा परंपरांचा आदिवासींना मोठा अभिमान वाटतो. आदिवासींची गाणी, लोककथा इत्यादी वैशिष्ट्यपूर्ण असून निसर्ग, पशु-पक्षी, देव-देवता यांचा त्यात उल्लेख आढळतो. या सर्वांवरून तसेच त्यांचे सण, उत्सव इत्यादीवरून त्यांच्या वैशिष्ट्यपूर्ण संस्कृतीचा वेगळेपणा नजरेत भरतो.

### १५. जीवनविषयक तत्वज्ञान

आदिवासींचे स्वत:चे असे जीवनविषयक तत्त्वज्ञान असून ते समजण्यास अगदी साधे आणि सोपे असे आहे. साधी जीवन पद्धती हे आदिवासींचे ठळक वैशिष्ट्य आहे. आनंदाने, मजेने जगावे असे त्यांचे तत्त्वज्ञान आहे. उद्याची चिंता करणारे आदिवासी खूप कमी आहेत. काही आदिवासींच्या घरी दुसऱ्या दिवशी लागणारे धान्य सुद्धा नसते. नोकरदार आदिवासी मात्र आपल्या व कुटुंबियांच्या भवितव्याची चिंता करतात. त्यासाठी ते बचत करतात. मुलांना चांगले शिक्षण देतात.

### १६. निसर्गाशी एकरूपता

निसर्गाशी एकरूप होऊन जीवन जगणे हा एक आदिवासींचा गुण विशेष आहे. आदिवासी आपल्या जीवनातील अनेक बाबी निसर्गाशी जोडण्याचा प्रयत्न

करतात. मुलाखतीदरम्यान एका वृद्ध आदिवासीला त्याच्या वयाबद्दल विचारले तेव्हा त्याने आपले वय संख्येत न सांगता 'बांबूची दीड विंधी खाल्ली' असे सांगितले. विंधी म्हणजे बांबूच्या झाडाला साठ वर्षातून एकदा येणारे विशिष्ट प्रकारचे फळ होय. दीड विंधी खाणे किंवा पाहणे म्हणजे नव्वद वर्षे वय पूर्ण झालेले असणे होय. अशा प्रकारे निसर्गातील झाडे, पाने, फुले यांच्याशी आदिवासी एकरूप झालेले असतात.

**१७. औषधी वनस्पतींचे ज्ञान**

भगतांबरोबरच बहुसंख्य आदिवासींना काही औषधी वनस्पतींचे ज्ञान असते. अनेक आदिवासी कुटुंबांकडे सर्पदंश, विंचू दंश, ढाळ-वांती, खोकला इत्यादीवर औषधी वनस्पती असतात. निसर्गातील विविध वनस्पती किंवा पाने, फुले यांचे औषधी महत्व अनेक आदिवासींना ठाऊक आहे.

**१८. भगतांचे अस्तित्व**

भगतांचे अस्तित्व हे आदिवासी समाजाचे ठळक वैशिष्टय आहे. आदिवासी लोक अजूनही भगतांना पूज्य मानतात. मंत्र-तंत्र, अंगारा, जंगलातील वनस्पती, कोंबडया-बकऱ्यांचा बळी इत्यादी माध्यमातून भगत विविध आजार बरे करू शकतो अशी आदिवासींची समजूत आहे.

**१९. अंधश्रद्धाळूपणा**

आदिवासी अंधश्रद्धाळू असून त्यांच्यात अधंश्रद्धांचे प्रमाण खूप आहे. भूत, भानामती, करणी, जादूटोणा, मंत्र-तंत्र इत्यादींवर बहुसंख्य आदिवासींचा विश्वास आहे. शाळा, महाविद्यालयात शिक्षण घेतलेले आदिवासी युवक सुद्धा विविध अंधश्रद्धावर विश्वास ठेवतात.

**२०. दारूला महत्वाचे स्थान**

दारू पिण्याला आदिवासींच्या जीवनात फार पूर्वीपासून महत्त्वाचे स्थान आहे. काळा गूळ, मोहाची फुले यापासून आदिवासी दारू तयार करतात. काही आदिवासी घरीच दारू तयार करतात. तर काही आदिवासी अन्य आदिवासीकडून दारू विकत घेतात. कातकरी, ढोरकोळी, वारली, ठाकूर या जमातीतील स्त्रिया सुद्धा दारू पितात. दारू हा आहारातील एक घटकच मानला जातो. दारू पिणे आदिवासींना कमीपणाचे वाटत नाही. आदिवासी समाजातील जन्म, लग्न, मृत्यू इत्यादी सर्व समारंभ दारूशिवाय साजरेच होत नाहीत.

**२१. शिकारी वृत्ती**

शिकारीचा आनंद लुटणे हा आदिवासींचा आणखी एक गुणविशेष आहे. आदिवासीमधील शिकार करण्याची पूर्वीची वृत्ती अद्यापही संपूर्णपणे नष्ट झालेली नाही. अर्थात सर्वच आदिवासी शिकार करत नाहीत. ससा,भेकर इत्यादी प्राण्यांची ते अधून-मधून सामूहिक शिकार करतात. शिकार केल्याने हरिण, भेकर इत्यादी सर्व प्राणी नष्ट झाल्याचे आदिवासींनीच सर्व्हेक्षणाच्या वेळी सांगितले. त्यामुळे आता शिकार जवळ जवळ मिळतच नाही. तरी केवळ आनंद मिळावा आणि थोडी पोटाची भूक भागावी म्हणून चोरून,लपून शिकार केली जाते. पूर्वी ज्याप्रमाणे आदिवासींची जास्तीत जास्त उपजीविका शिकारीवर होत असे तशी परिस्थिती आता राहिलेली नाही. शिकार मिळत नसल्याने आणि शिकारीवर बंदी असल्याने शिकार हे उदरनिर्वाहाचे साधन आता राहिलेले नाही. परंतु ससे, पक्षी, मासे यांची शिकार अधून-मधून केली जाते.

**२२. भटकी वृत्ती**

वर्षातील काही दिवस बहुसंख्य आदिवासींना आजही शेकडो मैल उदरनिर्वाहासाठी भटकंती करावी लागते. सर्वच जमातीतील आदिवासींना वर्षातील काही दिवस पोटापाण्यासाठी आपला भूभाग सोडून दूरवर भटकावे लागते. कातकरी जमातीतील बहुसंख्य

आदिवासी वर्षातील आठ महिन्यांपेक्षा जास्त काळ स्थलांतर करतात.

**२३. भिकाऱ्यांचा अभाव**

आदिवासी समुदायाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे आदिवासीमध्ये भिकारी आढळत नाहीत. आदिवासी उपाशी राहणे पसंत करतात; परंतु भीक मागत नाहीत.

**२४. सहकार्य वृत्ती**

एकमेकांना सहकार्य करून एकोप्याने आनंदी वृत्तीने जीवन जगत राहणे हा आदिवासींचा आणखी एक गुण विशेष आहे. उदाहरणार्थ गावात किंवा पाड्यावर कोणी घर बांधवयास काढले तर पाड्यावरचे अन्य आदिवासी त्याला घर बांधण्यास मदत करतात. त्याच्या घर बांधणीसाठी फुकट श्रम करतात. तसेच घरासाठी लाकूड किंवा अन्य बाबी एकमेकांना विनामूल्य देऊन मदत केली जाते. घराच्या बांधकामाला मदत करण्यासाठी गावातील आबालवृद्ध मोठ्या हौसेने सहभागी होत असतात. यामध्ये तरूण आदिवासींचा भरणा मोठा असतो. कोणताही मोबदला न घेता मौज मजा, हास्य-विनोद करीत घरबांधणी, विवाहाचे कार्यक्रम, पिकांची मळणी किंवा झोडणी इत्यादी बाबतीत एकमेकांना ते मदत करतात.

**२५. कष्टाळूपणा**

कष्टाळू वृत्ती हा आदिवासींचा आणखी एक गुणविशेष आहे. दिवस उगवल्यापासून सूर्य मावळेपर्यंत उन्हा-पावसात, चिखलात आदिवासी राबत असतात. त्यांची वृत्ती कष्टाळू असली तरी अतिवृष्टी, रोगराई यामुळे त्यावर मर्यादा पडतात. तसेच कष्ट करण्याची तयारी असूनही पुरेशी कामे मिळत नसल्याने काही काळ त्यांना कामाशिवाय बसून राहावे लागते.

**२६. शौचास पाणी वापरणाऱ्यांचे कमी प्रमाण**

आजही कित्येक आदिवासींना शौचास पाणी वापरणे आवडत नाही. आदिवासींच्या मते शौचास ब्राह्मणांनी पाणी वापरायचे असते. आदिवासींनी पाणी वापरायचे नसते. आश्रमशाळेत शिकणारे बहुसंख्य विद्यार्थीसुद्धा पाणी वापरत नाहीत असे सर्व्हेक्षणात आढळले. एका आश्रमशाळेत तर विद्यार्थ्यांना शौचासाठी पाण्याची डबडीसुद्धा पुरवली नसल्याचे आढळले. विद्यार्थ्यांनी शौचासाठी पाण्याचा वापर करावा यासाठी आम्ही राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबीरातील राहिलेल्या पैशातून तसेच एकमेकांकडून वर्गणी काढून पाण्याची डबडी विकत घेऊन संबंधित आश्रमशाळेला दिली. परंतु या डबड्यांचा व पाण्याचा वापर विद्यार्थ्यांनी केला नाही असे तेथील शिक्षकांनी नंतर सांगितले.

**२७. आत्महत्यांचे नगण्य प्रमाण**

बिगर आदिवासींच्या तुलनेत आदिवासी समाजात आत्महत्या करणाऱ्यांचे प्रमाण जवळ जवळ शून्य आहे. सरकारकडून, समाजाकडून आणि आपल्या मुला-बाळाकडून किंवा कुटुंबियांकडून आदिवासींच्या काही अपेक्षा नसतात. तसेच फार महत्त्वाकांक्षा नसल्यामुळे आणि त्या अपूर्ण राहण्याचा प्रश्न नसल्यामुळे नैराश्य निर्माण होत नाही. उपासमार आणि बेकारीचा काळ आदिवासी शांतपणे व्यतीत करतात. संकटांना घाबरून आत्महत्या करण्याची इच्छा आदिवासींना होत नाही. कर्जाच्या ओझ्याखाली दबल्यामुळे आणि पीक-पाणी व्यवस्थित न आल्यामुळे हजारो बिगर आदिवासी शेतकऱ्यांनी राज्यात आत्महत्या केल्या आहेत; परंतु या बिगर आदिवासी शेतकऱ्यांपेक्षा भीषण परिस्थितीला दरवर्षी तोंड द्यावे लागत असूनही एकाही आदिवासीने आत्महत्या केली नसल्याचे सर्व्हेक्षणात आढळले. ज्या दोन आदिवासींनी आत्महत्या केल्या त्यापैकी एकाने

दारूच्या नशेत तर एका स्त्रीने वेडाच्या भरात आत्महत्या केली होती..

### २८. मुलग्याचा हव्यास

आदिवासीसुद्धा बिगर आदिवासीप्रमाणे मुलगा आणि मुलगी यामध्ये फरक करतात. कुटुंबात एकतरी मुलगा असावा असे प्रत्येक आदिवासी कुटुंबाला वाटते. परंतु मुलाच्या हव्यासापोटी स्त्री भृण हत्या किंवा गर्भपात केले जात नाहीत.

### २९. स्त्रियांचा दर्जा

आदिवासी समाजात स्त्रियांना चांगला दर्जा आहे. बहुतके सर्व स्त्रिया पुरूषांच्या बरोबरीने कष्ट करून उत्पन्न मिळवतात. बाजारहाट करण्याचे व खर्च करण्याचे स्वातंत्र्य स्त्रियांना असते. जत्रा किंवा बोहाडा सारख्या उत्सवात स्त्रिया पुरूषांच्या बरोबरीने भाग घेतात. वरपक्षाकडून वधू पक्षाला हुंडा दिला जातो. बायको मिळवण्यासाठी गरीब आदिवासींना खूप कष्ट करावे लागतात. नवविवाहित स्त्रियांचा छळ केला जात नाही. काही जमातीतील स्त्रियासुद्धा पुरूषांचा बरोबरीने दारू पितात, तंबाखू खातात. काही स्त्रियांना मात्र आपल्या नवऱ्याच्या व्यसनांचा त्रास सहन करावा लागतो.

### ३०. भिन्न सामाजिक दर्जा


एकाच प्रदेशात किंवा गावात राहणाऱ्या विविध आदिवासी जमातींचा सामाजिक दर्जा वेगवेगळा आढळतो. विविध जमाती एकमेकांना श्रेष्ठ-कनिष्ठ मानतात. त्यामुळे कनिष्ठ समजल्या जाणाऱ्या ढोरकोळी आणि कातकरी या जमातींच्या झोपड्या गावाबाहेर असतात किंवा स्वतंत्र पाडे वसवून या जमाती अन्य जमातीपासून दूर राहतात.

### ३१. गुन्हयांचे स्वरूप

बिगर आदिवासी समाजाप्रमाणे आदिवासी समाजातही काही लोक गुन्हेगारी प्रवृत्तीचे आढळतात. परंतु बलात्कार, चोऱ्या, खून, मारामाऱ्या यांचे प्रमाण बिगर आदिवासींच्या तुलनेत खूप कमी आहे. बायकोला न नांदवणे, नवरा व मुलेबाळे सोडून विवाहित स्त्रियांचे पळून जाणे अशा स्वरूपाचे गुन्हे आदिवासी समाजात आढळतात.

### ३२. अध्यात्माकडे ओढा

गेल्या काही वर्षांपासून विविध जमातीतील आदिवासी अध्यात्माकडे वळू लागले आहेत. यामध्ये अतिमागास समजल्या जाणाऱ्या कातकरी जमातीतील आदिवासीही आहेत. ते त्यांच्या भागात येणाऱ्या बिगर आदिवासी महाराजांच्या प्रवचनालाही नियमितपणे जात आहेत. प्रवचन, कीर्तनामुळे काही आदिवासी माळकरी झाले आहेत. दरवर्षी काही आदिवासी गळ्यात माळ



घालत आहेत. माळ घातलेल्या आदिवासींनी दारू, मटण, मासे, तंबाखू खाण्याचे पूर्णपणे बंद केले आहे. परंतु अशा माळकरी आदिवासींचे प्रमाण एकूण आदिवासींमध्ये अत्यंत नगण्य असे आहे.

अशा प्रकारे आदिवासींचे आर्थिक आणि सामाजिक जीवन बिगर आदिवासीपेक्षा वेगळे आणि वैशिष्ट्यपूर्ण आहे. आदिवासी भागात सरकार, बिगर आदिवासी व्यापारी, नोकरदार यांचे प्राबल्य दिवसेंदिवस वाढत असूनही आदिवासी समाजाचे रूपांतर बिगर आदिवासी समाजात होऊ शकलेले नाही. पैसा, पोलीस आणि न्यायालये यांचे जाळे आदिवासी भागात निर्माण होऊनसुद्धा आदिवासी टिकून आहेत. तसेच आदिवासींची संस्कृतीही टिकून आहे. आदिवासी समाजात बदल घडून येण्याचा वेग अत्यंत कमी आहे. आदिवासी समाजाच्या दारावर बाह्य जगाची संस्कृती धडका मारत असली तरी या संस्कृतीपासून स्वत:ला वाचवण्यात आदिवासींनी चांगले यश मिळवले आहे.

## आदिवासींच्या अर्थव्यवस्थेची लक्षणे

मोखाडा तालुका हा आदिवासी बहुल तालुका असून तालुक्यातील आदिवासी लोकसंख्येचे प्रमाण ९३ टक्केपेक्षा जास्त आहे. या तालुक्यातील आदिवासींच्या आर्थिक व सामाजिक पाहणीतून आदिवासींच्या अर्थव्यवस्थेची आढळून आलेली काही वैशिष्ट्ये थोडक्यात खालीलप्रमाणे स्पष्ट केली आहेत.

### (१) कृषी आधारित अर्थव्यवस्था

अभ्यासक्षेत्रातील मोखाडा तालुक्यातील आदिवासींची अर्थव्यवस्था ही कृषी आधारित अर्थव्यवस्था आहे. सर्व्हेक्षण केलेल्या ४२० आदिवासी कुटुंबांपैकी नोकरदार कुटुंबांचे प्रमाण अवघे ५.४७ टक्के इतके आहे. उर्वरित ९४.५३ टक्के कुटुंबे उपजीविकेसाठी आणि रोजगारासाठी कृषी क्षेत्रावर अवलंबून आहेत. यामध्ये भूमिहीन आणि भूमिधारी दोन्ही प्रकारची कुटुंबे आहेत. मोखाडा तालुक्यात कारखानदारी क्षेत्र अस्तित्वात नाही. तसेच सेवा क्षेत्रात बिगर आदिवासींचाच भरणा जास्त आहे. सेवा क्षेत्रात नोकरीसाठी आवश्यक असलेले शिक्षण आणि प्रशिक्षण घेतलेल्या आदिवासींचे प्रमाण कमी असल्याने आणि तृतीय व चतुर्थ श्रेणीच्या पदावर काम करण्याची पात्रता असूनही काही युवकांना त्या पदावर संधी न दिली गेल्याने सुद्धा सेवा क्षेत्रात आदिवासींचे प्रमाण कमी आहे. म्हणून बहुसंख्य (९४.५३टक्के) आदिवासी कुटुंबे प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या शेती व्यवसायावर अवलंबून आहेत. तसेच ज्या २२ कुटुंबातील २३ व्यक्ती नोकरदार आहेत त्या २२ कुटुंबातील अन्य सदस्य (भाऊ,बहिणी इत्यादी) उपजीविकेसाठी आणि रोजगारासाठी शेतीवरच अवलंबून आहेत.

### (२) साध्या पद्धतीची शेती

आदिवासी आपली शेती साध्या पद्धतीने करतात. म्हणजे रोपे तयार करण्यासाठी जमिनीवर पालापाचोळा, काटक्या, झाडाच्या फांद्या, शेणाचे वाळलेले गोळे पसरतात आणि ते सर्व जाळून टाकतात. त्याच्या राखेत बियाणे पेरतात. बियाणेही संकरित नसतात. तर घरी साठवलेले देशी बियाणे असते. शेतीत कोणतीही खते आदिवासी घालत नाहीत.

### (३) साधी अर्थव्यवस्था

साधी अर्थव्यवस्था हे सुद्धा आदिवासी समाजाचे एक ठळक वैशिष्ट्य आहे. शेतीसाठी लागणारी हत्यारे, अवजारे आदिवासी स्वत: तयार करतात. आदिवासी समाजात लोहारकी, सुतारकी इत्यादी व्यवसाय करणारेही आढळतात. हे आदिवासी बैलगाडी, विळे, नांगर इत्यादी अवजारे अगदी उत्कृष्ट बनवतात. काही आदिवासी शेतकरी सुद्धा स्वत: काही लाकडी अवजारे बनवतात.

शिकारीची साधने उदाहरणार्थ मासे पकडण्याचे जाळे, धनुष्यबाण इत्यादी स्वत: तयार करतात. अनेक आदिवासी स्त्रियांना वरई तयार करण्याचे जाते बनवण्याची कला अवगत आहे.

### (४) मर्यादित गरजा

मर्यादित गरजा हे सुद्धा आदिवासी समाजाचे एक लक्षण आहे. बिगर आदिवासींच्या तुलनेत आदिवासींच्या गरजा खूपच मर्यादित असतात. अपुरे उत्पन्न हे त्यामागचे प्रमुख कारण आहे. चप्पल ही महत्त्वाची गरज असली तरी तिच्या शिवाय जंगलात जाताना, बाजारहाट करताना आदिवासी दिसतात. अंथरूण पांघरूणाचा विचार केला तर गरीब-सधन सर्वच आदिवासी जुन्या कपड्यांच्या सहाय्याने या वस्तू तयार करतात. स्थलांतरामुळे शहरातील जीवनाची किंवा बाह्य जगाची तोंड ओळख होऊनही आदिवासींच्या गरजा वाढलेल्या नाहीत. एखादा रेडिओ किंवा ट्रान्झिस्टर आदिवासींच्या झोपडीत आढळतो. तर बऱ्यापैकी स्थिती असलेल्या आदिवासींच्या घरात दूरदर्शन आढळतो. परंतु अशा आदिवासी कुटुंबांची संख्या शंभरात दोन-चार एवढीच आहे. तालुक्यातील मोठ्या गावापासून किंवा बाजारपेठेपासून दूर, दुर्गम भागात वास्तव्य करणारे तसेच अति गरीब आदिवासी स्वत:च्या बहुसंख्य गरजा स्वत:च किंवा स्वत:च्या भागातच भागवतात.

आपल्याला लागणारी तूर, मिरची, नागली, तांदूळ इ. पिके घेऊन केवळ मीठ विकत आणणारी आदिवासी कुटुंबेही आहेत. कारण गरीबीमुळे आणि दुर्गमतेमुळे (डोंगराळ भाग, जंगल भाग) आदिवासी सतत मोठ्या गावात येऊ शकत नाहीत. चार-सहा महिने पुरले एवढे मीठ खरेदी करण्यासाठी ते तालुक्याच्या ठिकाणी किंवा मोठ्या गावात येतात. काही आदिवासी इतके गरीब आहेत की ते काडीपेटीसुद्धा विकत घेऊ शकत नाहीत. ते गारेच्या दगडाने बिडी पेटवतात किंवा विस्तव तयार करतात. तसेच विस्तवासाठी अनेक दिवस लाकूड पेटते ठेवतात. अन्न, वस्त्र, निवारा या प्राथमिक गरजा आपल्या उत्पन्नातून पूर्ण करू न शकणाऱ्यांचे प्रमाण मोठे आहे.

### (५) वस्तुविनिमयाची पद्धती

वस्तुविनिमयाची पद्धती आदिवासी समाजात फार पूर्वीपासून अस्तित्वात आहे. आदिवासी भागात सध्या पैशाच्या सहाय्याने विक्रीचे व्यवहार मोठ्या प्रमाणावर होत असले तरी वस्तुविनिमयाची पद्धती पूर्णपणे लोप पावलेली नाही. तालुक्याच्या डोंगराळ किंवा दुर्गम भागात राहणारे काही आदिवासी अद्यापही वस्तू-वस्तूमध्ये व्यवहार करणे पसंत करतात. पैशापेक्षा या पद्धतीने व्यवहार करणे त्यांना अधिक फायद्याचे वाटते. त्यामुळे हजारो वर्षांपासून चालत आलेली वस्तू विनिमयाची पद्धती आजही थोड्या प्रमाणात टिकून आहे. आदिवासी आपल्याकडील काही वस्तू उदाहरणार्थ डिंक, अंबाडी, मोहाची फुले इत्यादी वस्तू व्यापाऱ्यांना देतात आणि त्या बदल्यात बटाटे, लसूण इत्यादी मिळवितात. कोणत्या वस्तूच्या बदल्यात कोणत्या वस्तू द्यावयाच्या व त्या किती प्रमाणात द्यावयाच्या हे व्यापारी व आदिवासी यांच्यात ठरते. उदाहरणार्थ एक भाग डिंक=चार भाग बटाटे असे प्रमाण ठरले असेल तर एका तराजूमध्ये आदिवासींचा डिंक ठेवला जातो आणि दुसऱ्या तराजूत दुकानदार आपले बटाटे ठेवतात. आणि चार वेळा बटाटे वजन करून आदिवासींना दिले जातात. बटाट्याच्या तुलनेत आदिवासीकडील डिंक ही वस्तू अधिक किंमतीची असल्याने डिंकाच्या चारपट बटाटे आदिवासींना मिळतात. अशा प्रकारे डिंक, मध आणि जंगलातील इतर उत्पादने आदिवासी तालुक्याच्या ठिकाणी किंवा आठवडी बाजारात घेऊन येतात व त्या बदल्यात आपणास आवश्यक असलेल्या वस्तू मिळवतात.

## (६) शहराचा अभाव

महाराष्ट्राच्या आदिवासी भागात जशी काही शहरे आढळून येतात त्याप्रमाणे मोखाडा तालुक्यात एकही शहर नाही. शहराचा अभाव हे मोखाडा तालुक्याच्या अर्थव्यवस्थेचे ठळक वैशिष्ट्य आहे. तालुक्यातील सर्व शंभर टक्के आदिवासी बिगर शहरी भागात राहतात.

## (७) आठवडी बाजार

तालुक्याच्या ठिकाणी आणि काही मोठ्या गावात आठवडी बाजार भरतात. या बाजारात तालुक्यातील बहुसंख्य आदिवासी माल खरेदीसाठी येतात. काही आदिवासी रानभाज्या बाजारात विक्रीसाठी आणतात. आदिवासी बाजारात कपडे, सुके मासे, चिरमुरे, भजी, शेव इत्यादी खरेदी करतात.

## (८) कच्चा माल

आदिवासी जे उत्पादन करतात त्याचे स्वरूप कच्चा माल असेच आहे. खुरासणी (काराळे), भात, वरई इत्यादी उत्पादने आदिवासी घेतात. मोठ्या गावात भातापासून तांदूळ तयार करणाऱ्या गिरण्या असून तेथे आदिवासी तांदूळ करण्यासाठी आपला भात घेऊन येतात. भात, वरई प्रमाणे नागलीसुद्धा क ांडल्याशिवाय खाण्यालायक बनत नाही.

## (९) श्रम प्रधान उत्पादन तंत्र

शेतमालाचे उत्पादन करण्यासाठी आदिवासी मोठ्या प्रमाणात श्रमाचाच उपयोग करतात. मानवी श्रम आणि जनावरांच्या साहय्याने उत्पादन घेतले जाते. लाकडी नांगर, खुरपे, विळे, कुऱ्हाड, खोरी किंवा फावडी इत्यादी अवजारांचा शेतीत उपयोग केला जातो.

## (१०) छुपी सावकारी

मोखाडा तालुक्यात छुपी सावकारी मोठ्या प्रमाणात आहे. दुकानदार, नोकरदार, सधन आदिवासी शेतकरी इत्यादी सावकारी करतात. भरमसाठ व्याजाने कर्ज देऊन गरीब आदिवासींची मोठी पिळवणूक करतात. त्यांचे व्याजाचे दर ५० टक्क्यापासून ८०० टक्क्यापेक्षा जास्त आहेत.

## (११) जंगलांचे महत्त्वपूर्ण स्थान

आजही आदिवासींच्या जीवनात जंगलांना महत्त्वपूर्ण स्थान आहे. जळाऊ लाकूड, घर दुरूस्तीसाठी झाडांची पाने इत्यादी बाबतीत जवळ जवळ शंभर टक्के आदिवासी जंगलावर अवलंबून आहेत. उपासमारीचा प्रश्न भेडसावणारे आदिवासी जंगली फळे, वनस्पती, वनस्पतींचे कंद आणि मुळे इत्यादी बाबतीत जंगलावर अवलंबून आहेत.

## (१२) पायाभूत सुविधांची कमरता

मोखाडा तालुक्यात रस्त्यांची सुविधा आहे. परंतु स्वत:चे वाहन नसल्याने गाडी रस्त्यापर्यंत किंवा मुख्य रस्त्यापर्यंत काही आदिवासींना चालत यावे लागते. तसेच गाडी रस्ता नसल्याने काही पाड्यांवर चालतच जावे लागते. मोखाडा तालुक्यात वीजेची सुविधा आहे. परंतु काही पाड्यांवर अद्यापही वीज पोहोचलेली नाही. तालुक्यात एस.टी. गाडया व वीज इत्यादींची स्थिती समाधानकारक नाही.

## (१३) दारिद्र्य व निकृष्ट राहणीमान

सर्व्हेक्षित ४२० आदिवासी कुटुंबापैकी दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांचे प्रमाण ८० टक्के पेक्षा ज्यास्त आहे. बहुसंख्य आदिवासी कुटुंबांच्या राहणीमानाचा दर्जा अत्यंत निकृष्ट आहे.

## (१४) असमान विकास

तालुक्यातील काही भागांची बऱ्यापैकी प्रगती झाली आहे. तर काही भाग अद्यापही खूपच मागासलेले राहिले आहेत. रस्ते, वीज, शाळा, दवाखाने इत्यादींची सुविधा तालुक्याच्या गावी व मोठ्या गावात चांगली

आहे. परंतु दुर्गम भागात या सुविधा पुरेशा नाहीत. तसेच तालुक्यात आढळून येणाऱ्या सात आदिवासी जमातीपैकी काही जमातींचा आर्थिक व सामाजिक दर्जा चांगला आहे. तरी काही जमाती इतर जमातींच्या तुलनेत खूपच मागासलेल्या आहेत.

### (१५) मजुरी हा उत्पन्नाचा प्रमुख स्त्रोत

मजुरीवर उपजीविका करणाऱ्या आदिवासींचे प्रमाण खूप मोठे आहे. शेतमजूरी बरोबरच आदिवासी परगावी बिगरशेती क्षेत्रातही मजुरीची कामे करतात. दगड फोडणे, वाळू उपसणे, गवंड्याच्या हाताखाली काम करणे इत्यादी कामे करून आदिवासी उदरनिर्वाह करतात. त्यांना मिळणाऱ्या एकूण उत्पन्नात मजुरीपासून मिळणाऱ्या उत्पन्नाचा वाटा मोठा आहे. सन २००३-२००४ या वर्षात सर्व्हेक्षित ४२० आदिवासी कुटुंबांना उत्पन्नाच्या विविध साधनापासून १०३१९७२५ रूपये मिळाले होते. त्यात शेती उत्पन्नाचा हिस्सा २१.५५ टक्के, मजुरीचा ५९.८७ टक्के, नोकरीपासून मिळालेल्या उत्पन्नाचा हिस्सा १२.९० टक्के, स्वयंरोजगारापासून मिळालेल्या उत्पन्नाचा वाटा ३.७४ टक्के तर इतर व्यवसायापासून मिळालेल्या उत्पन्नाचा वाटा १.९४ टक्के एवढा होता. अशा प्रकारे अभ्यासक्षेत्रातील मोखाडा तालुक्याच्या आदिवासी अर्थव्यवस्थेची काही लक्षणे वरीलप्रमाणे स्पष्ट केली आहेत. वरील वैशिष्ट्यांबरोबरच आदिवासी अर्थव्यवस्थेची आणखी काही लक्षणे सांगता येतील.

**(पृष्ठ ४८ वर पहा)**



# विविध आदिवासी जमातीतील विवाह पद्धती

**डॉ. जयवंत इंगळे**

**क ठाकूर जमातीतील विवाह पद्धती**

ठाणे जिल्ह्यातील मोखाडा तालुक्यातील क ठाकूर या आदिवासी जमातीतील विवाह पद्धतीची थोडक्यात माहिती खालीलप्रमाणे दिली आहे. यामध्ये मुला-मुलींचे विवाहाचे वय, विवाहाचा निर्णय कोण घेते? साखरपुड्याचा खर्च, लग्नाचा खर्च, विवाहाचे ठिकाण, लग्नातील वेशभूषा, लग्नातील भगतांची भूमिका इ. बाबतची माहिती दिली आहे.

**१. विवाहाचे वय**

क ठाकूर जमातीत मुलाचा विवाह वयाच्या १९ व्या वर्षी करतात. तर मुलीचा १८ व्या वर्षी करतात. साधारणपणे मुलाचे विवाहावेळचे वय १८ ते २१ इतके असते. दुर्गम किंवा जंगल भागात राहणारे क ठाकूर आदिवासी आपल्या मुला-मुलींचा विवाह १४ व्या, १५ व्या वर्षी करतात. परंतु पूर्वी जेवढ्या मोठ्या प्रमाणात लहान वयात विवाह होत असत तेवढ्या प्रमाणात आज होत नाहीत. प्राथमिक शाळा, आश्रमशाळा, हायस्कूल इ. शिक्षणाची सुविधा आदिवासी भागात उपलब्ध झाल्याने १४ व्या, १५ व्या वर्षी मुला-मुलींचे विवाह करण्याचे प्रमाण खूपच कमी झाले आहे.

क ठाकूर जमातीत विवाहावेळचे मुलीचे वय मुलाच्या वयापेक्षा एक ते दोन वर्षे कमी असते. लग्न करताना मुलगी मुलापेक्षा कमी वयाची पाहतात. मुलीचे वय मुलाच्या वयापेक्षा कमी का असले पाहिजे हे आदिवासीना सांगता आले नाही. फार पूर्वीपासून अशी प्रथा आहे असे त्यांनी सांगितले.



## २. नवरा-नवरीची निवड

मुलीसाठी नवरा बघताना आदिवासी काही गोष्टींना महत्त्व देतात. उदा. नवरा मुलगा कामधंदा करणारा किंवा नोकरी करणारा असावा. तो शिकलेला नसला तरी चालतो; परंतु शेती किंवा अन्य कामधंदा करणारा असला पाहिजे. अशी मुलीकडच्या लोकांची अपेक्षा असते. लग्नाच्या बाबतीत नवऱ्या मुलाच्या शिक्षणाला फारसे महत्त्व दिले जात नाही. तो एकवेळ ठार निरक्षर असला तरी चालतो. परंतु त्याच्या वाटयाला उपजीविकेपुरती शेती आलेली असली पाहिजे किंवा कुटुंबाची उपजीविका होईल असा कामधंदा तो करत असला पाहिजे.

बिगर आदिवासी समाजात लग्न ठरण्यापूर्वी नवऱ्या मुलाला काही व्यसने आहेत का ते पाहिले जाते. त्याला दारूसारखे व्यसन असेल तर मुलगी दिली जात नाही. परंतु आदिवासी समाजात दारू पिणे कमीपणाचे मानले जात नाही. आदिवासींना डोंगरात, जंगलात, शेतात रहावे लागत असल्याने व काम करावे लागत असल्याने कामाचा शिणवटा घालवण्यासाठी थोडी दारू प्यावी लागते. काही आदिवासी स्त्रियासुद्धा दारू पितात. परंतु एखादा कामधंदा न करता दिवसभर दारूच्या नशेत राहत असेल तर त्याला मुलगी दिली जात नाही. आदिवासी नवऱ्या मुलाला दारू, तंबाखूसारखी व्यसने असणे गैर मानले जात नाही किंवा या बाबी त्याच्या विवाहात अडथळा ठरू शकत नाहीत.

## ३. जमातीबाहेर विवाह निषिद्ध

सर्वच आदिवासी जमातीत जमातीबाहेर विवाह निषिद्ध मानला जातो. एका जमातीतील मुला-मुलींचे विवाह दुसऱ्या जमातीतील मुला-मुलीशी होत नाहीत. मोखाडा तालुक्यात एकूण सात आदिवासी जमाती आहेत. त्यामध्ये म ठाकूर आणि क ठाकूर या दोन जमाती आहेत. या दोन जमातीत रोटी व्यवहार होतात. परंतु बेटी व्यवहार होत नाहीत. कारण या दोन जमाती स्वत:ला एकमेकापेक्षा वेगळ्या आणि श्रेष्ठ समजतात. जर कोणी जमातीबाहेर विवाह केला तर जमातीतील लोक नवरा-बायकोला वेगवेगळ्या प्रकारे त्रास देतात. त्यामुळे सहसा कोणी जमातीच्या बाहेर विवाह करण्यास धजावत नाही.

## ४. विवाहाचा निर्णय

साधारणपणे मुलाच्या किंवा मुलीच्या विवाहाचा निर्णय त्यांचे आई- वडीलच घेतात. त्यांच्या दृष्टीने मुलगा किंवा मुलगी विवाह योग्य झाली की ते लग्नासाठी पावले उचलतात. मुलाने जर एखादी मुलगी पाहिली असेल किंवा एखादीशी विवाह करण्याची त्याची इच्छा असेल तर तो तसे आई वडिलांना सांगतो. त्यानंतर विवाहाची बोलणी सुरू होतात. शक्यतो मुला-मुलींचे आई-वडीलच विवाह ठरविण्यात पुढाकार घेतात. नातेवाईकांनी किंवा अन्य कोणी मुलीची माहिती दिली की मुलाचे आई व वडील, दोन ते पाच व्यक्ती आणि स्वतः नवरा मुलगा इत्यादी मंडळी मुलगी पाहण्यास जातात. मुलाने जर अगोदर कोठे मुलगी पाहिली असेल तर तो जात नाही.

## ५. साखरपुडा

साखरपुडा म्हणजे लग्न ठरविणे होय. क ठाकूर संघटनेने साखरपुड्यावर किती खर्च करावा याचे काही नियम ठरवले आहेत. साखरपुड्यावर आदिवासींनी खालीलप्रमाणे १००१ रूपये खर्च करावेत अशी संघटनेची अपेक्षा आहे.

### (अ) बोल मागणे

बोल मागणे म्हणजे मुलगी ठरवण्यास जाणे होय. मुलाकडची ४ ते १० माणसे मुलीच्या घरी बोल मागण्यास जातात. यावेळी चहापाण्याचा खर्च मुलीच्या लोकांना करावा लागतो. हा खर्च २५ रूपयांपर्यंत करावा असा संघटनेचा नियम आहे.

### (ब) साखरपुड्याची गाठी

साखरपुड्याची गाठी म्हणजेच मण्याची माळ होय. ही माळ नवऱ्या मुलीसाठी असते. साखरपुड्याची गाठी नवऱ्या मुलाकडच्या लोकांनी आणायची असते किंवा मुलीकडच्यांनी गाठीचे पैसे मागितले तर पैसे द्यावे लागतात. गाठीवर ५१ रूपयापर्यत खर्च करावा असा संघटनेने नियम केला आहे.

### (क) गाठी घालणे

नवऱ्या मुलाने आणलेल्या गाठी किंवा नवऱ्या मुलाच्या खर्चातून आणलेल्या गाठी मुलीच्या गळ्यात घालण्यासाठी गावातील पाच सुवासिनींना बोलावले जाते. या सुवासिनी मुलीच्या गळ्यात गाठी बांधतात. त्याबद्दल प्रत्येक सुवासिनीला पाच रूपये दिले जातात. या सुवासिनी पुढे वेळप्रसंगी साक्षीदार म्हणून उपयोगी पडतात. म्हणजे साखरपुडा झालाच नाही असे नवरा मुलगा किंवा मुलीकडचे लोक पुढे म्हणू लागले तर या पाच सुवासिनींना साक्षीदार म्हणून बोलावतात. म्हणून सुवासिनींना खूप महत्त्व असते.

### (ड) ओटी भरणे

साखरपुड्याच्या कार्यक्रमाच्यावेळी नवऱ्या मुलीची ओटी भरतात. मुलीच्या ओटीत एक खोबऱ्याची वाटी आणि २१ रूपये घालतात. ओटी भरण कार्यक्रमासाठी २१ रूपयांपर्यंत खर्च करावा असा संघटनेने नियम केला आहे.

### (इ) फडकी लावणे

फडकी लावणे म्हणजे नवऱ्या मुलीला साखरपुड्याची साडी नेसवणे होय. गावातील पाच सुवासिनी मुलीला फडकी लावतात. त्याबद्दल प्रत्येकीला पाच रूपये दिले जातात. फडकी लावण्याच्या कार्यक्रमासाठी सुद्धा २५ रूपयापर्यंत खर्च करावा असा संघटनेने नियम केला आहे.

### (फ) बास्ता

मुला-मुलीचे कपडे खरेदी करणे म्हणजे बास्ता बांधणे होय. बास्त्यामध्ये मुलीला सहावारी साडी, चोळी इ. कपड्यांचा समावेश असतो. बास्ता बांधण्यासाठी नवऱ्या मुलाकडचे व मुलीकडची प्रत्येकी दोन-तीन माणसे उपस्थित असतात. यामध्ये स्त्रियासुद्धा असतात. बास्ता बांधून झाल्यानंतर सर्वजण तेथील एखाद्या हॉटेलात जातात आणि चहा-पाणी घेऊन तोंड गोड करतात. बास्त्याच्या प्रसंगी चहा-पाण्यासाठी ५१ रूपयापर्यंत खर्च करावा असे बंधन संघटनेने घातले आहे.

### (ग) नातेवाईक

साखरपुड्याच्या दिवशी मुलीचे मामा, आई, वडील, आजोबा आणि आईचे नातलग एकत्र येतात. त्यांच्यासाठी २५ रूपयांपर्यंत खर्च करतात. हा मान असतो.

### (ह) मोठी पेण

साखरपुड्याच्या प्रसंगी मुलीच्या आई-वडिलांकडून गावकीला किंवा गावाच्या प्रमुखाला ५१ रूपये द्यावे लागतात. त्याला मोठी पेण असे म्हणतात. हे पैसे गावकीला चहापाण्यासाठी दिले जातात. गावप्रमुखाचा किंवा गावकीचा मान राखणे हा त्या मागचा उद्देश असतो. गावप्रमुखाला ५१ रूपये दिले की, अमक्या-अमक्या मुलीचे लग्न ठरल्याच्या बाबींवर शिक्कामोर्तब होते. म्हणजे लग्न ठरल्याचे जगजाहीर होते. त्यासाठी मोठी पेण म्हणून ५१ रूपये द्यावे लागतात.

### (य) वधुकडून स्त्री व पुरूष

साखर पुड्यासाठी जमलेल्या स्त्री-पुरूषांचे तोंड गोड करण्यासाठी मुलीच्या आई-वडिलांनी ५१ रूपयापर्यंत खर्च करावा असा क ठाकूर संघटनेने नियम केला आहे.

**(ज) कुरमुरे व साखर**

साखरपुड्याचा कार्यक्रम झाला की उपस्थित लोकांना कुरमरे व साखर द्यावी असा संघटनेने नियम केला आहे. पूर्वी साखरपुडा झाला की त्या दिवशी जेवण व दारू दिली जात असे. परंतु गरीब आदिवासींना परवडावे यासाठी जेवणाऐवजी कुरमरे व साखर द्यावी असा नियम संघटनेने केला आहे. परंतु गरीब आणि सधन आदिवासी सुद्धा साखरपुडयाला जेवण आणि दारू देतात.

**६. लग्न**

आपल्या जमातीतील आदिवासींनी विवाहावर किती खर्च करावा याचे काही नियम क ठाकूर या संघटनेने केले आहेत. ते खालीलप्रमाणे दिले आहेत.

(i) **देज**

देजला वधूमूल्य किंवा हुंडा असेही म्हणतात. आदिवासी समाजात वर पित्याकडून वधू पित्याला देज दिला जातो. देजमध्ये धान्य आणि रोख पैशाचा समावेश असतो. गरीब आदिवासींना देज परवडत नाही. त्यामुळे लग्नासाठी त्यांना काही वर्षे वेठबिगारी करावी लागते. म्हणून क ठाकूर संघटनेने वर पित्याने किती देज द्यावा याचा नियम केला आहे. देज म्हणून तांदूळ एक क्विंटल, उडीद किंवा तूर दोन पायली द्यावेत असा संघटनेचा नियम आहे. लग्नाच्या अगोदर दहा दिवस तांदूळ, उडीद इ. घेऊन मुलाकडचे लोक मुलीच्या आई-वडिलांकडे येतात. यावेळी धान्याची बाचकी सोडण्यासाठी पाच सुवासिनींना बोलावले जाते. त्या प्रथम बाचकी सोडतात. त्यांना मान म्हणून प्रत्येकी पाच रूपये दिले जातात.

(ii) **लग्नाचा बास्ता**

लग्नाच्या बास्त्यामध्ये नवरी मुलीची साडी, झंपरचे कापड, शालू इ. कपडे असतात. लग्नाच्या बास्त्यावर ८०० रूपयापर्यंतच आदिवासींनी खर्च करावा असा संघटनेचा नियम आहे.

(iii) **लग्नाचे देज पान**

चहा-पाण्यासाठी जो खर्च केला जातो त्यास देज पान असे म्हणतात. यासाठी २५० रूपयापर्यंत खर्च करावा असे क ठाकूर समाज मंडळाचे किंवा संघटनेचे बंधन आहे.

(iv) **बास्ता बांधणे**

लग्नाचा बास्ता बांधण्यासाठी उपस्थित असलेल्या स्त्री-पुरूषांना चहा-पाणी नाष्टा दिला जातो. यामध्ये नवऱ्या मुलाकडच्यांनी निम्मे पैसे आणि नवरी मुलीकडच्यांनी निम्मे पैसे खर्च करावेत असा समाजाचा नियम आहे. बास्ता बांधल्यानंतर करावयाच्या चहा-पाण्याच्या कार्यक्रमासाठी १०१ रूपये खर्च करावेत असा समाजाचा नियम आहे.

(v) **गावकरी मान**

लग्नात गावकऱ्यांचाही मान महत्वाचा असतो. मान म्हणून गावकऱ्यांना विवाह ठरलेल्या कुटुंबाकडून २१ रूपये दिले जातात.

(vi) **पाटील शेला**

पाटील हा गावचा प्रमुख असतो. त्याचा मान राखण्यासाठी त्याला दहा रूपयांची नोट दिली जाते.

(vii) **मामा शेला**

लग्नात मुलीच्या मामालाही महत्व असते. त्यामुळे त्याचाही मान करावा लागतो. त्यासाठी त्याला ११ रूपये देतात.

(viii) **लग्नाचे पातळ लावण्यासाठी स्त्रिया**

गावातील पाच सुवासिनीकडून नवरी मुलीला साडी नेसवली जाते. त्यासाठी प्रत्येक सुवासिनीला मान म्हणून पाच रूपये दिले जातात.

### (ix) लग्नाच्या गाठ्या

लग्नाच्या गाठ्या म्हणजे मण्याच्या माळा. यासाठी आदिवासींनी १०१ रूपयापर्यंत खर्च करावा असा नियम आहे.

### (x) लग्नाचा चुडा

आदिवासी समाजातही नवरी मुलगीला चुडा भरावा लागतो. त्यासाठी आदिवासींनी ५१ रूपयापर्यंत खर्च करावा असा नियम संघटनेने घालून दिला आहे.

### (xi) सुवासिनींचा मान

विवाहातील विविध विधी प्रसंगी सुवासिनींना मानाचे स्थान दिले जाते. मान म्हणून पाच सुवासिनींना प्रत्येकी पाच रूपये दिले जातात.

### (xii) मांडव घालणारे

लग्नाचा मांडव घालणाऱ्यांचाही मान केला जातो. मान म्हणून त्यांना पाच रूपये दिले जातात.

### (xiii) मेडिंगा (ब्राह्मण)

लग्नाचे विधी करणाऱ्या क ठाकूर समाजातील व्यक्तींना मेडिंगा असे म्हणतात. मेडिंगाला किंवा लग्न लावणाऱ्या बिगर आदिवासी ब्राह्मणाला आदिवासींनी ५१ रूपये द्यावेत असे संघटनेचे बंधन आहे.

अशा प्रकारे आदिवासींनी विवाहावर (साखरपुडा १००१ रूपये आणि प्रत्यक्ष विवाह १४५१ रूपये) २४५२ रूपये खर्च करावेत, त्यापेक्षा जास्त खर्च करू नये असा क ठाकूर समाज मंडळाने नियम केला आहे. परंतु प्रत्यक्षात वीस हजार रूपये ते पन्नास हजार रूपयापर्यंत आदिवासी विवाहावर खर्च करतात, असे सर्व्हेक्षणात आढळून आले. सधन आदिवासींचा एका लग्नाचा खर्च लाखाच्याही पुढे जातो.

## ७. लग्नपत्रिका

क ठाकूर जमातीतील आदिवासी पूर्वी लग्नपत्रिका छापत नसत. सुपारी देऊन लग्नाची तारीख आणि लग्न ठरल्याचे सांगत असत. आता पत्रिका छापून निमंत्रणे दिली जातात. गरीब आदिवासी पत्रिका न छापता विवाह करतात. गावातील सर्वांना लग्नाचे निमंत्रण दिले जाते.

## ८. विवाहाचे ठिकाण

विवाह मुलाच्या घरी लागतो. तसेच मुलीच्या घरीसुद्धा लागतो. लग्नाचे वऱ्हाड लग्नाच्या दिवशी येते. वऱ्हाड बैलगाडी तसेच वाहनानेही येते. तसेच अगदी जवळचे स्थळ असेल तर चालतही वऱ्हाड येते. रस्त्यांची आणि वाहनांची सुविधा उपलब्ध असल्यामुळे वऱ्हाड टेंपोतून किंवा ट्रॅक्स सारख्या वाहनातूनही येते.

## ९. वेषभूषा

एरवी आदिवासी साध्या पोषाखात असतात. परंतु लग्नात मात्र स्वच्छ, रंगीबेरंगी पोषाखात वावरत, बागडत असतात. आदिवासी गरीब असले तरी लग्नाच्या प्रसंगी ते कपड्यावर बऱ्यापैकी खर्च करतात. लग्नात नवरा-नवरीला नवीन कपडे तर असतातच; परंतु जवळच्या नातेवाईकांनाही साड्या, टॉवेल, टोपी, शाल इ. कपडे मान म्हणून दिले जातात. मुला-मुलीचे जवळचे नातेवाईक, गावातील इतर आदिवासी विशेषत: स्त्रिया लग्नात नवीन कपडे घालतात. डोईवरील केसात रानातील फुले किंवा प्लॅस्टिकची फुले असतात.

बहुसंख्य आदिवासींच्या लग्नात आता नवऱ्या मुलाचे आणि मुलीचे कपडे शहरी लोकांसारखेच आधुनिक असतात. परंतु त्यांच्या नातेवाईकांचा आणि गावातील लोकांचा पोषाख मात्र पारंपरिक असतो.गरीब कुटुंबातील नवरी मुलीसहित सर्व स्त्रियांच्या अंगावरील दागिने नकली मोत्यांचे असतात. क्वचित एखाद्या स्त्रीच्या अंगावर खऱ्या सोन्याचा दागिणा असतो आणि त्याची किंमतही खूपच कमी असते.

आदिवासींच्या विवाहातही मंगळसूत्राला महत्त्व

असते. गरीब आदिवासींच्या मंगळसूत्रात सोन्याचा अभाव असतो. मंगळसूत्र साधेच असते. ज्या आदिवासींची परिस्थिती चांगली असते ते थोड्याफार सोन्याचे मंगळसूत्र मुलीच्या गळ्यात बांधतात.

### १०. विवाह मेडिंगा व ब्राह्मणाकडून

क ठाकूर आदिवासीमध्ये बिगर आदिवासी म्हणजे ब्राह्मण विवाह लावतात तसेच मेडिंगाही विवाह लावतात. विवाह विधीचे काम करणाऱ्या आदिवासी व्यक्तीला मेडिंगा असे म्हणतात. क ठाकूर समाजात १९८७ पासून विवाहविधी मेडिंगाकडून करून घ्यावयास सुरूवात केली. ब्राह्मण तालुक्याच्या ठिकाणी किंवा मोठ्या गावात राहतात. आणि तुलनेने ब्राह्मणांची संख्या कमी असल्याने ब्राह्मण वर्गावर ताण पडतो. तसेच दूरवरच्या गावात जाऊन आदिवासींची लग्ने लावायला ब्राह्मण नाखूष असतात. म्हणून लग्न लावण्यासाठी मेडिंगा निवडण्याची पद्धत सुरू झाली. मेडिंगाची निवड समाजातील ज्येष्ठ व्यक्ती किंवा न्यायनिवाडा करणारी पंचायत करते. पंचायतीतील किंवा समाजातील ज्येष्ठ मंडळी मेडिंगांना विवाह विधीचे प्रशिक्षण देतात. हा प्रशिक्षणाचा कोर्स पाच दिवसांचा असतो. प्रत्येक गावात एखादा तरी मेडिंगा असतोच. मेडिंगाला विवाह लावल्याबद्दल ५१ रूपये दिले जातात. मेडिंगाची पद्धत सुरू झाल्यामुळे आदिवासींना आता विवाहासाठी ब्राह्मणावर विसंबून रहावे लागत नाही. पूर्वी ब्राह्मणाच्या सवडीवर लग्ने लागत असत किंवा ब्राह्मण येईपर्यंत विवाह खोळंबत असत. ते प्रकार मेडिंगामुळे आता बंद झाले आहेत.

### ११. लग्नाचे जेवण

एखादा आदिवासी कितीही गरीब असला तरी त्याला आपल्या नातेवाईकांना आणि गावातील सर्व लोकांना लग्नाचे जेवण द्यावेच लागते. जेवण, दारू दिल्याशिवाय आणि मान-पान केल्याशिवाय लग्नास समाजाकडून मान्यता मिळत नाही. जेवणाचा दर्जा किंवा जेवणातील पदार्थ आदिवासींच्या आर्थिक परिस्थितीवर अवलंबून असतात. लग्नाच्या जेवणात डाळ-भात, वांगी, बटाट्याची भाजी असते. सधन आदिवासी जेवणात बुंदीसारखा गोड पदार्थ ठेवतात.

लग्नविधी तीन दिवस चालत असला तरी ज्या दिवशी टाळी लागते त्या दिवशी जेवण दिले जाते. टाळी लागणे म्हणजे लग्न लागणे होय. परंतु परगावाहून आलेले पाहुणे, नातेवाईक यांना तीन दिवस जेवण द्यावेच लागते. लग्नाच्या जेवणाच्या पंगती मंडपात जागा असेल तर बसवतात. स्त्री-पुरूष जेवावयास एकत्र बसत नाहीत. स्त्रियांना साधारणत: पुरूषांचे जेवण झाल्यानंतर बसवतात. फार पूर्वीपासूनच तशी प्रथा आहे.

आदिवासी समाजातील काही व्यक्तीच पुढाकार घेऊन लग्नाचे जेवण बनवतात. एकमेकांच्या लग्न कार्यात एकमेकांना जेवण बनवण्यासाठी सहकार्य करतात. जेवण बनवण्यासाठी आचारी वगैरे नसतात. पुरूष मंडळीच लग्नाचे जेवण बनवतात. स्त्रिया त्यांना किरकोळ मदत करतात.

### १२. वाजंत्री आणि नृत्य

क ठाकूरमध्ये पूर्वी वाजंत्री शिवाय विवाह होत असत. आता लग्नात वाजंत्री बोलावतात. वाजंत्री कमी खर्चात उपलब्ध व्हावी यासाठी समाजातील पुढारी लोकांनी आपल्या समाजातीलच काही लोकांना वाजंत्री व्यवसाय करण्यास प्रोत्साहन दिले आहे. त्यामुळे आता गावागावात वाजंत्री वाजवणारे आहेत. लग्न तीन दिवस चालत असल्याने वाजंत्रीही तीन दिवस असतात. वाजंत्र्यांना या तीन दिवसांचे सातशे ते एक हजार रूपये दिले जातात.

आदिवासींच्या लग्नात नृत्याला किंवा नाचगाण्याला खूप महत्व असते. त्याशिवाय लग्न झाल्यासारखे आदिवासींना वाटत नाही. दिवस रात्र

नृत्याचा कार्यक्रम असतो. परंतु रात्री जेवण-खाण झाल्यानंतर या कार्यक्रमाला अधिक रंग चढतो. लहान मुले, तरूण तरूणी आणि प्रौढ आदिवासी स्त्री-पुरूष आनंदाने बेहोष होऊन नाचत असतात. नवरा नवरीला खांद्यावर घेऊन वाद्याच्या तालावर दिवस उजाडेपर्यंत हास्य विनोद करीत नृत्याचा कार्यक्रम सुरू असतो. स्त्रियांचे व पुरूषांचे अधून मधून दारू पिणे चालू असते. ज्यांची दारूची नशा कमी झालेली असते ते नाच थांबवून दारू पिऊन येतात आणि पुन्हा आनंदाने ओरडत नाच करतात. जवळच एखादया घरात किंवा मांडवात दारूची भांडी ठेवलेली असतात. वृद्ध आदिवासी स्त्रिया सुद्धा मनसोक्त दारू पिऊन नाचगाण्याचा कार्यक्रम पाहत लग्नाचा आनंद लुटत असतात. नृत्य करीत असतानाच आदिवासी स्त्री-पुरूष अधून मधून आनंदाने बेहोष होऊन ओरडत असतात. एकमेकांची गंमत करीत असतात किंवा चेष्टा मस्करी करीत असतात.

### १३. भगताचे स्थान

क ठाकूरमध्ये हळदी लावण्याच्या कार्यक्रमात भगतांना मानाचे स्थान असते. भगत कुळदेवतांची, गावदेवीची पूजा करतो. भगत मुलीला किंवा मुलाला हळद चढवून देतात. यावेळी भगतांना ४ ते ५ रूपये दक्षिणा दिली जाते.

### १४. मुलगी उचलून आणणे

नवऱ्या मुलीच्या आई वडिलांची आर्थिक परिस्थिती बेताची असेल तर लग्नाचा सगळा खर्च नवऱ्या मुलाचे आई वडील करतात. जेव्हा लग्नाचा खर्च नवरा मुलगा करतो आणि लग्न नवऱ्याकडे लागते तेव्हा त्यास मुलगी उचलून आणणे असे म्हणतात. ज्या मुलीच्या आई वडिलांना लग्नाचा खर्च परवडत नाही त्यांच्या दृष्टीने ही पद्धत खूप चांगली आहे. कारण अत्यंत गरीब स्थिती असलेल्या कुटुंबातील मुलींचा विवाह चांगल्या खात्या-पित्या कुटुंबात होत असतो. परंतु असे विवाह फारच कमी होतात. मुलगी जर अगदी जवळची नात्यातील असेल किंवा दिसायला सुंदर असेल तरच सधन आदिवासी मुलगी उचलून आणतात. म्हणजे लग्न आपल्या दारात आपल्या खर्चाने करतात.

### १५. ठरलेले लग्न मोडल्यास सोडचिठ्ठी

साखरपुडा होणे म्हणजे लग्न ठरणे होय. अशा प्रकारे लग्न ठरल्यानंतरसुद्धा काही लग्ने मोडतात. मुलाकडून किंवा मुलीकडच्याकडून लग्नास नकार दिला जातो. लग्न करत नसेल तर का करत नाही? असे संबंधितांना मध्यस्थांकडून विचारले जाते. गैरसमज असेल तर दूर करण्याचा प्रयत्न केला जातो. परंतु लग्नाचा फारसा आग्रह धरला जात नाही. कारण लग्न होण्यापूर्वीच मुलाला मुलगी किंवा मुलीला मुलगा पसंत नसेल तर लग्न होऊन ते टिकण्याची शक्यता खूपच कमी असते. त्यामुळे साखरपुडा होऊनही मुलग्यापैकी किंवा मुलीपैकी कोणी लग्नास नकार दिला तर लग्नासाठी दबाव आणला जात नाही. मात्र साखरपुडा हा लग्नाच्या संदर्भातील महत्त्वाचा भाग असल्याने लग्न मोडल्यास सोडचिठ्ठी घेतली जाते. सोडचिठ्ठी झाल्यानंतरच लग्न मोडल्याचे मान्य केले जाते.

### १६. लग्नाचे नियम आणि अटी

क ठाकूर आदिवासी समाज मंडळाने आपल्या समाजातील आदिवासींचे विवाह चांगल्या प्रकारे व्हावेत आणि विवाहासारख्या बाबींमुळे समाजात भांडण तंटा उद्‌भवू नये यासाठी पुढीलप्रमाणे काही नियम केले आहेत.

अ. सारखपुडा झालेल्या मुलीचे लग्न जास्तीत जास्त एक वर्षापर्यंत झालेच पाहिजे. जर एक वर्षांपर्यंत लग्न केले नाही तर त्या मुलीवर नवऱ्याचा हक्क राहणार नाही. त्या मुलीस दुसरा नवरा करण्याची परवानगी देण्यात येईल. मात्र नवऱ्यास दावा किंवा झालेला खर्च मिळणार नाही.

ब. ज्या मुलीचा साखरपुडा झाला असेल आणि नवरा मुलगा तिच्याबरोबर लग्न करण्यास तयार असूनही त्या मुलीने दुसरा नवरा केला तर मुलीकडून नवऱ्याचा खर्च २५०० रूपये आणि समाजाचा फंड (दंड) रूपये १०१ असे एकूण २६०१ रूपये घेण्यात येतील. तसेच मुलीच्या आईवडिलांकडून रूपये १०५१ फंड म्हणजेच दंड घेण्यात येईल. असाच प्रकार जर नवऱ्या मुलाने केला तर त्याच्याकडून वरीलप्रमाणे खर्च घेतला जाईल आणि तो मुलीच्या बापाला दिला जाईल. तसेच फसवणूक केल्याबद्दल वरील प्रमाणे फंड किंवा दंड घेतला जाईल.

क. नवरी मुलीची पेण दिली असेल तर त्याचवर्षी साखरपुडा केला पाहिजे. साखरपुडा त्याच वर्षी केला नाही तर मुलीवर नवऱ्याचा हक्क राहणार नाही.

ड. ज्या मुलीचे लग्न झाले असेल व नवरी मुलगी नवऱ्याकडे नांदत असताना त्यांनी स्वत: खुशीने नवरीस सोडले तर मुलीवर नवऱ्याचा हक्क राहणार नाही.

इ. ज्या मुलीचे लग्न झाले असेल वा नवरा नांदवत असूनही तिने दुसरा नवरा केला तर त्या दुसऱ्या नवऱ्याकडून पहिल्या नवऱ्याचा खर्च रूपये ५००० व समाजाचा फंड रूपये १५१ असे एकूण रूपये ५१५१ व आई वडिलांकडून रूपये १०५१ दंड वसूल करून घेतला जाईल.

फ. ज्या मुलीस फारकत मिळाली असेल व तिने दुसरा नवरा केल्यास त्या नवऱ्याकडून साखरपुड्याचे रूपये ५२५ आणि समाजफंड व लग्नाची फारकत फंड रूपये १०५१ घेण्यात येतील.

ग. ज्या मुलीस लग्नाची फारकत मिळाली असेल व तिने दुसरा नवरा केला व तो ही सोडला आणि तिसरा नवरा केला तर तिसऱ्याकडून दुसऱ्या नवऱ्याला रूपये ५००० द्यावे लागतील. समाजाचा फंड १५१ रूपये द्यावा लागेल. आणि मुलीच्या आई-वडिलांकडून रूपये १०५१ फंड घेण्यात येईल.

ह. ज्या मुलीचे मोहतूर लावले असेल व ती नवऱ्याकडे नांदत नसेल तर त्या नवऱ्यास खर्च रूपये १००० व समाज फंड रूपये ५१ असे एकूण रूपये १०५१ द्यावे लागतील.

य. जर एखाद्या पुरूषाने दुसऱ्याची नांदती बायको पळवली (पेटती चूल विझवली) तर त्याच्याकडून समाजाचा फंड रूपये २००१ आणि नवऱ्याचा खर्च रूपये ८००० असे एकूण १०००१ रूपये घेतले जातील आणि त्या पुरूषाच्या आई-वडिलांकडून रूपये १०५१ घेण्यात येतील.

ज. मोहतुरी नवरीकडून गावकऱ्यांना पानसुपारीसाठी रूपये २५ फक्त द्यावेत.

ख. लग्न तीन दिवसांत उरकले पाहिजे.

ळ. लग्नासाठी मुलीचे वय १८ वर्षाचे व मुलाचे वय २१ वर्षांच्यावर असले पाहिजे.

म. मुला-मुलीचे लग्न करण्यापूर्वी सरपंच व पोलिस पाटील यांच्याकडून वयाचा दाखला घ्यावा आणि क ठाकूर समाज संघटनेच्या गट कमेटी सेक्रेटरीकडे जाऊन रजिस्टरवर नोंद करावी. ज्या मुला-मुलींची नोंद केली नसेल त्यांची तक्रार घेतली जाणार नाही.

अ. जर मुला-मुलींची नोंद न करता लग्न केले तर आई-वडिलांना ५०१ रूपये समाजफंड द्यावा लागेल.

आ. वरील नियमांचा व अटींचा भंग व्यक्तीने अगर गावाने केल्यास त्यांना समाज गावाबाहेर टाकून त्यांच्यावर बहिष्कार टाकण्यात येईल.

## कोकणा समाजातील विवाह पद्धती

मोखाडा तालुक्यात आढळून येणाऱ्या सर्व सात आदिवासी जमातींची विवाह पद्धती जवळ जवळ सारखीच आहे. त्यामध्ये फारसा असा फरक नाही. परंतु प्रत्येक जमातीतील आदिवासींनी आपल्या जमातीतील विवाह पद्धतीचे वर्णन केले. त्यापैकी काही माहिती त्यांच्याकडून मिळवता आली नाही किंवा काही माहिती त्यांच्याकडून सांगायची राहून गेली. परंतु ती माहिती दुसऱ्या जमातीकडून प्राप्त झाली ती माहिती येथे दिली आहे.

### १. बधवनी

बधवनी करणे म्हणजे लग्नासाठी मुलगी पाहून ठेवणे होय. एखाद्या गावात जर लग्नाची मुलगी असेल तर मुलाचे वडील त्याला मुलगी बघून येण्यास सांगतात. तो आई-वडिलांच्या सांगण्यावरून मुलगी पसंत पडते का ते पाहण्यास जातो. मुलाला मुलगी पसंत पडली तर मग तो आई वडिलांना पाठवतो.

### २. नावरस

मुलाला मुलगी आणि मुलीला मुलगा पसंत पडला की नावरस बघतात. नावरस बघणे म्हणजे भविष्य बघणे होय. साखरपुडा करण्यापूर्वी लग्न जुळते की नाही ते पाहिले जाते. लग्नासंदर्भातील भविष्य बघण्याचे काम ब्राह्मण करतो. याबाबतीत आदिवासी ब्राह्मणावरच विसंबून असतात. आपल्या मुला बाळांचे लग्न टिकावे असे आदिवासींना वाटत असते. म्हणून ब्राह्मणाला नवरा-नवरीचे नाव सांगितले जाते. दोघांच्या नावावरून तो भविष्य सांगतो. लग्न ठरवण्यात काही अडथळे असतील तर तो आदिवासींना समजून सांगतो. नावरस चढत नाही. म्हणजे लग्न जमत नाही. ब्राह्मणाने लग्न जमत नाही असे सांगितले तर मुलामुलींची एकमेकांना पसंती असूनही लग्न होत नाही. मुलाला किंवा मुलीला गुरू असेल तर गुरूपूजन केले जाते. लग्न पुढच्या वर्षी ढकलावे लागते. ब्राह्मण लग्नाची तारीख किंवा मुहूर्त काढून देतो. त्या तारखेला आदिवासी लग्न लावतात.

### ३. बोल करणे

लग्न ठरवण्यासाठी मुलीच्या घरी जाणे म्हणजे बोल करणे होय. लग्नाची बोलणी करण्यासाठी कुटुंबातील व जवळच्या नात्यातील दोन-तीन पुरूष आणि दोन-तीन स्त्रिया मुलीच्या गावी जातात. मुलीकडचेही काही नातेवाईक मुलीच्या घरी जमतात. त्यावेळी मुलाकडचे लोक मुलीकडच्या मंडळीवर बंधन टाकतात. बंधन टाकणे म्हणजे आम्हाला तुमची मुलगी पसंत आहे. आम्ही ती आमच्या मुलासाठी करणार असून आता आपली मुलगी दुसऱ्या कोणाला दाखऊ नक ा. मुलीला दुसरे स्थळ आले तर होकार देऊ नका असे सांगणे होय. हे बंधन केवळ मुलीच्या आई वडिलांवर असत नाही तर मुलाच्या आई - वडिलांवरही असते. एकदा मुलगी करतो असे म्हटले की, ती मुलगी मुलाकडच्यांना करावीच लागते. बोल करण्याच्या किंवा बंधन टाकण्याच्या कार्यक्रमाला नवऱ्या मुलाला नेले जात नाही. तसेच भगत किंवा मेडिंगाही नसतात. या कार्यक्रमात सर्वांना दारू दिली जाते. नवऱ्या मुलाकडचे लोक पुरेशी दारू घेऊन आलेले असतात. ती सर्वांना वाटली जाते. याप्रसंगी नवरी मुलीकडच्याकडून सर्वांना जेवण दिले जाते. जेवण साधेच म्हणजे डाळ, भात, भाजी असे असते.

### ४. मागणं

साखरपुड्यालाच मागणं असे म्हणतात. साखरपुडा नवरी मुलीच्या घरी असतो. यावेळी नवरी मुलीला साडी नेसवली जाते. नवऱ्या मुलाकडचे लोक साडी घेऊन येतात. साडीबरोबरच वाजंत्री घेऊन जावे

लागते. सुवासिनी साडी नेसवतात. साखरपुड्याचा कार्यक्रम सुमारे एक तास चालतो. लग्न केव्हा करायचे हे साधारणपणे साखरपुडयाला ठरवतात. ब्राह्मणाकडून मुहूर्त काढून आणला तरी ब्राम्हण लग्न लावण्यास वेळेवर आला नाही किंवा लग्नात नवरदेव उशिरा पोहचला तर लग्न उशिरा लागते.

साखरपुड्याला नवरदेवाचा बाप मुलीच्या बापाला मान घेशील का? असे विचारतो. तो होय म्हणाला तर पैसे आणि धान्य किती द्यायचे ते ठरवतात. साधारणपणे सर्व प्रकारचे धान्य अडीच मण देज म्हणून द्यावे लागतात. नवरीच्या बापाला ५५१ रूपये द्यावे लागतात. त्याला मान असे म्हणतात. गावकऱ्यांचा कायदा ५०० रूपये असतो. पाटील, गावकरी यांना ५०० रूपये द्यावे लागतात. यातले २५ रूपये पाटलाला देतात. बाकीचे पैसे गावासाठी ठेवतात. हे पैसे गावातील मुख्य माणसाजवळ असतात. थोडे जास्त पैसे जमले की त्यातून जेवणाची मोठी भांडी विकत आणतात. ही भांडी समाजातील लोकांना देवकार्यासाठी आणि लग्नाचे जेवण बनवण्यासाठी दिली जातात.

गावातल्या लोकांकडून भांड्यांचे भाडे घेत नाहीत. बाहेरगावच्या लोकांकडून भाडे घेतले जाते. नवरी मुलीच्या बापाचा मान ५५१ रूपये आणि गावकऱ्यांचा कायदा ५०० रूपये एवढी रक्कम नवऱ्यामुलाचा बाप साखरपुड्याच्या वेळी देतो. नवऱ्या मुलाकडून नवरीकडच्यांना देज म्हणून जे अडीच मण धान्य दिले जाते. त्यात भात एक पोतं (तांदूळ ७५ किलो), २ पायली उडीद, २ पायली तूर, ४ पायली वरई इ. चा समावेश असतो. नवरी मुलीकडे द्यावयाचे धान्य लग्नाच्या अगोदर चार दिवस पोहोच करावे लागते. गावातील दोन-चार माणसे हे धान्य डोक्यावर घेऊन नवरीच्या गावी जातात. नवरीचे गाव खूप लांब असेल तर बैलगाडीतून किंवा एसटीतून जातात. धान्य घेऊन आलेल्या लोकांना मुलीचा बाप चहा, दारू आणि जेवण देतो.

### ५. हळद

लग्नाच्या आदल्या दिवशी हळदी लागतात. त्यासाठी घरासमोर छोटासा मांडव घातला जातो. मुलाची हळद मुलाकडे तर मुलीची हळद मुलीकडे लागते. हळदीच्या कार्यक्रमाला भगत नसतो. हळद कोणाच्या नावाने काढायची ते ब्राह्मण सांगतो. बहीण, काकी, चुलती यांच्यापैकी एकाच्या नावाने हळद काढायला सांगतात. जिच्या नावाने हळद निघेल ती पहिल्यांदा हळद लावते. हळद स्त्रियांच्या नावाने निघते. पुरूषांच्या नावाने निघत नाही. स्त्रियांनी हळद लावली की मग पुरूष हळद लावतात. पुरूष नवरीला सुद्धा हळद लावतात. हळदीच्या कार्यक्रमाला सर्व गावकरी, नातेवाईकांना बोलावतात. त्यांना जेवण द्यावे लागते. काही गावात हळदीला जेवण देण्याची पद्धत नाही.

### ६. तेलवणी

हळदीच्या दिवशी संध्याकाळी तेलवणीचा विधी असतो. हळदीच्या कार्यक्रमासाठी जो मांडव घातलेला असतो त्या मांडवातच हा कार्यक्रम करतात. एका ताम्हणात घरातील देव मांडतात. पाच लोक ते ताम्हण वर खाली असे उचलतात. गावातील अनेक लोक हा विधी पहायला जमतात.

### ७. लग्न

तेलवणीचा विधी झाला की, दुसऱ्या दिवशी लग्नाचा मुख्य विधी असतो. दुसऱ्या दिवशी नवरदेव लग्नासाठी मुलीच्या गावी जातो. कोकणा आदिवासीमध्ये लग्न मुलीच्या दारात लागते. लग्नात नवरा-नवरीच्या डोक्यावर अक्षता टाकतात. या अक्षता वरई व तांदूळ एकत्र करून तयार केल्या जातात.

विवाह प्रसंगी आदिवासी कोंबडाही कापतात.

बाशिंग सुटल्यावर एकदा कोंबडा कापतात आणि मांडव बाटवायला एकदा कोंबडा कापतात. मांडव बाटवणे म्हणजे मांडव काढणे होय. लग्नाचा मांडव उतरताना कोंबडा कापतात.

साखरपुड्यापासून विवाह समारंभापर्यंतच्या कार्यक्रमांना भगत पाहिजेच असे काही नसते. हळदी, तेलवणी, लग्न इ. कार्यक्रम भगताशिवाय होऊ शकतात. तेलवणीला ज्याला देवांची नावे येतात तो कोणीही ताम्हण उचलू शकतो.

कोकणा आदिवासींमध्ये लग्नात नवरा-नवरीला आहेर देण्याची प्रथा आहे. आहेरामध्ये ताट, वाटी, ग्लास इ. वस्तू तसेच पैशाचे पाकीट किंवा पैसे इ. असतात. मुलीकडून लग्नात नवरदेवाला भांडी दिली जात नाहीत. लग्नात स्त्री व पुरूष एकाचवेळी जेवायला बसतात. स्त्रिया वेगळ्या बसतात. पुरूष वेगळे बसतात.

## ८. म्होतूर

कोकणा समाजात म्होतूरला गंधर्वा असेही म्हणतात. कोकणा समाजात मुलीचे लग्न तिच्या आयुष्यात एकदाच होते. एखाद्या पुरूषाने बायको वारल्यामुळे किंवा अन्य कारणामुळे दुसरे लग्न केले तर त्याला लग्न म्हणतात. पण एखाद्या घटस्फोटित स्त्रीने किंवा विधवा स्त्रीने दुसऱ्या पुरूषाशी लग्न केले तर त्याला लग्न न म्हणता म्होतूर असे म्हणतात. एखादीचा नवरा वारला किंवा एखादीला नवऱ्याने सोडून दिले तर तिचा म्होतूर लागतो. लग्न आणि म्होतूर यामध्ये मोठा फरक आहे. म्होतूराला लग्नाप्रमाणे वाजंत्री, अक्षता, मंत्रपाठ नसतात. म्होतुराला ब्राह्मण किंवा मेडिंगा बोलवत नाहीत. ज्या स्त्रीचा म्होतूर लावायचा आहे त्या स्त्रीला आणि त्या पुरूषाला एकमेकांच्या समोर बसवतात. समाजातील आदिवासी स्त्रिया दोघांच्या कपाळाला कुंकू लावतात. पंचांच्या उपस्थितीत म्होतुराचा कार्यक्रम पार पडतो. म्होतूर लागल्यानंतर उपस्थितांना जेवण दिले जाते. परिस्थिती चांगली असेल तर बोकड कापून सर्वांना मटणाचे जेवण दिले जाते. म्होतुरी नवरीची परिस्थिती चांगली नसेल तर डाळ भाताचे जेवण देतात.

म्होतुरीच्या कार्यक्रमाला लग्नाएवढी माणसे नसतात. अगदी थोडे लोक उपस्थित असतात. म्होतूर नवरीच्या घरी लावतात. ज्याच्याबरोबर स्त्रीचा म्होतूर लागणार असतो तो त्या स्त्रीच्या म्हणजे म्होतुरी नवरीच्या घरी दोन ते चार लोकांना घेऊन जातो. जिचा म्होतूर लावायचा आहे तिच्या आई-वडिलांची म्होतूर लावायची ऐपत नसेल तर संबंधित पुरूष तिच्या घरी येऊन तिला तशीच म्होतुरी लावल्याशिवाय घेऊन जातो. म्होतूर न लागता सुद्धा ती स्त्री त्या पुरूषाबरोबर जाते आणि त्याच्याकडे बायकोप्रमाणे राहते. समाजाची या गोष्टीला मान्यता असते. सुमारे चार-पाच वर्षांनी त्यांच्या घरी मग म्होतूर लावला जातो. काहींच्या बाबतीत तर १५ ते २० वर्षांनी म्होतूर लागल्याची उदाहरणे घडली आहेत. म्होतुर लावल्याशिवाय त्यांच्या मुला-मुलींचे लग्न होऊ शकत नाही. जर म्होतूर लागला नाही तर मुला-बाळांच्या लग्नाचा प्रश्न निर्माण होतो. ज्याची मुलगी लग्नाला आली असेल आणि त्याचा म्होतूर लागला नसेल तर त्याला 'तुझा म्होतूर लाव मग तुझी मुलगी करून घेतो' असे सांगितले जाते. आसे ग्रामपंचायतीच्या करोळी या पाड्यावर असा एक प्रश्न निर्माण झाल्याचे तेथील आदिवासींनी मुलाखतीदरम्यान सांगितले. कोकणा समाजातील एका पुरूषाला तीन-चार मुले झाली असून त्यापैकी काही मुले लग्नाला आली आहेत. परंतु त्याचा म्होतूर झालेला नसल्याने त्यांच्या मुलांचा विवाह समाजाने रोखून धरला आहे. त्याचा म्होतूर लागल्याशिवाय पंच मंडळी, समाजातील इतर लोक त्याच्या मुलाला हळद लागू देत नाहीत. म्हणजे लग्न होऊ देत नाहीत. मुला-मुलींची लग्ने व्हावीत यासाठी त्याने एक बोकड आणला

असून लवकरच तो आपला म्होतूर लावणार आहे. अशाप्रकारे त्याचा म्होतूर लागल्यानंतर त्याच्या मुलांचा विवाह करण्यास त्याला समाजाची परवानगी मिळणार आहे.

यासंदर्भात मोखाडा येथे नोकरी करीत असताना मजेशीर किस्से ऐकावयास मिळाले. हायस्कूल व आश्रमशाळेतील काही विद्यार्थी आपल्या शिक्षकांना आई-वडिलांच्या म्होतुरासाठ ी उपस्थित राहण्यासाठी चार-पाच दिवसांची सुट्टी मागत तेव्हा ज्या नव्याने बदलून आलेल्या किंवा नव्याने रूजू झालेल्या बिगर आदिवासी शिक्षकांना आदिवासी समाजातील प्रथा, परंपरा माहिती नसत ते शिक्षक आदिवासी विद्यार्थ्यांना शाळा बुडवण्यासाठी खोटे कारण सांगितले म्हणून कावत असत किंवा मारत असत. परंतु विद्यार्थ्यांकडून आणि जुन्या सहकाऱ्यांकडून म्होतूराची माहिती मिळाल्यानंतर विद्यार्थ्यांना त्यांच्या आई-वडिलांच्या लग्नाला किंवा म्होतूराला उपस्थित राहण्याची परवानगी देत असत. अशा प्रकारे आजही मुलांच्या उपस्थितीत आदिवासींचे म्होतूर किंवा लग्ने होतात. काही ठिकाणी तर आई-वडिलांचा म्होतूर आणि मुला-मुलींचे लग्न एकाच मांडवात लागल्याची काही उदाहरणे आदिवासींनी मुलाखतीत सांगितली.

म्होतुराचा खर्च लग्नापेक्षा खूप कमी असतो. म्होतुराचे २५० रूपये गावकीला द्यावे लागतात. म्होतुराचा जेवणाचा खर्च नवरदेव करतो. नवरीकडे म्होतूर असेल तर जेवणाचा खर्च नवरीचा बाप करतो. दाव्यातील काही रक्कम चहापाण्याला गावकीला द्यावी लागते.

### ९. घरजावई

कोकणा आदिवासींमध्ये घरजावई ठेवण्याचीसुद्धा प्रथा आहे. एखाद्या कुटुंबाला मुलगा नसेल फक्त मुलगी असेल तर तो घरजावई करतो. थोडी-फार शेती आणि बऱ्यापैकी घरदार असेल तर घरजावई ठेवावा लागतो. एखाद्या गरीब तरूणाला घरी आणून ठेवले जाते. तत्पूर्वी कागदपत्र केले जाते. गावातील काही लोक साक्षीदार किंवा पंच म्हणून बोलवले जातात. पंचांसमोर घरजावई म्हणून राहू इच्छिणाऱ्याला काही गोष्टी लेखी स्वरूपात मान्य कराव्या लागतात. तसेच जो घरजावई ठेवणार आहे त्याला काही बाबी लेखी स्वरूपात मान्य कराव्या लागतात. घरजावई ठेवणारा आपल्या भावी जावयाकडून आम्हाला नवरा बायकोला सांभाळले पाहिजे असे पंचादेखत कबूल करून घेतो.' हे घर तुझे, हे शेत तुझे' असे तो भावी जावयाला पंचांसमोर सांगतो. घरजावयाला बायकोच्या आई-वडिलांना मरेपर्यंत सांभाळावे लागते. एखादा घरजावई आपल्या सासू-सासऱ्यांना कराराप्रमाणे सांभाळत नसेल तर घरजावयाच्या विरोधात पोलिसांत तक्रार दिली जाते. जर घरजावई व्यवस्थित काम करीत नसेल, सासू-सासऱ्यांना सांभाळत नसेल तर सासरा पंचांसमक्ष भावी जावयाला 'घर देणार नाही, शेत देणार नाही' असे सांगतो.

### १०. ओटीभरण

एखाद्याने आपल्या बायकोला सोडून दिले असेल म्हणजेच बायकोची नांदण्याची इच्छा असूनही तो नांदवित नसेल तर त्या मुलीचे आई-वडील ही बाब गावच्या पाटलाला किंवा सरपंचाला सांगतात. मग गावातील जाणकार लोक एकत्र बसतात आणि प्रकरण मिटवण्याचा प्रयत्न करतात. जो आपली बायको नांदवत नाही त्याच्या घरी जाऊन चर्चा करतात. 'बायको का नांदवत नाहीस? बायकोची काय चूक आहे?' असे त्याला विचारले जाते. बायकोला नांदवण्याविषयी सर्वजण त्याला समजावून सांगतात. समजावून सांगूनही तो ऐकत नसेल तर त्याला दम देऊन पाहिले जाते. समजावून सांगून आणि दमबाजी करूनही तो ऐकत नसेल तर त्याला ओटीभरण करण्यास सांगतात. जो बायकोची इच्छा असूनही बायकोला नांदवत नाही त्याला १०,०००

रूपये नुकसान भरपाई बायकोला द्यावी लागते. त्याला ओटीभरण असे म्हणतात. लग्नाचे प्रश्न किंवा सोडचिठ्ठीचे प्रश्न गावकीत मिटले नाहीत तर ते प्रश्न पोलिस स्टेशन किंवा कोर्टात जातात.

**११. दावा**

एखाद्याची बायको स्वत:हून नांदत नसेल म्हणजेच नवऱ्याची नांदवण्याची तयारी असूनही त्याच्याबरोबर संसार करत नसेल तर तिच्या आई वडिलांकडून तिच्या नवऱ्याला नुकसान भरपाई म्हणून काही रक्कम द्यावी लागते. त्यास दावा असे म्हणतात. कोकणा आदिवासीमध्ये दाव्याची रक्कम बारा हजार रूपयापेक्षा जास्त असते. एखाद्याची बायको आपल्या नवऱ्याला सोडून तिच्या आई-वडिलांकडे राहत असेल आणि तिने दुसरे लग्न केले नसेल तर दावा तिच्या बापाकडून घेऊन तिच्या नवऱ्याला दिला जातो. परंतु मुलीचा बाप दाव्याची सगळी रक्कम देत नाही. रक्कम देण्यास सुरुवातीला तो टाळाटाळ करतो. गावकऱ्यांनी फारच तगादा लावला तर तो ७०० ते ८०० रूपये मुलीच्या नवऱ्याला देतो. उरलेली रक्कम मुलीने दुसरा नवरा केला की त्याच्याकडून घे असे सांगतो. थोडक्यात मुलीचा बाप दाव्याची सगळी रक्कम देत नाही. थोडीच देतो. त्याची विवाहित मुलगी ज्या पुरूषांशी लग्न करेल त्याच्याकडून दाव्याची रक्कम त्या मुलीच्या पहिल्या नवऱ्याला दिली जाते.

गावातील पंच लोक दाव्याची प्रकरणे हाताळतात. सुमारे चार ते दहा ज्येष्ठ किं वा प्रतिष्ठित लोक पंच म्हणून काम पाहतात. पंच मंडळींमध्ये पाटील, सरपंच इ. असतात. नवरा मुलगा किंवा नवरी बाहेरगावची असेल तर चिठ्ठी पाठवून बोलावतात. गावातीलच प्रकरण असेल तर संबंधितांना कोणाकडून तरी तोंडी निरोप दिला जातो आणि बोलावून घेतले जाते. नवरा-बायकोला समोरासमोर उभे करून न नांदण्याची कारणे विचारली जातात. मुलीला सासरच्याकडून काही त्रास आहे का ते विचारले जाते. आणि त्रास होत असल्याची मुलीने तक्रार केली तर त्याची शहनिशा केली जाते आणि त्रास बंद करण्याची सूचना संबंधितांना दिली जाते. एखाद्याची बायको समजावून सांगूनही ऐकत नसेल, नांदण्यास तयार नसेल तर पंचमंडळी तिच्या बापाला दावा द्यावयास सांगतात. दाव्याची रक्कम पंचाच्या समोर द्यावी लागते. त्यावेळी दाव्याचे पैसे नसतील तर मुलीच्या बापाला सोयीची पडेल अशी तारीख दिली जाते. त्या तारखेला पंचांच्या समक्ष पैसे द्यावे लागतात.

**वारली समाजातील विवाह पद्धती**

वारली समाजात लग्नाचा विधी पाच दिवस चालतो. लग्न ब्राह्मणाकडून लावत नाहीत. मेढिंगा लग्न लावतो. वारल्यांच्या लग्नात भगताला महत्त्वाचे स्थान असते. हळदीच्या दिवशी भगत मुला-मुलीला हळद चढवतात. तो बाशिंग आणि कपडे लत्ता तपासून देतो. अक्षता मंत्रून देतो. जेवण अपुरे पडू नये म्हणून जेवण बनवताना त्यात भगत दोन दाणे मंत्रून टाकतात. नवरदेव काही दाणे जवळ बांधून ठेवतो. हे दाणे पाच दिवस जवळ बांधून ठेवले की त्रास होत नाही. ज्या नवरदेवाचे आई ,वडील मृत पावलेले असतात ते अंगात येतात. त्यावेळी 'घाबरू नको, त्रास होणार नाही, मी आहे, काळजी करू नको'असे भगत नवरदेवाला सांगतो. हळदीला भगत देवपूजा करतात. कुळदेवांची पूजा करतात. हिरव्या देवाला कोंबडा बळी देतात. कोंबडा भगतच कापतात. एक बाटली दारू हिरव्या देवाला लागते. बाकीची दारू भगत पितात. तिथेच कोंबडीचे जेवण भगत व बरोबरच्या लोकांना देतात.

लग्नानंतर पाचव्या दिवशी नवरी तिच्या घरी जाते. परत पाच दिवसांनी म्हणजे दहाव्या दिवशी येते. तिला आणायला नवरदेव व पाच बायका जातात. गाडीची व्यवस्था नसेल तर पायी जातात. लग्नानंतरच्या दहाव्या दिवसाला मूळपाटी असे म्हणतात. त्या दिवशी नवरीला

नवऱ्याच्या घरी आणतात. नवरा व नवरीला तोरणाखाली उभे करतात. एक कोंबडीचे पिलू दोघांच्या पायाखाली मारतात. पहिले दहा दिवस नवरा-नवरीचे संबंध येत नाहीत. दहा दिवसानंतरच संबंध येतात. लग्नानंतर नवरा-नवरी घरातल्या देवांचे दर्शन घेतात. बाहेरगावी किंवा लांब देवदर्शनाला जात नाहीत.

### वारली समाजातील विधवा विवाह

विधवेच्या विवाहाला पाट लावणे असे म्हणतात. नवरदेव साडी-चोळी घेऊन तिच्या घरी जातो. बरोबर गावकरी असतात. तिच्या वडिलांशी चर्चा करतात. 'तुमची मुलगी देणार का? पहिल्या नवऱ्याची मुले आहेत का? कोणाजवळ आहेत? त्यांचा सांभाळ कोण करणार?' इ. सर्व बाबी सर्वासमक्ष ठरवून घेतात. त्यानंतर ती विधवा स्त्री साडी चोळी नेसते व पाच माणसांच्या पाया पडते आणि आजपासून 'मी ह्यांच्या घरी जाते' असे म्हणते. पाहुणे मंडळी मुक्काम करतात. दुसऱ्या दिवशी सकाळी भेटगाठ करून मग त्यांच्या घरी जातात.

### समारोप

लग्न ही आदिवासी त्यांच्या आयुष्यातील अत्यंत महत्त्वाची बाब मानतात. लग्नाच्या वयात मुला मुलींचे लग्न झालेच पाहिजे असे आदिवासींना वाटते. लग्नाचे वय उलटून गेलेल्यांना समाजात किंमत नसते आणि अशा व्यक्तींचे विवाह पुढे होण्याची शक्यताही खूप कमी असते. आदिवासी भागात जेथे नोकरी करीत होतो त्या मोखाडा येथील महाविद्यालयात शिकणाऱ्या काही आदिवासी विद्यार्थ्यांची लग्ने झालेली आणि त्यांना मुले बाळे झालेली आढळून आली. हे विद्यार्थी वसतीगृहात राहून शिक्षण घेत होते. वर्गात शिकवत असताना या विद्यार्थ्यांच्या बायका वर्गासमोर उभ्या राहून आपल्या नवऱ्यांना बाहेर बोलावून त्यांच्याकडून बाजारहाट करण्यासाठी पैसे मागून घेत असत. असे दृश्य अनेकवेळा पहावयास मिळाले. त्यावेळी या विद्यार्थ्यांनी आमच्या आदिवासी समाजात खूप कमी वयात विवाह करावे लागतात असे सांगितले. जर विवाह केला नाही तर पुढे विवाह होत नाही. शिक्षण पूर्ण होण्यापूर्वी विवाह केल्यास अभ्यासावर परिणाम होतो असे त्यांना सांगितले असता त्यांनी इयत्ता अकरावीत शिकणाऱ्या ठाकूर समाजातील एका विद्यार्थ्याला माझ्यासमोर आणून उभे केले आणि मला सांगितले की, याचे आता वय १७ असून शिक्षण चालू असल्यामुळे त्याने लग्न करण्यास नकार दिला.

समाजाच्या मते त्याचे लग्नाचे वय उलटून गेले आहे. त्यामुळे शिकण्याची इच्छा असूनही लग्न करावे लागते. आमची लग्ने झालेली आम्ही शिक्षकांना सांगत नाही. कारण आम्हाला शिकवणाऱ्या शिक्षकांचीच अदयाप लग्ने झालेली नसल्याने आमची लग्ने झाली असे सांगण्यास आम्हाला लाज वाटते. कोकणा, ढोरकोळी, कातकरी, वारली इ. विविध जमातीत १४ व्या १५ व्या वर्षीच मुलीचा विवाह केला जातो. कातकरी जमातीतील एका मुलीचा विवाह वयाच्या १० व्या वर्षी करणार असल्याची माहिती सर्व्हेक्षणात मिळाली. मोखाडा तालुक्यातील खोच या गावात भेटलेल्या कातकऱ्याने सांगितले की, 'चारशे रूपये देऊन मी आठ वर्षाची पोरगी आणली आहे. माझ्या मुलाचे आता वय १० वर्षाचे आहे. मुलीचे वय दहा वर्षाचे झाले की तिचे मी मुलाबरोबर लग्न लाऊन देणार आहे. एकूण ८०० रू. मुलीच्या आज्जीला दयायचे असे ठरले आहे. लग्न झाल्यानंतर चारशे रूपये देणार आहे.' अशाप्रकारे वयाच्या आठव्या, दहाव्या वर्षीसुद्धा काही जमातीतील मुला-मुलींचे विवाह होतात. शिक्षण घेणाऱ्या आदिवासी विद्यार्थ्यांना सुद्धा विवाहाच्या बाबतीत समाजाच्या किंवा गावपंचायतीच्या विरोधात जाण्याचे धाडस करता येत नाही. त्यांना लवकर लग्न करावे लागते.

• • •

# आदिवासी (वारली) समाजातील न्यायपंचायत

**डॉ. जयवंत इंगळे**

**प्रास्ताविक**

भारतातील जवळ-जवळ सर्व आदिवासी जमातीमध्ये आपापल्या जमातीतील भांडण-तंटे सोडविण्यासाठी ठराविक लोकांची एक समिती असते. न्यायदान करणे हे या समितीचे प्रमुख कार्य असते. या समितीला किंवा संघटनेला 'न्यायपंचायत' असे म्हणतात. मोखाडा तालुक्यात महादेव कोळी, ढोर कोळी,कातकरी, वारली, कोकणा, म ठाकूर, क ठाकूर, इ. विविध सात आदिवासी जमाती असून प्रत्येक जमातीची स्वत:ची अशी काही वेगळी वैशिष्ट्ये आहेत. त्यामुळे प्रत्येक आदिवासी जमातीची न्यायव्यवस्था सुद्धा स्वतंत्र आहे. मोखाडा तालुक्यातील सात जमातींपैकी 'वारली' जमातीच्या न्यायदान यंत्रणेची माहिती दिली आहे. वारली जमातीच्या न्यायपंचायतीचा अभ्यास करताना असे आढळले की, त्या जमातीतील आदिवासी न्यायपंचायतीला 'समाज' असे म्हणतात. वारली आदिवासींच्या पंचायतीच्या कामकाजाची माहिती थोडक्यात खालीलप्रमाणे दिली आहे.

**रचना आणि कार्यक्षेत्र**

मोखाडा तालुक्यातील वारली समाजाच्या पंचायतीत एक अध्यक्ष, एक उपाध्यक्ष, एक चिटणीस, एक सरचिटणीस आणि वीस ते एकवीस पंच किंवा सदस्य आहेत. भौगोलिक दृष्ट्या तालुक्याचे विविध विभाग पाडले असून त्या प्रत्येक विभागातील एका तरी व्यक्तीला पंचायतीत स्थान मिळेल याची दक्षता घेतली आहे. तालुक्यातील सर्व आदिवासींना पंचायत आपली वाटावी आणि पंचायतीचे काम सुलभपणे चालावे हा त्यामागचा उद्देश असतो. पंचायतीतील



पंचावर प्रामुख्याने त्याच्या विभागाची जबाबदारी असते.

वारली समाजाचे किंवा पंचायतीचे कार्यक्षेत्र प्रामुख्याने एक तालुका हे आहे. १९३५ पासून समाजाचे कार्यक्षेत्र तालुका बनले. त्यापूर्वी म्हणजे १९३५ पर्यंत तालुक्यात अनेक पंचायती असत. एकाच तालुक्याचे विविध विभाग पाडून त्या त्या विभागाची स्वतंत्र पंचायत असे. सध्या समाजाचे किंवा पंचायतीचे काम तालुका पातळीवर चालत असले तरी प्रत्येक गावांसाठी एक गावकमिटी आहे. या गावकमिटीचे कार्यक्षेत्र त्या गावापुरतेच मर्यादित आहे. साधारणपणे तालुका पातळीवर कार्य करणाऱ्या पंचायतीचा पंच हा गावकमिटी नेमतो. गावपंचायतीत चार ते पाच पंच किंवा लोक असतात. यामध्ये पोलीस पाटील, सरपंच इ. असतात. गावपंचायतीतही काही प्रश्न सोडिवले जातात. गावपंचायतीत प्रश्न सुटले नाहीत किंवा एखाद्याला गावापंचायतीचा निर्णय अमान्य असेल तर तो तालुका पातळीवरील पंचायतीकडे म्हणजे समाजाच्या संघटनेकडे जातो. जरी गावपंचायत अस्तित्वात असली तरी महत्वाच्या सर्व प्रश्नांची

सोडवणूक तालुका पातळीवरील पंचायतीमध्येच केली जाते.

गाव पातळीवर आणि तालुका पातळीवर ज्याप्रमाणे वारली आदिवासींची न्यायनिवाडा करणारी यंत्रणा आहे त्याप्रमाणेच जिल्हा पातळीवरही आता अशी न्याय संस्था स्थापन करण्यात आली आहे. परंतु ठाणे जिल्ह्यात १३ ते १४ तालुके असूनही सध्या केवळ चारच तालुक्यातील पंचायती जिल्हा पातळीवरील संस्थेच्या सभासद आहेत. जरी जिल्हा पातळीवर संघटना स्थापन झाली असली तरी आदिवासींचे भांडण-तंटे तालुका पातळीवरील पंचायत किंवा संघटनाच सोडविते. जिल्हा पातळीवरील संघटनेच्या बैठका नियमित भरत नाहीत. दोन-चार महिन्यातून एकदा बैठक बोलावली जाते. या बैठकीत समाजाची सुधारणा कशी होईल यावर आणि समाजाच्या प्रश्नांवर चर्चा केली जाते.

### पंचांची निवड

न्याय पंचायतीत अध्यक्ष, उपाध्यक्ष, चिटणीस आणि काही पंच असतात. त्यास पंचायतीची कार्यकारिणी असे म्हणतात. तालुक्याचे तीन वर्षातून एकदा जे आधिवेशन भरते त्यात कार्यकारिणीची निवड केली जाते. कार्यकारिणीतील सदस्यांची मुदत तीन वर्षे असते. तीन वर्षानंतर पंचांची फेरनिवड होऊ शकते. कार्यकारिणीची मुदत तीन वर्षे असली तरी बरेचजण वर्षानुवर्षे पंचायतीच्या कार्यकारिणीवर पंच म्हणून कार्यरत असतात. वार्षिक अधिवेशनास उपस्थित असलेल्या आदिवासींना अध्यक्ष आणि पंच निवडण्याचा अधिकार दिला असला तरी त्याचे फारसे पालन होत नाही. अधिवेशनाच्या आदल्या दिवशी पंचायतीशी संबंधित मोजक्या मंडळींची एक बैठक होते. या बैठकीत उपस्थित पंच आणि अन्य अनुभवी, वृद्ध लोक अध्यक्ष ठरवतात. तसेच चिटणीसाला लिखाणाचे काम करायचे असल्याने तो थोडा-फार शिकलेला असावा लागतो. म्हणून चिटणीसाची निवडसुद्धा खुल्या अधिवेशात न करता पंच मंडळी आदल्या दिवशीच करतात. तसेच काही लोकांना पंच म्हणून अगोदरच निश्चित करतात आणि या लोकांची यादी अधिवेशनात जमलेल्या आदिवासींना वाचून दाखवली जाते. त्याचबरोबर आणखी कोणाला पंच म्हणून काम करावयाचे आहे काय? असे अधिवेशनात उपस्थित असलेल्या आदिवासींना विचारले जाते व त्यांनी काही नावे सुचवली तर त्यांच्याही नावांचा विचार पंच म्हणून केला जातो. पंचायतीचे कामकाज पाहणाऱ्या व्यक्तीवर आदिवासींचा विश्वास असल्याने त्यांनी सुचविलेल्या नावांना आदिवासी आक्षेप घेत नाहीत किंवा काही विरोध करत नाहीत.

### पात्रता

ज्याला पंचायतीचा पंच करायचे आहे त्याच्या अंगी विशेष पात्रता असावी लागते. शैक्षणिक पात्रता ही गौण मानली जाते. व्यक्तीच्या शिक्षणापेक्षा व्यक्तीचे सामाजिक कार्य पाहिले जाते. शिक्षण कमी असले किंवा अगदी काहीही नसले तरी पंच होता येते. परंतु त्या अल्पशिक्षित किंवा अशिक्षित व्यक्तीला आदिवासी समाजात आदराचे स्थान असले पाहिजे. पंच होण्यास इच्छुक असणाऱ्या व्यक्ती आदिवासींच्या दृष्टीने आदरणीय असल्या पाहिजेत. आपल्या समाजाबद्दल त्याला ममत्व असले पाहिजे. समाजाच्या प्रगतीबद्दल तळमळ आणि आस्था असली पाहिजे. समाजाचे प्रश्न सोडवण्यासाठी त्याच्याकडे वेळ असला पाहिजे आणि त्यासाठी स्वत:चे थोडे पैसे खर्च करण्याची तयारी असली पाहिजे. बैठकीचे कामकाज लिहिता यावे

यासाठी पंचायतीच्या कार्यकारणीवर काही शिकलेल्या व्यक्तींना पंच म्हणून स्थान दिले जाते. साधारणपणे शिक्षकाचे काम करणाऱ्या व्यक्ती आणि निवृत्त शिक्षकांना पंच म्हणून नेमले जाते. सध्याच्या वारली पंचायतीत दहावी पास झालेले चार ते पाच पंच असून एक पंच पदवीधर आहे. पंच म्हणून काम करणारी व्यक्ती निर्व्यसनी असली पाहिजे अशी कोणतीही अट नसते. बहुतेक सर्व पंचांना दारू आणि तंबाखू यांचे व्यसन असतेच. दारू पिणे किंवा तंबाखू खाणे आदिवासी समाजात कमीपणाचे मानले जात नाही.

**स्वतंत्र इमारतीशिवाय काम**

वारली पंचायतीचे ठळक वैशिष्ट्य म्हणजे पंचायतीला स्वंतत्र अशी इमारत किंवा कार्यालय नाही. पंचायतीची जी कार्यकारिणी असते त्यापैकी कोणाच्या तरी घरी पंचायतीचे दप्तर ठेवले जाते. कार्यकारिणीमधील जी व्यक्ती थोडीफार शिकलेली असते तिच्याकडे पंचायतीची कागदपत्रे असतात. थोडक्यात पोलीस स्टेशन आणि न्यायालयांना जशी स्वतंत्र, कायमस्वरूपी इमारत असते तशी वारली पंचायतीला नसते. तालुका पातळीवरील पंचायत तालुक्यात विविध ठिकाणी भरत असते आणि तेथे न्यायनिवाड्याचे काम करीत असते. अशाप्रकारे वारली पंचायत ही फिरती (Mobile) स्वरूपाची असते.

**पंचायतीच्या बैठका**

भांडण तंट्याचे प्रश्न सोडविण्यासाठी गावागावात पंचायत भरवली जातेच. पण त्याव्यतिरिक्त साधारणपणे महिन्यातून एकदा वारली पंचायतीची बैठक होते. या बैठकीत तालुक्यातील सर्व आदिवासी पंच एकत्र येतात. ही बैठक अध्यक्षांच्या घरी किंवा एखाद्या पंचाच्या घरी बोलावली जाते. या बैठकीत पंचायतीचा चिटणीस मागच्या बैठकीचा अहवाल वाचतो. या बैठकीत समाजाच्या प्रश्नांवर चर्चा केली जाते. तसेच ज्येष्ठ, अनुभवी आजी व माजी पंच पंचायतीच्या सदस्यांना मार्गदर्शन करतात. एखाद्या भांडण-तंट्याचा निवाडा कसा करावा? कसा निकाल द्यावा? यावर बैठकीत चर्चा केली जाते.

**पंचायतीची अधिवेशने**

मासिक बैठकीबरोबरच वारली पंचायतीची वार्षिक आणि त्रैवार्षिक अधिवेशनेही भरवली जातात. या अधिवेशनात आदिवासी समाजातील नावलौकिक मिळविलेले पुढारी, सामाजिक कार्यकर्ते आदिवासींना मार्गदर्शन करतात. समाजातील अंधश्रद्धा, वाईट प्रथा याविषयी आदिवासींचे प्रबोधन केले जाते. एकमेकांच्या अडी-अडचणी समजून घेण्यासाठी या अधिवेशनांचा आदिवासींना उपयोग होतो. अधिवेशनाच्या निमित्त एकत्र येण्यामुळे एकोपा वाढतो.

**कर्मचाऱ्यांशिवाय कामकाज**

पोलीस आणि कोर्ट यांच्याकडे जसे स्वतंत्र कर्मचारी असतात तसे वारली पंचायतीकडे नोकरदार कर्मचारी नाहीत. आपली नोकरी, शेती व इतर व्यवसाय सांभाळून पंचमंडळी न्याय-निवाड्याचे काम करतात. समाजाच्या आस्थेपोटी ते हे काम विनामोबदला करतात. कायम स्वरूपी पगारी नोकर पंचायतीच्या पदरी नाहीत. ज्यांच्याबद्दल पंचायतीकडे तक्रार आलेली असते त्याला एखाद्या पंचामार्फत निरोप पाठविला जातो किंवा चिठ्ठी दिली जाते. पोलीस, कोर्ट यांच्यासारखी स्वतंत्र यंत्रणा नसली तरी पंचायतीचे काम सुलभपणे चालते.

**लेखी तक्रार आवश्यक**

पंचायतीचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे

समाजातील आदिवासीकडून भांडण-तंट्याची लेखी तक्रार आल्याशिवाय पंचायत भरवली जात नाही. उदाहरणार्थ एखाद्याची बायको पळून गेलेली असेल, एखादा बायकोला सांभाळत नसेल, अशा तक्रारी लिखित स्वरूपात संबंधित व्यक्तींनी पंचायतीकडे करणे आवश्यक असते. तक्रार आल्यानंतरच पंचायत अशा प्रश्नात लक्ष घालते. थोडक्यात ज्यांच्यावर अन्याय झालेला आहे त्या व्यक्तींनी पंचायतीकडे लेखी तक्रार केल्याशिवाय पंच मंडळी भांडणतंटे सोडविण्यात पुढाकार घेत नाहीत.

तक्रारी आल्यानंतर पंचायत स्वत: बैठक भरवतेच. पण त्याचबरोबर लोकांनी मागणी केल्यानंतर सुद्धा पंचायतीकडून बैठका भरवल्या जातात. आदिवासींचा पोलीस व कोर्ट यापेक्षा पंचायतीवर प्रचंड विश्वास आणि श्रद्धा असल्याने बऱ्याचवेळा आदिवासी लोकच संघटनेकडे पंचायत भरवण्यासाठी मागणी करतात. 'आम्ही सर्व व्यवस्था करू, आमच्या गावात पंचायत भरवा' असा आग्रह ठिकठिकाणच्या आदिवासींकडून पंचायतीला केला जातो.

**सक्तीचा अभाव**

समाजातील व्यक्तींनी न्यायनिवाड्यासाठी किंवा आपले प्रश्न सोडविण्यासाठी आपणाकडेच आले पाहिजे असे कोणतेही बंधन पंचायतीचे नसते. लोकांनी पंचायतीकडे यावे असे पंचांना वाटत असते. परंतु ज्यांना पोलीसात किंवा कोर्टात जायची इच्छा असते त्यांना अटकाव केला जात नाही. थोडक्यात पंचायतीकडे तक्रारीसाठी यावे अशी सक्ती पंचाकडून आदिवासींवर केला जात नाही. परंतु जे पंचांयतीत न जाता पोलीसात किंवा कोर्टात जातात ते कंटाळून परत पंचायतीकडे येतात व पंचायतीचा निर्णय मान्य करतात.

**''नोटीस'' चा अवलंब**

एखाद्याची तक्रार आल्यानंतर त्या तक्रारीवर पंच मंडळी विचार करतात. ज्याच्याविरूद्ध तक्रार असते त्यास नोटीस देऊ न तक्रारीची कल्पना दिली जाते. पंचायतीचे बोलावणे आले की, ती व्यक्ती ठरलेल्या ठिकाणी ठरलेल्या दिवशी हजर होते. अगदी तोंडी बोलावणे पाठवले तरी पंचायतीच्या बैठकीला आदिवासी उपस्थित राहतात.

ज्याच्याबद्दल तक्रार आहे ती व्यक्ती पंचायतीने नोटीस देऊनही आली नाही तर त्या व्यक्तीला पुढच्या बैठकीत बोलावले जाते. बैठकीच्या दिवशीच त्याचे महत्वाचे काम निघाले असेल आणि त्याला बैठकीस अनुपस्थित राहावयाचे असेल तर तो गैरहजर राहू शकतो. गावात किंवा समाजात आदिवासींना रहावयाचे असल्याने पंचायतीच्या नोटीसा आदिवासी अव्हेरत नाहीत.

समाजातील एखादा अरेरावी करणारा असेल तर तो मात्र पंचायतीच्या बैठकीला नोटीसा पाठवूनही हजर राहत नाही. असे असले तरी पंचायत त्याला दमदाटी करून बैठकीच्या ठिकाणी आणत नाही. किंवा त्याच्या इच्छेविरूद्ध केस चालवत नाही. शंभरात एखादा अरेरावी करणारा असतो. अशावेळी तक्रारदाराची किंवा अन्यायग्रस्ताची बाजू खरी असूनही पंचायत त्याला न्याय देऊ शकत नाही. कारण ज्याच्यावर तक्रार आहे तो आणि तक्रादार असे दोन्ही पक्ष उपस्थित राहिल्याशिवाय पंचायतीचे कामकाज सुरू होत नाही. असे प्रसंग उद्‌भवल्यास पंचायत तक्रारदाराला आपली तक्रार पोलीसात किंवा कोर्टात नेण्याचा सल्ला देतात.

**बैठकीची जागा**

तक्रारदारांना आणि ज्यांच्यावर तक्रार केली

आहे त्यांना सोयीची पडेल अशा गावात पंचायत भरवण्याचा निर्णय घेतला जातो. ज्या गावात बैठक भरवायची निश्चित केलेले असते त्या गावातील समाज मंदिरात किंवा एखाद्याच्या घरात बैठक भरवली जाते. भांडण-तंट्याच्या संदर्भातील बैठकीचे निमंत्रण फक्त कार्यकारिणीतील लोकांनाच म्हणजे पंचमंडळीनाच असते. याशिवाय फिर्यादी व आरोपी यांनाही निमंत्रण असते. फिर्यादी व आरोपीची मित्र मंडळी, नातेवाईक किंवा अन्य लोकही पंचायतीचे कामकाज पाहू शकतात. परंतु जेव्हा पंचायतीसमोर कोणतीही तक्रार नसते तेव्हा बोलावलेल्या बैठकीत पंचमंडळी व्यतिरिक्त कोणालाही निमंत्रण नसते.

### बैठकीचे नियम

पंचायतीचे कामकाज विनाअडथळा सुरळीतपणे पार पडावे यासाठी पंचायतीच्या बैठकांना उपस्थित असणाऱ्यांना काही गोष्टींचे पालन करावे लागते. उदाहरणार्थ आरोपी व फिर्यादी यांनी बैठक संपेपर्यंत किंवा पंचमंडळी जोपर्यंत जाण्याची परवानगी देत नाहीत तोपर्यंत थांबावे लागते. विनापरवानगी बैठक अर्ध्यावर सोडून आपल्या गावी जाता येत नाही. तसे केल्यास पंच किंवा पंचायतीचा तो अपमान समजला जातो. पंचायतीच्या बैठकीस उपस्थित असणाऱ्या पंचासहित सर्वांनी दारूच्या नशेत असू नये. असा एक पंचायतीचा नियम आहे. एखाद्याने दारू पिऊन पंचाशी वाद केला तर पंचायत त्यास ५१ रूपयांचा दंड करते. अशा प्रकारे पंचायतीच्या बैठकीचे काही नियम असतात. बहुतेक सर्व आदिवासी पंचायतीचे नियम पाळतात. पंचांचा अवमान करत नाहीत.

### बैठकीचा प्रारंभ

पंचमंडळी, फिर्यादी व आरोपी असे सर्वजण जमल्यानंतर पंचायतीच्या बैठकीस सुरूवात होते. लगेच न्यायनिवाड्यास सुरूवात होत नाही. पंचायतीचे अध्यक्ष किंवा चिटणीस चार शब्द बोलून बैठकीस सुरूवात करतात. प्रास्ताविकात ज्या तक्रारी आलेल्या असतात त्या तक्रारींची थोडक्यात माहिती दिली जाते आणि पंचायतीच्या कामकाजाला सुरूवात केली जाते.

### फिर्यादी व आरोपीलाच बाजू मांडण्याचा अधिकार

सरकारी न्यायालयात ज्याप्रमाणे आपली बाजू मांडण्यासाठी तक्रारदार किंवा आरोपी वकीलांची नेमणूक करू शकतो तसे पंचायतीसमोर बाजू मांडताना परवानगी नसते. आदिवासींना स्वत:ची बाजू स्वत: मांडावी लागते. आपली बाजू मांडण्यासाठी अन्य कोणाची नेमणूक करता येत नाही. तसेच गरीब, अशिक्षित आदिवासींनाही अन्य कोणी आपली बाजू मांडावी याची गरज भासत नाही. पंचायतीसमोर आपली बाजू मांडताना अगदी निरक्षर आदिवासी सुद्धा दबकत किंवा घाबरत नाहीत. कारण पंच म्हणून काम करणारे सर्वजण आदिवासींपैकीच असतात. तसेच पंचायतीची बैठक एखाद्या आदिवासीच्याच घरात किंवा समाज मंदिरात भरत असल्याने आणि बैठकीस फक्त आदिवासीच उपस्थित राहत असल्याने भांडण-तंट्याशी संबंधित आदिवासीवर कोणाचेही कोणतेही दडपण नसते.

### वेळेचे बंधन नाही

बैठकीत आपली बाजू मांडणाऱ्यावर पंचायतीचे वेळेचे कोणतेही बंधन नसते. कमी बोलू दिले म्हणून निकाल आपल्या विरोधात गेला किंवा आपल्यावर अन्याय झाला असे कोणाला वाटू नये म्हणून पंचायत वेळेचे बंधन घालत नाही. एकाचे बोलणे पूर्ण झाल्याशिवाय दुसऱ्या व्यक्तीस बोलू दिले जात नाही. एखादा बोलत असताना दुसरा मध्येच बोलू लागला

तर त्याला तसे न करण्याविषयी समजावून सांगितले जाते. तसेच वेळप्रसंगी त्याला तोंडी समजही दिली जाते.

### वकीली युक्तीवादास स्थान नाही

कोर्टात काही वकील मंडळी युक्तीवाद करून खऱ्याचे खोटे किंवा खोट्याचे खरे करत असतात. त्यामुळे प्रामाणिक किंवा गरीब व्यक्तीला न्याय मिळत नाही. तसे वारली पंचायतीपुढे होत नाही. एखादा शिकलेला आदिवासी केवळ वकिली युक्तीवाद करून आपली खोटी बाजू खरी असल्याचे भासविण्यात म्हणजे एक प्रकारे पंचायतीवर दबाव आणण्यात यशस्वी होऊ शकत नाही. थोडक्यात कोणी वकीली युक्तीवाद करून पंचायतीला फसवू शकत नाही. नुसत्या युक्तीवादापेक्षा कोण खरे आणि कोण खोटे हेच पाहिले जाते. त्यामुळे दुबळ्या किंवा गरीब, निरक्षर व्यक्तीवर पंचायतीकडून अन्याय होत नाही.

### साक्षीदारांना महत्त्व

काही गुन्ह्यात पंचायतीला साक्षीदारही तपासावे लागतात. विशेषत: नवरा-बायकोच्या भांडणाच्या तक्रारी सोडवताना केवळ तक्रार करणाराचे मत पंचायत विचारात घेत नाही. उदाहरणार्थ एखाद्या स्त्रीने नवरा रोज मारझोड करतो अशी तक्रार पंचायतीकडे केली असेल किंवा एखाद्या पुरूषाने आपल्या पत्नीच्या वागणुकीबद्दल, चारित्र्याबद्दल तक्रार केली असेल तर पंचायत तक्रारदारांच्या घराशेजारी राहणाऱ्या लोकांना साक्षीसाठी बोलावते. आणि संबंधिताने केलेली तक्रार खरी आहे की खोटी ते पाहिले जाते. पूर्ण चौकशी करूनच पंचायत निर्णय देते. कोणावरही अन्याय होऊ नये हा त्यामागचा उद्देश असतो. पूर्वीच्या काळी आदिवासी पंचायत गुन्हा कबूल करण्यासाठी संबंधित व्यक्तीला माळावर उभे करून तिच्या डोक्यावर अर्धा मण किंवा एक मण वजनाचा दगड ठेवत असे. गुन्हा कबूल करेपर्यंत तिच्या डोक्यावर दगड ठेवला जात असे. आता अशा पद्धतीचा अवलंब केला जात नाही. सर्वांना मान्य होईल अशा पद्धतीने गुन्हयाचा तपास केला जातो किंवा आदिवासींच्या तक्रारीची शहानिशा केली जाते. अशाप्रकारे बदलत्या काळाचे भान ठेवण्याचा प्रयत्न पंचायतीकडून केला जातो.

### निर्णय एकमताने

फिर्यादी व आरोपी दोन्ही पक्षांचे म्हणणे ऐकून पंचमंडळी निर्णय घेतात. दोन्ही पक्षांना आपले म्हणणे मांडण्याची पुरेपूर संधी दिली जाते. एका दिवसात म्हणणे मांडून झाले नाही तर त्या प्रश्नांसाठी पुन्हा पंचायत भरवली जाते. अशा प्रकारे सर्वांचे म्हणणे ऐकूण पंचमंडळी एकमताने निर्णय किंवा निकाल देतात.

### निर्णय लेखी स्वरूपात

भांडणाचा किंवा तक्रारीचा निर्णय पूर्वी तोंडी दिला जात असे. आता निकाल लेखी स्वरूपात शक्यतो बैठकीच्या जागीच देतात. निकालपत्रावर उपस्थित सर्व पंचाच्या सहया असतात. निकालपत्राचे वाचन पंचायतीचा चिटणीस करतो किंवा लिखाण काम करणारा एखादा पंच करतो. निकालपत्रावर फिर्यादी व आरोपीच्या सहया घेऊन त्यांना निकालपत्राची झेरॉक्स दिली जाते. पंचायतीचे निर्णय नि:पक्षपातीच असतात. तरी कधी-कधी निर्णय देताना थोडासा वाद होतो. त्यामुळे निर्णय तहकूब केला जातो व पुन्हा बैठक भरवून निकाल दिला जातो. निकालानंतर भांडणे होऊ नयेत यासाठी निकाल कसा योग्य आहे ते समजावून सांगितले जाते.

## गुन्हयाचे स्वरूप पाहून शिक्षा

पंचायतीचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे पंचायत निकाल देताना किंवा शिक्षा देताना आरोपीने केलेल्या गुन्हयाचे स्वरूप पाहते. आरोपीची आर्थिक स्थिती पाहिली जात नाही. याचा अर्थ एखादा आरोपी आर्थिक दृष्ट्या फार सधन असेल तर त्याला जबर दंड आकारला जात नाही. त्याचे गुन्हयाचे स्वरूपच फक्त पाहिले जाते.

## निकालाचे स्वरूप

पंचायतीच्या निकालाचे किंवा निवाड्याचे स्वरूप प्रामुख्याने खालीलप्रमाणे असते.

१) एखाद्याला त्याच्या बायकोपासून मूल बाळ होत नसेल तर त्याला दुसऱ्या लग्नास पंचायत परवानगी देत नाही. परंतु पंचायतीला चोरून त्याने जर दुसरे लग्न केले तर पंचायत काही करू शकत नाही. अनेक आदिवासी पुरूष पहिल्या बायकोपासून मूलबाळ होत नाही अशा कारणावरून दुसरा विवाह करत असतात. पंचायतीचे पंचही आदिवासीच असल्याने एखाद्याने मुला-बाळासाठी दुसरे लग्न केले तर त्यांना त्यात फारसे वावगे वाटत नाही. जर अशा प्रकरणात संबंधित पुरूषाच्या पहिल्या बायकोची पंचायतीकडे नांदवत नाही किंवा व्यवस्थित नांदवत नाही, मारहाण करतो अशी तक्रार आली तर त्यास पंचायत बोलावून घेते आणि दुसऱ्या बायकोप्रमाणेच पहिल्या बायकोला सुद्धा चांगल्या प्रकारे नांदवण्याची समज देते. परंतु पंचायत दुसरा विवाह रद्दबातल ठरवत नाही. म्हणजेच त्या पुरूषास दुसऱ्या बायकोला सोडून देण्याचा आदेश देत नाही. कारण तसे केले तर दुसऱ्या स्त्रीवर अन्याय होतो.

२) एखादी मुलगी लग्नाअगोदर गरोदर राहिली असेल आणि ज्याच्यापासून ती गरोदर राहिली आहे त्याने लग्न करण्यास नकार दिला किंवा संबंधित मुलीच्या पोटातील गर्भ आपला नाही असे सांगितले तर ती केस जेव्हा पंचायतीपुढे येते तेव्हा पंचायत गर्भ नाकारणाऱ्या पुरूषाच्या जबानीला महत्त्व देत नाही तर त्या मुलीच्या जबानीस महत्त्व देते. मुलगी ज्याचे नाव घेईल त्याला जबाबदार धरले जाते व त्याला पंचायतीकडून कडक शब्दात समज दिली जाते. गरोदर मुलीबरोबर लग्न करण्याचा आदेश पंचायतीकडून संबंधित जबाबदार पुरूषाला दिला जातो. पंचायतीने आदेश दिल्यानंतर त्याला तक्रारदार मुलीबरोबर लग्न करावे लागते.

३) एखाद्या विवाहित स्त्रीवर बलात्कार झाला असेल तर बलात्कार करणाऱ्याला गावपंचायत ५०० रूपये ते १००० रूपये एवढा दंड करते.

४) पहिल्या पत्नीला सोडून देऊन किंवा तिला घरातून हाकलून देऊन एखाद्याने दुसरा विवाह केला किंवा लग्न न करता पहिली बायको असताना दुसऱ्या स्त्रीला तशीच ठेवून घेतली आणि ती तक्रार पंचायतीपुढे आली तर पंचायत दोघींनाही नांदवण्यास सांगते. पहिल्या पत्नीला टाकून देऊ नये असा आदेश देते. त्यामुळे पहिल्या पत्नीवर अन्याय होत नाही.

५) नवरा असताना त्याचा संसार सोडून एखाद्या स्त्रीने पळून जाऊन दुसरा विवाह केला किंवा ती स्त्री तशीच दुसऱ्या पुरूषाबरोबर जाऊन

राहिली तर त्या स्त्रीला पंचायत शिक्षा देते. नवऱ्याला सोडून पळून गेलेली स्त्री गावातच किंवा आसपास कोणाकडे राहत असेल तर त्याच्याकडून दावा घेतला जातो व तो पहिल्या नवऱ्याला दिला जातो. 'दावा'म्हणजे पंचायतीने ठरविलेली विशिष्ट रक्कम किंवा नुकसान भरपाई होय.

जर एखादी स्त्री नवऱ्याला सोडून आई-बापाकडे रहायला गेली असेल व नांदायला येण्यास इच्छुक नसेल तर तिच्या आईबापाकडून नुकसानभरपाई वसूल केली जाते व तिच्या नवऱ्याला दिली जाते. परंतु नवऱ्याला सोडून पळून गेलेली स्त्री पंचायतीच्या कक्षेच्या बाहेर दूरवर गेली असेल तर पंचायतीला काही कारवाई करता येत नाही. दूरच्या जिल्ह्यातील एखाद्या गावात ती स्त्री असल्याचा सुगावा लागला तर त्या गावातील पंचायतीकडे दाद मागितली जाते. दोन्ही गावच्या पंचायती एकत्र बसून त्यावर निर्णय घेतात.

एखाद्या विवाहित स्त्रीने नवरा सोडून दिला असेल किंवा ती नांदत नसेल तर तिला नवऱ्याला १०५५१ रूपये द्यावे लागतात. त्यास ''दावा' असे म्हणतात.

एखाद्या अदिवासी पुरूषाने आपली लग्नाची बायको सोडून दिली तर त्या पुरूषाला त्याच्या बायकोला १०५५१ रूपये द्यावे लागतात. त्यास ''ओटीभरणी' म्हणतात.

६) नवरा बायको दोघांची संमती असेल तरच सोडचिठ्ठी दिली जाते. सोडचिठ्ठी ऐवजी नवरा-बायकोमध्ये समेट घडवून आणण्याचाच पंचायतीकडून प्रयत्न केला जातो.

### तडजोडीवर अधिक भर

पंचायतीमध्ये तक्रारदारांच्या तक्रारी तडजोडीने सोडविण्यावर अधिक भर दिला जातो. पंचमंडळी दोन्ही पार्टीमध्ये तडजोड घडवून आणण्याचाच अधिक प्रयत्न करतात. दोन्ही पक्षांना मान्य होईल अशी तडजोड करण्याचा प्रयत्न केला जातो. उदाहरणार्थ घटस्फोटासाठी किंवा काडीमोडासाठी पंचायतीकडून आलेल्यांना त्यापासून परावृत्त केले जाते. एखादा बायकोला नांदवत नसेल, घटस्फोट मागत असेल तर त्याचे मन वळवले जाते. अशाप्रकारे तडजोडीवर अधिक भर देऊन आपल्या निकालाने कटूता निर्माण होणार नाही आणि समाजात भांडणे होणार नाहीत याची काळजी पंचमंडळी घेत असतात.

### अघोरी शिक्षेचा अभाव

पूर्वीच्या काळी आदिवासी पंचायती गुन्हेगारांना अघोरी शिक्षा फर्मावत असत. उदाहरणार्थ पूर्वी पंचायत एखाद्याला जमातीतून किंवा समाजातून काढून टाकत असे किंवा बहिष्कृत करत असे. पंचायतीने अशी शिक्षा दिली की समाज त्याला व त्यांच्या कुटुंबाला वाळीत टाकत असे. त्यामुळे संबंधित आदिवासीला जगणे अशक्य होत असे. परंतु गुन्हेगारांना आता अशा शिक्षा पंचायतीकडून सुनावल्या जात नाहीत. समज देणे किंवा कडक शब्दात ताकीद देणे, आर्थिक दंड करणे, ज्याच्यावर अन्याय झाला असेल त्याला त्या त्या प्रमाणात नुकसानभरपाई संबंधिताला देण्यास भाग पाडणे, विशिष्ट कालावधीत नुकसान भरपाई कोणी देत नसेल तर त्या रकमेएवढी त्याची गुरे-ढोरे जप्त करण्याची परवानगी देणे अशा सर्वांना मान्य होतील अशा शिक्षा फर्मावल्या जातात. परंतु एखादा जीवनातून उठेल अशी अघोरी शिक्षा मात्र पंचायतीकडून केली जात नाही. कारण आता पंचायतीत न्यायनिवाडा करणारे सुशिक्षित व नोकरदार आदिवासीसुद्धा आहेत. तसेच पोलीस, न्यायालय, सेवाभावी संस्था, सामाजिक

कार्यकर्ते आदिवासी भागात काम करीत असल्यामुळे अघोरी शिक्षेची अंमलबजावणी होऊ शकणार नाही याची जाण पंचायतीला आहे.

### अपील सुविधेचा अभाव

तालुका पातळीवरील पंचायतीने दिलेला निर्णय अंतिम असतो. त्या निर्णयावर परत त्याच पंचायतीकडे अपील करता येत नाही किंवा पंचायतीने एकदा निर्णय दिल्यानंतर संबंधिताने मागणी करूनही पुन्हा बैठक भरवली जात नाही. आधुनिक किंवा सरकारी न्यायव्यवस्थेत निर्णय मान्य नसेल तर जसे अपील करता येते तसे पंचायतीच्या निर्णयाबाबत करता येत नाही किंवा सध्यातरी तशी व्यवस्था अस्तित्वात नाही. ज्याला पंचायतीचा निर्णय मान्य नसतो त्याला कोर्टात जाण्याची पंचायतीची परवानगी असते. परंतु पंचायत अपील स्वीकारून एकदा दिलेल्या निर्णयावर फेरविचार करत नाही. एखाद्या आदिवासीला निर्णय अमान्य असेल तर तो नम्रपणे ''मला निकाल मान्य नाही' असे म्हणतो व बैठकीतून निघून जातो. परंतु निकाल मान्य नाही म्हणून तो पंचमंडळीबद्दल पोलीसात किंवा कोर्टात तक्रार करत नाही किंवा पंचायतीला आव्हान देत नाही.

### समाजनिधी देणे बंधनकारक

पंचायतीच्या बैठकीत जो दोषी ठरेल त्यास विरूद्ध पार्टीला नुकसानभरपाई द्यावी लागते. ज्याला नुकसानभरपाई द्यावी लागते त्याला विरूद्ध पार्टीबरोबरच पंचायतीलाही काही रक्कम द्यावी लागते. परंतु पंचायत त्यास 'दंड' म्हणत नाही. तर 'समाज निधी' असे संबोधते. हा समाज निधी ५५१ रूपये एवढा आहे. वास्तविक हा दंडच आहे.

### बैठकीचा समारोप

पंच मंडळींनी निकाल दिल्यानंतर पंचायतीचे चिटणीस आभार मानतात. चिटणीस नसेल तर अध्यक्ष आभार मानतात. पंचायतीचे कामकाज संपल्यानंतर किंवा सोयीनुसार अधल्या-मधल्या वेळेत पंचांना व उपस्थित आदिवासींना जेवण दिले जाते. ज्या गावात बैठक असते त्या गावातील पंच किंवा समाजाच्या दृष्टीने आदरणीय असणारी सधन प्रतिष्ठित व्यक्ती सर्वांच्या जेवणाची मोफत सोय करते. फिर्यादी, आरोपी यांनाही जेवण दिले जाते. जेवताना पंच, आरोपी, फिर्यादी एकत्र जेवायला बसतात. पंगतीत भेदभाव केला जात नाही.

### निर्णयाची त्वरित अंमलबजावणी

पंचायतीने दिलेल्या निर्णयाची अंमलबजावणी त्वरित केली जाते. एखाद्याला आर्थिक नुकसानभरपाई करून देण्याचा पंचायतीने आदेश दिला असेल तर त्या व्यक्तीला विशिष्ट दिवसांची मुदत दिली जाते. त्या मुदतीत त्याला पंचायतीने ठरविलेली रक्कम संबंधिताला द्यावी लागते. जर विशिष्ट मुदतीत ही रक्कम अन्यायग्रस्ताला मिळाली नाही तर पंचायत जप्तीची परवानगी देते. ज्या व्यक्तीला नुकसानभरपाई दयावयाची आहे ती व्यक्ती आपल्या गावातील आदिवासींना घेऊन आरोपी व्यक्तीच्या घरात घुसते आणि शेळ्या, कोंबड्या, गाई-बैल, इ. जनावरे जप्त करून घेऊन जाते. नुकसानभरपाई रकमेएवढ्या वस्तू जप्त करून नेण्याची परवानगी अन्यायग्रस्त व्यक्तीला असते. अशा प्रकारे पंचायतीच्या शिक्षेची किंवा निकालाची अंमलबजावणी आदिवासी समाजातील लोकांकडूनच पंचायत करून घेत असते. बहुसंख्य आदिवासी जप्तीची वेळ शक्यतो येऊ देत नाहीत. दंडाची रक्कम मुदतीत भरणेच ते पसंत करतात. कारण ज्याला नुकसानभरपाई द्यावयाची आहे तो आपल्या पाड्यावरील पाच-पन्नास आदिवासींना घेऊन फसवणूक

किंवा अन्याय करणाऱ्याच्या घरात घुसत असतो. जप्तीचा हा प्रसंग संबंधित व्यक्तीच्या दृष्टीने फारच अपमानास्पद असतो. संबंधित व्यक्तीच्या दृष्टीने जप्तीची बाब जरी वाईट असली तरी जप्तीमुळे अन्यायग्रस्तांना नुकसानभरपाई मिळत असते व पंचायतीचा धाकही आदिवासीवर राहतो.

### जरब बसविण्यासाठी पोलीसांचे सहकार्य

एखादा आदिवासी पंचायतीचा निकाल मानत नाही. परंतु त्या आदिवासीने निकाल मानलाच पाहिजे असे पंचायतीला वाटत असते. कारण त्याने निकाल मानला नाही तर तक्रारदारावर अन्याय होत असतो. उदाहरणार्थ, एखाद्या आदिवासी तरूणापासून एखादी अविवाहित मुलगी गरोदर असेल आणि तो तिच्याशी लग्न करीत नसेल तर पंचायत त्याला प्रथम समजावून सांगते. तसेच त्या मुलीबरोबर लग्न करण्यासाठी काही दिवसांची मुदत दिली जाते. पंचायतीने अनेकवेळा सांगू नाही संबंधित तरूण फसवणूक केलेल्या मुलीशी विवाह करत नसेल तर त्या मुलीच्या आयुष्याचे वाटोळे होऊ नये म्हणून पंचायतीचे पंच ही बाब पोलीसांना विश्वासात घेऊन त्यांच्या कानावर घालतात आणि पंचायतीच्या सांगण्यावरून पोलीस त्या तरूणाला तुरूंगात टाकण्याची धमकी देतात. पोलीसांनी दमबाजी केल्यानंतर तो तरूण संबंधित तरूणीबरोबर लग्न करण्यास कबूल होतो. अशा प्रकारे एखाद्यावर अन्याय करणाऱ्या आणि पंचायतीचा निकाल धुडकावून लावणाऱ्या आदिवासीवर जरब बसविण्यासाठी पंचायतीकडून पोलीसांचे सहकार्य घेतले जाते.

### अल्पवेळात निर्णय

काडीमोड किंवा घटस्फोट ासारखे प्रश्न आधुनिक न्यायालयात वर्षानुवर्षे सुटत नाहीत. परंतु असे प्रश्न पंचायत एक दोन बैठकांमध्येच सोडवते. शिवाय असे नाजूक प्रश्न सोडवताना कोणावर अन्याय होणार नाही याची काळजी घेतली जाते. पंचायतीचा न्याय-निवाडा अल्पवेळात होत असल्याने कोर्टात जाण्यापेक्षा पंचायतीकडे तक्रार गुदरणे आदिवासी पसंत करतात.

### अल्पखर्चात न्याय

आदिवासींना अल्पखर्चात पंचायतीकडून न्याय मिळत मिळतो. पंचायतीचा किरकोळ खर्च भागविण्यासाठी तक्रारदारांकडून २५ रूपये इतके नाममात्र शुल्क पंचायत घेते. अशाप्रकारे पंचायतीकडे तक्रार दाखल करण्याचा आदिवासींना खूपच कमी खर्च येतो. कोर्ट कचेरीइतका भरमसाठ खर्च येत नसल्याने पंचायतीकडे तक्रार दाखल करणे आदिवासींना फायदेशीर ठरते. आदिवासींना पंचायतीत तक्रार गुदरण्याचा जसा खर्च कमी येतो तसा पंचायतीला बैठकीचा खर्चही खूपच कमी येत असतो. कारण पंचायतीचे सर्व पंच सेवाभावी वृत्तीने, मानधन किंवा पगार न घेता काम करत असतात.

### निर्णय मानणाऱ्यांचे प्रमाण जास्त

पंचायतीकडे न्यायनिवाड्यासाठी आलेले बहुतेक सर्वजण पंचायतीचे निर्णय मानतात. हजारात एखादा-दूसरा पंचायतीचा निर्णय मान्य करीत नाही. तो पोलीसात किंवा कोर्टात जातो. परंतु निर्णय मानणाऱ्यांचे प्रमाण जास्त असते.

### पंचायतीपुढे सर्व समान

वारली अदिवासी पंचायत गरीब-श्रीमंत असा भेदभाव करून वागणूक देत नाही किंवा त्या आधारावर न्यायनिवाडा करत नाही. पंचायतीच्या दृष्टीने सर्वजण समान असतात. गरीब आदिवासी विरूध्द सधन आदिवासी असे भांडणे असले तरी बैठकीत दोघांच्याही

मतांचा आदर केला जातो. निकाल देताना गरीब-श्रीमंत हा विचार न करता कोण खरे व कोण खोटे हेच पाहिले जाते.

### काडीमोडाच्या प्रश्नांचे अधिक प्रमाण

वारली आदिवासी पंचायतीकडे ज्या तक्रारी येतात त्यामध्ये लग्नाच्या प्रश्नांचे प्रमाण जास्त आहे. हे प्रमाण ९८ टक्यांपेक्षा जास्त आहे. काडीमोड किंवा घटस्फोट घेण्यासाठी पंचायतीकडे येणाऱ्या आदिवासींचे प्रमाण प्रचंड आहे. काडीमोड देणे हेच पंचायतीचे प्रमुख कार्य आहे असे आदिवासींना वाटते. त्यांना काडीमोड आणि पंचायत ह्या एकाच नाण्याचा दोन बाजू वाटतात. कोणाची लग्नाची बायको पळून गेलेली असते, कोणाची बायको नांदत नसते, तर कोणी पुरूष आपल्या बायकोला नांदवत नसतो. त्यामुळे काडीमोड किंवा सोडचिठ्ठीची मागणी करणाऱ्या अर्जाचे प्रमाण हे जास्त आहे. थोडक्यात, पंचायतीपुढे येणाऱ्या समस्यांपैकी लग्नाच्या समस्यांचे प्रमाण हे मोठे आहे.

### लाचलुचपत प्रकारापासून दूर

वारली पंचायतीचे महत्त्वाचे वैशिष्टय म्हणजे पंचायतीचे सर्व पंच प्रामाणिकपणे न्यायनिवाड्याचे काम करत असतात. लाचलुचपतीचे कोणतेही गैरप्रकार पंचायतीत चालत नाहीत. पंचमंडळी लाच घेत नाहीत किंवा तशा गोष्टींना थाराही देत नाहीत. तसेच ज्यांच्या विरोधात निकाल लागण्याची शक्यता असते ते आदिवासी लाच देऊन किंवा पैसे देऊन निकाल आपल्याला हवा तसा करून घेण्याचा प्रयत्न करत नाहीत. थोडक्यात पंचांना विकत घेण्याचा प्रयत्न कोणी करत नाही. पंचांबद्दल आदरयुक्त भीती असल्याने आणि पंच प्रामाणिकपणे काम करीत असल्याने पंचांना लाच देण्याचे धाडस आदिवासी करू शकत नाहीत. हा पोलीस आणि पंचायत यामधील महत्त्वाचा फरक आहे.

### बाह्य दबावापासून दूर

वारली न्यायपंचायत ही सर्व प्रकारच्या बाह्य दबावापासून दूर असते. अमक्याची बाजू खरी नसली तरी त्याच्याच बाजूने निकाल द्यावा असा दबाव बाहेरील कोणीही पंचायातीवर आणत नाही. पंचायतीच्या न्याय निवाडयाच्या कामात कोणीही हस्तक्षेप करीत नाही. अमूक एखाद्या गुन्हेगाराला सोडून द्यावे, अमूक एखाद्यावर गुन्हा दाखल करू नये याबाबतीत पोलीसावर जसा काही राजकारणी, मंत्री, काळेधंदेवाले यांचा दबाव असतो. तसा दबाव पंचायतीवर किंवा पंचावर नसतो. पंचाबद्दल आदर व विश्वास असल्याने बाहेरील व्यक्ती पंचावर दबाव आणत नाहीत. त्यामुळे पंचांना नि:पक्षपाती राहून निर्णय देणे शक्य होते.

### राजकारणापासून अलिप्त

वारल्यांची पंचायत राजकारणापासून अलिप्त असून पंचायतीवर कुठल्याच राजकीय पक्षाचा किंवा राजकीय विचारसरणीचा प्रभाव नाही. आरोपी किंवा फिर्यादी कोणत्या पक्षाशी किंवा पुढाऱ्यांशी संबंधित आहेत ते पाहिले जात नाही.

न्यायपंचायतीचे काही पंच राजकारणातही असतात. विविध राजकीय पक्षांचे ते कामही करत असतात अथवा स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ते लोकप्रतिनिधी या नात्यानेही कार्यरत असतात. तरीही पंच मंडळी आपल्या पदाच्या किंवा प्रतिष्ठेच्या जोरावर अमक्या राजकीय पक्षाच्या किंवा पुढाऱ्यांच्यामागे निवडणुकीत रहा असा दबाव आदिवासीवर आणत नाहीत. तसेच निवडणुकप्रसंगी राजकीय पक्षाच्या

पुढाऱ्यांना पंचायतीचा वापर करू दिला जात नाही. तसेच पंचायतीच्या बैठकीत राजकारणावर कोणतीही चर्चा केली जात नाही. थोडक्यात वारल्यांची न्यायपंचायत राजकारणापासून दूर असते. त्यामुळे पंचायतीला नि:पक्षपातीपणे काम करता येऊन अन्यायग्रस्तांना न्याय देणे शक्य होते.

### निकालाची किंवा निर्णयांची माहिती

पंचायतीकडे वर्षभरात विविध तक्रारी दाखल होत असतात. या तक्रारीच्या संदर्भात पंचायतीने केलेल्या न्यायानिवाड्याची माहिती पंचायतीकडून लोकांच्यापर्यंत विविध मार्गांनी पोहचवली जाते. उदा. त्या त्या विभागातील पंच पंचायतीच्या निर्णयांची माहिती समाजाला देत असतात. तसेच मृत व्यक्तींच्या उत्तर कार्याच्या वेळी शेकडो आदिवासी जमत असतात. या कार्यक्रमाच्यावेळी सुद्धा चर्चेच्या माध्यमातून निकालाची माहिती आदिवासींना होत असते. कोणत्या गुन्ह्याला कोणती शिक्षा मिळते आणि असे गुन्हे करण्यास आदिवासींनी प्रवृत्त होऊ नये यासाठी पंचायत आपल्या निकालांची किंवा निर्णयांची माहिती विविध माध्यमातून समाजातील लोकांपर्यंत पोहचवण्याचा प्रयत्न करीत असते.

### पंचायत अडाणी आदिवासींचा आधारस्तंभ

पंचायतीकडे दाद मागणाऱ्यांमध्ये अशिक्षित, अल्पशिक्षित आणि गरीब आदिवासींचे प्रमाण खूप मोठे असते. बऱ्यापैकी आर्थिक स्थिती असलेले व शिकलेले आदिवासी कोर्टात जातात. पंचायतीकडे येणाऱ्यांमध्ये शिकलेल्यांचे प्रमाण कमी असते. त्यांना पंचायतीपुढे येण्यास लाज वाटते. अडाणी व गरीब आदिवासींना पोलीस व कोर्टाची भीती वाटते. परंतु आपल्या जमातीच्या पंचायतीची भीती वाटत नाही. त्यामुळे पंचायतीकडे न्याय मागण्यास गरीब व निरक्षर आदिवासीच मोठ्या प्रमाणावर येतात.

### पंचायतीवर पुरूषांचे वर्चस्व

वारली' आदिवासी पंचायतीचे वैशिष्ट्य म्हणजे पंचायतीचे सर्व पंच पुरूष असतात. पंचायतीचे सर्व कामकाज पुरूषच बघतात. तसेच पूर्वी पंचायतीमध्ये फक्त वृद्ध आदिवासीच असत. वयोवृद्धानांच पंचायतीमध्ये स्थान असे. आताही पंचायतीमध्ये वयोवृद्धांना महत्त्व असले तरी सुशिक्षित व प्रौढ लोकांनाही पंचायतीत स्थान मिळू लागले आहे. पंचायतीच्या कामात तरूण आदिवासीही उत्साहाने भाग घेत आहेत.

### वंशपरंपरागत पंच नियुक्ती पद्धतीस फाटा

वारली पंचायतीचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे या पंचायतीचे पंच पिढीजात किंवा जन्मजात नसतात. विशिष्ट मुदतीसाठी आदिवासी लोकच पंचांची निवड करत असतात किंवा काही जाणकार लोक एकत्र येऊन पंच ठरवत असतात. पंचांचा कार्यकाल संपल्यानंतर पंचांची फेरनिवड होऊ शकते. आजही भारतातील काही आदिवासी जमातीत पंचांची निवड वंशपरंपरेने होत असल्याचे आढळून येते. अशा पद्धतीने नियुक्त होणाऱ्या पंचांकडून आदिवासींना न्याय मिळेलच याची खात्री देता येत नाही.

### पंचांचा आर्थिक व सामाजिक दर्जा

आदिवासी पंचायतीमध्ये पंच म्हणून काम करणारे आदिवासी आर्थिकदृष्ट्या फार सधन असतात असे नाही. काहीजण नोकरी तर काहीजण बऱ्यापैकी शेती असणारे असतात. इतर आदिवासींना जसे उपासमारीच्या प्रश्नाला तोंड द्यावे लागते तसे

पंचमंडळींना द्यावे लागत नाही. थोडक्यात पंचांची आर्थिक स्थिती बऱ्यापैकी असते. तसेच इतर सर्वसामान्य, गरीब व निरक्षर आदिवासींपेक्षा पंचांचा सामाजिक दर्जा मात्र चांगला असतो. समाजात त्यांना मानाचे व चांगले स्थान असते. सामान्य आदिवासी पंचांना चांगला मान देतात.

**पंचांबद्दल लोकांच्या अपेक्षा**

न्यायनिवाडा करणाऱ्या पंचायतीचे पावित्र्य टिकून रहावे असे सामान्य आदिवासींना वाटत असते. यासाठी पंचायतीकडून किंवा पंचांकडून त्यांनी काही अपेक्षा ठेवलेल्या असतात. उदा. पंचांनी प्रामाणिक असावे, दारूच्या नशेत असू नये, जबाबदारीने वागावे, समाजाच्या सुख-दु:खात उदाहरणार्थ लग्न, उत्तरकार्य इत्यादी मध्ये सहभागी व्हावे अशा आदिवासींच्या पंचांकडून अपेक्षा असतात.

आदिवासींनी गैर वागू नये यासाठी पंचायत ज्याप्रमाणे आदिवासींवर लक्ष ठेवते त्याप्रमाणे आदिवासींचेही पंचांच्या वर्तणुकीकडे लक्ष असते. एखाद्या पंचाने गैरवर्तन केले किंवा विवाहबाह्य संबंध ठेवले अथवा रखेली ठेवली तर आदिवासींना ही बाब आवडत नाही. आदिवासी पंचायतीकडे त्याबाबत तक्रार करतात. अन्य पंचमंडळींनाही असे गैरप्रकार आवडत नाहीत. त्यामुळे संबंधित व्यक्तीला पंच पदावरून किंवा अध्यक्षपदावरून काढून टाकले जाते.

**समाजाशी सतत संपर्क**

पंचायतीचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे पंचायत समाजाशी फटकून वागत नसते. पंचायतीचे पंच समाजातीलच एक घटक असतात. त्यांचा समाजाशी सतत संपर्क येत असतो. सरकारी न्यायव्यस्थेतील वकील किंवा न्यायाधीश स्वत:ला जसे वेगळे समजत असतात तसे पंच समजत नाहीत. बैठकीच्या वेळी आणि एरवी सुद्धा पंच समाजाशी फटकून नसतात. सामान्य आदिवासीपेक्षा ते स्वत:ला वेगळे समजत नाहीत. समाजात किंवा आदिवासी समुदायात ते मिळून-मिसळून वावरत असतात. अशाप्रकारे पंच मंडळी समाजाशी सतत संपर्क ठेवत असल्यामुळे समाजातील प्रत्येकाची त्यांना बारकाईने माहिती असते. समाजाशी सतत संपर्क असल्याने त्यांना समाजाचे प्रश्न सोडविणे शक्य होते.

**रीतीरिवाज व पंचायत**

लोकांनी समाजाचे म्हणजेच जमातीचे रीतीरिवाज पाळले पाहिजेत यावर वारली पंचायतीचा कटाक्ष असतो. समाजातील रीतीरिवाज किंवा चालीरिती यांचे लोकांनी पालन केलेच पाहिजे. त्याशिवाय समाज किंवा जमात टिकणार नाही, असे पंचायतीला वाटत असते. जमातीतील आदिवासीसुद्धा आपले अन्य आदिवासी बांधव समाजाच्या प्रथा परंपरांचे पालन करतात की नाही ते पाहत असतात व जे कोणी या परंपरांचे पालन करीत नाहीत त्यांच्याबद्दलची तक्रार ते पंचायतीकडे देत असतात. उदा. उत्तरकार्याचा विधी दहा दिवसांनी करावयाचा असतो. एखाद्याने तो पाच दिवसांनी केला तर अन्य आदिवासी पंचायतीकडे तक्रार करतात. पंचायत संबंधित व्यक्तीला बोलावून समज देते. 'तू उलटा चालू नकोस' असे त्याला सांगितले जाते. तसेच एखाद्याने लग्नात ठरलेल्या मानापेक्षा (रकमेपेक्षा) जास्त मान घेतला असेल तर पंचायतीकडे तक्रार येते. पंचायत अशा व्यक्तीची कानउघडणी करते किंवा त्यास योग्य ती शिक्षा देते. अशाप्रकारे शेकडो-हजारो वर्षांपासून चालत आलेल्या प्रथा परंपरांचे पालन समाज करतो की नाही हे पाहण्याचे कामही पंचायत करत असते.

### भुताळी व पंचायत

आदिवासी समाजातील जी स्त्री करणी, जादू-टोणा, मंत्रतंत्र करते तिला भुताळी असे म्हणतात. भुताळीमुळे लोक आजारी पडतात, मरतात अशी आदिवासींची समजूत आहे. त्यामुळे आदिवासी अशा भुताळींना गावातून हुसकावून लावतात किंवा दगडाने ठेचून मारतात. परंतु अशा भुताळी मानल्या गेलेल्या स्त्रिया पंचायतीकडे तक्रार घेऊन येत नाहीत. तसेच वारली पंचायत भुताळींना लोकांच्या मारहाणीपासून वाचवत नाहीत किंवा मारहाण करणाऱ्यांना प्रतिबंध करत नाहीत. भुताळीच्या बाबतीत समाजातील लोकच परस्पर निर्णय घेत असतात. पंचायत त्यात हस्तक्षेप करत नाही.

### भगत व पंचायत

प्रत्येक आदिवासी जमातीत भगत असतातच. हे भगत झाडपाला, अंगारा देऊन लोकांचे काही आजार बरे करत असतात. म्हणून भगतांना आदिवासींच्या जीवनात मानाचे स्थान असते. पंचायतीत पंच म्हणून काम करणारे आदिवासी सुद्धा भगताकडे औषधासाठी जात असतात. परंतु पंचायतीमध्ये भगताला तो केवळ भगत आहे म्हणून घेतले जात नाही. एखाद्या भगताला जर समाजकार्याची आवड असेल आणि पंच म्हणून काम करण्याची इच्छा असेल तर पंचायतीमध्ये त्याला समाविष्ट केले जाते. केवळ एखादा भगतगिरी करतो म्हणून त्याची निवड पंचायतीवर केली जात नाही. थोडक्यात आदिवासींची न्यायपंचायत भगतांच्या आधिन नसते किंवा समाजाच्या दृष्टीने एखादा कितीही मोठा भगत असला तरी त्याचा 'भगत' या नात्याने पंचायतीवर वचक नसतो. पंचायत स्वतंत्रपणे काम करत असते. भगत मंडळी सुद्धा 'भगत' म्हणून आपला प्रभाव पंचायतीवर टाकत नाहीत.

### पोलीस आणि पंचायत

पंचायतीचा आणि पोलिसांचा सतत संबंध येत असतो. पंचायतीकडे न येता आदिवासी जरी पोलीसात आले तरी गुंता सोडविण्यासाठी पोलीसच बऱ्याच वेळा पंचांना बोलावून घेतात आणि त्यांच्या सल्ल्याने प्रश्न सोडवितात. तसेच पोलीससुद्धा अनेकदा आदिवासींना पंचायतीकडे जाण्याचा आग्रह करत असतात. आपल्यापेक्षा पंचायत आदिवासींचे प्रश्न चांगल्या प्रकारे सोडवू शकते असे पोलीसांचेही मत आहे. तसेच बऱ्याचवेळा पंच मंडळी स्वत: पोलीस स्टेशनमध्ये जातात आणि '' ही केस आमची आहे, ती आम्ही सोडवतो, आपण त्यात भाग घेऊ नका' असे पोलीसांना सांगून फिर्यादी व आरोपी दोघांना पंचायतीसमोर आणतात. असे असले तरी एखाद्या प्रकरणावरून पोलीस आणि पंच यांच्यात शक्यतो वाद होत नाही. पोलीस आपल्याकडे आलेली केस पंचायतीकडे सोपविण्यास उत्सुकच असतात.

### पंचायत आणि कोर्ट

आदिवासी पंचायतीचा आणि कोर्टाचा काही वेळा संबंध येत असतो. एखादे प्रकरण पंचायतीत येऊन पुन्हा कोर्टात गेले असेल तर कोर्टात पंचांना साक्षीला बोलावतात. परंतु अशी प्रकरणे खूपच कमी असतात.

सरकारच्या न्यायालयातील काही मंडळी आपल्या अशिलांना लुबाडतात, फसवतात. नाहक हेलपाटे घालायला लावतात. तसे आदिवासी पंचायतीचे पंच करत नाहीत. आदिवासींच्या अज्ञानाचा, भोळसटपणाचा आणि गरिबीचा फायदा घेऊन पंचमंडळी त्यांची लुबाडणूक करत नाहीत.

आदिवासींनाही पोलीस आणि कोर्टापेक्षा आपली संघटना किंवा न्यायपंचायतच उपयुक्त वाटत असली तरी कोणीतरी फितवल्यामुळे काही आदिवासी पोलीसात व कोर्टात जाऊ लागले आहेत. आदिवासी पंचांच्या मतानुसार पोलीस आणि कोर्ट ही सरकारची व्यवस्था आदिवासींच्या उपयोगाची नाही. विशेष करून लग्नाचे किंवा घटस्फोटाचे, नवरा व बायकोच्या भांडणाचे प्रश्न सोडविण्यासाठी समाजाची पंचायत उपयुक्त ठरते. त्यांच्यामते चोऱ्या व दरोडे इ. सारखे प्रश्न पोलीस व कोर्ट यांनी सोडवावेत. परंतु काडीमोड किंवा घरगुती भांडणे इ. सारखे प्रश्न पंचायतीकडेच यावेत.

**न्यायपंचायत आणि ग्रामपंचायत**

आदिवासी न्यायपंचायतीचे स्वरूप ग्रामपंचायतीपेक्षा खूपच वेगळे असते. उदा. ग्रामपंचायतीवर निवडून जाण्यासाठी जशी चुरस असते तशी चुरस न्यायपंचायतीचे पंच निवडताना होत नाही. ग्रामपंचायतीच्या निवडणुकीला कोणीही म्हणजे दारूडा, भ्रष्टाचारी, वाईट वर्तणूक असणारा उभा राहू शकतो किंवा निवडूनही येऊ शकतो. पण न्यायपंचायतीच्या बाबतीत मात्र तसा प्रकार होत नाही. आदिवासी लोक ग्रामपंचायतीत एखादया भ्रष्टाचाऱ्याला, दारूडयाला निवडून देतील. पण न्यायपंचायतीत अशा व्यक्तीची 'पंच' म्हणून नेमणूक सहन करत नाहीत. तसेच ग्रामपंचायतीची जशी उत्पन्नाची हक्काची साधने असतात तशी पंचायतीची नसतात आणि ग्रामपंचायतीत सरकारचा जसा हस्तक्षेप चालतो तसा न्यायपंचायतीत चालत नाही. आदिवासी न्यायपंचायत सरकारी हस्तक्षेपापासून दूर असते.

**समारोप**

आदिवासी भागात सरकारच्या पोलीस आणि न्यायालय या व्यवस्था अनेक वर्षापासून अस्तित्वात आहेत. तरीही आदिवासींच्या न्यायपंचायतीचे महत्व कमी झालेले नाही. उलट पोलीस आणि न्यायालयापेक्षा न्यायपंचायतीची उपयुक्तता व श्रेष्ठत्व वाढत चालले आहे. आदिवासींची न्यायपंचायत गोरगरीब आदिवासींच्या दृष्टीने खूपच फायदेशीर आहे. कारण अत्यंत कमी खर्चात त्यांना न्याय मिळतो. तसेच न्याय मिळविण्यासाठी वर्षानुवर्षे प्रतिक्षा करावी लागत नाही. न्यायपंचायतीमुळे चांगल्या प्रथा, रीतीरिवाज टिकून राहतात. आदिवासी संस्कृतीचे जतन आणि संवर्धन होते. न्यायपंचायतीमुळे गुन्हेगारी प्रवृत्ती कमी होते. तसेच गुन्हा किंवा फसवणूक करणाऱ्यांना पंचायत योग्य ती शिक्षा देत असल्यामुळे अन्यायग्रस्तांना न्याय मिळून त्यांचे जगणे सुसहय होते.

न्यायपंचायतीमुळे स्त्रियांची अब्रू सुरक्षित राहते. तसेच पंचायत शक्यतो काडीमोड मंजूर करीत नसल्यामुळे आणि अत्यंत अपरिहार्य परिस्थितीत मंजूर केली तरी स्त्रियांना नुकसान भरपाई मिळवून देत असल्यामुळे न्यायपंचायत स्त्रियांच्या दृष्टीने उपयुक्त ठरते. न्यायपंचायत अस्तित्वात असल्यामुळे उठसूठ काडीमोड देणाऱ्यांचे प्रमाणही कमी होते. न्यायपंचायतीमुळे समाजाची एकजूट वाढते. समाजात एकोपा निर्माण होण्यास मदत होते. तसेच नीतीमत्ता टिकून राहण्यास मदत होते. आदिवासींची न्यायपंचायत अनेक नाजूक प्रश्न तडजोडीने तसेच सर्वांना मान्य होईल अशा पद्धतीने सोडवत असते. त्यामुळे समाजात खुन्नस राहत नाही किंवा एकमेकांचा बदला घेण्याची वृत्ती निर्माण होत नाही. आदिवासींच्या न्यायपंचायतीचा शासनाला मोठा फायदा होतो. कारण घटस्फोटासारखे अनेक प्रश्न न्यायपंचायत सोडवत असल्यामुळे शासनाचा न्यायव्यस्थेवरचा खर्च खूपच वाचतो.

न्यायपंचायत आदिवासींच्या दृष्टीने अनेक बाबतीत उपयुक्त आहे. आधुनिक काळातही पंचायतीचे महत्त्व कमी होण्याऐवजी दिवसेंदिवस वाढतच चालले आहे. आदिवासींचा सामाजिक दर्जा उंचावा यासाठी आणि आदिवासींच्या आर्थिक प्रगतीसाठी सुद्धा न्यायपंचायतींनी महत्त्वाची भूमिका बजावणे आवश्यक आहे. त्यासाठी पंचायतीने आपल्या कार्याची व्याप्ती वाढविणे गरजेचे आहे. आदिवासी जन्मापासून मृत्यूपर्यंतच्या विधींवर मोठा खर्च करतात. तो खर्च कमी करण्यासाठी पंचायतीने प्रयत्न करणे आवश्यक आहे. आदिवासींनी आपले विवाह कमी खर्चात करावेत यासाठी आणि अंधश्रद्धा निर्मूलनासाठीसुद्धा पंचायतीने प्रयत्न करणे आवश्यक आहे. पंचायतीने आदिवासीं तरूण-तरूणींना विवाहपूर्व योग्य मार्गदर्शन केले तर घटस्फोटांचे प्रमाण खूपच कमी होईल. प्रत्येक आदिवासी जमातीची पंचायत स्वतंत्रपणे न्याय-निवाडा करत असते. तसे करणेच योग्य आहे. परंतु एकाच तालुक्यात राहणाऱ्या विविध जमातीतील आदिवासींच्या काही समस्या सारख्याच असतात. म्हणून सर्व जमातीच्या पंचायतींनी म्हणजेच पंचांनी सहा महिन्यातून किंवा वर्षातून एकदा एकत्र येणे आवश्यक आहे.

सर्व पंचायतींनी आपल्या आदिवासी समाजातील उच्च नीचता नष्ट करण्यासाठी एकत्र येऊन प्रयत्न करावेत. पंचांनी तक्रार आल्यानंतर एखाद्या गावात न जाता आठवड्यातून एक-दोन वेळा गावाभेटीची पद्धत सुरू करावी. त्यामुळे गुन्हेगारी प्रवृत्ती कमी होऊ शकेल. निवृत्त किंवा अनुभवी पंचांनी नवीन पंचांना सतत मार्गदर्शन करावे. तक्रारींचा त्वरित निपटारा करण्यासाठी पंचांच्या संख्येत वाढ करावी. तसेच पंचायतीत आदिवासी स्त्रियांनाही स्थान मिळावयास हवे. थोडे -फार शिकलेल्या स्त्रियांना किंवा शिक्षिकेचे काम करणाऱ्या आदिवासी स्त्रियांना पंच म्हणून काम करण्याची संधी द्यावी. काही आदिवासी लोक पंचायतीचा निकाल मान्य नसल्यामुळे कोर्टात जातात. यासाठी त्यांना अपिलाची सुविधा उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. गावाबाहेरच्या किंवा तालुक्याबाहेरच्या जमातींच्या पंचाकडे अपील करण्याची सोय आणि परवानगी आदिवासींना दिल्यास आदिवासींचा पंचायतीवरील विश्वास अधिक दृढ होईल.

आदिवासींना पंचायतीकडे येण्यास लाज वाटणार नाही अशा दृष्टीने पंचायतीने प्रयत्न करणे आवश्यक आहे. पंचायतीने आदिवासी समाजातील युवक-युवतींसाठी वर्षातून एक दोन वेळा मेळावे आयोजित करावेत आणि त्या मेळाव्यात त्यांना प्रबोधन करावे. पंचायतीने सरकारकडून एक पै ची ही मदत घेऊ नये. याऊलट समाजातील प्रत्येक कुटुंबाकडून त्यांच्या कुवतीनुसार दरवर्षी वर्गणी घ्यावी. त्यामुळे न्यायपंचायत आर्थिकदृष्ट्या सक्षम होऊन पंचायतीला समाजासाठी भरीव कार्य करता येईल.

आदिवासी न्यायपंचायत काळाप्रमाणे बदलत राहिली तर समाजासमोरील अनेक आव्हानांशी ती यशस्वीपणे मुकाबला करू शकेल. आणि भविष्यातही आदिवासी समाजात तिचे स्थान आणि महत्त्व आबाधित राहू शकेल. भविष्यातही आदिवासी न्यायपंचायत टिकून राहणे आवश्यक आहे. कारण गोरगरीब आदिवासींचा आधारस्तंभ असणारी पंचायत आदिवासींच्या जीवनाशी निगडीत असणाऱ्या अत्यंत महत्त्वाच्या प्रश्नांची सोडवणूक करीत असते.

• • •

# आदिवासी समाजातील लग्नगडी आणि घरजावई पद्धत

**डॉ. जयवंत इंगळे**

लग्न ही आदिवासी समाजात अत्यंत महत्वाची बाब मानली जाते. अविवाहित राहिल्यास समाजात किंमत मिळत नाही.  परंतु विवाह ही खर्चिक बाब असल्याने गरीब आदिवासींच्या दृष्टीने ती अशक्यप्राय गोष्ट असते. घरातील तरूण मुलाच्या लग्नासाठी पैसे जमवताना गरीब कुटुंब अक्षरश: मेटाकुटीला येते. वयाच्या अठरा वर्षापर्यंत लग्न न झाल्यास पुढे लग्न होण्याची शक्यता जवळ जवळ नसते. काही जमातीत पंधरा ते सतरा वर्षापर्यंत मुलांचे विवाह उरकतात. तर मुलींचे विवाह बारा ते चौदा वयातच केले जातात. सतरा, अठराच्या पुढे तरूणाचे वय गेल्यास आदिवासी समाजात त्यास घोडनवरा समजतात आणि त्याला मुलगी देण्याचे नाकारतात. त्याला कोणी मुलगी देऊ नये असा ठराव करतात. त्यामुळे लवकरात लवकर लग्न व्हावे यासाठी प्रत्येक आदिवासी तरूण धडपडत असतो. एखादे कुटुंब कितीही गरीब असले तरी त्या कुटुंबातील मुलींचा विवाह होतो. आदिवासी समाजातील एकही निरोगी मुलगी बिनलग्नाची राहत नाही. कारण आदिवासी समाजात वधूपक्षाला  हुंडा (वधूमूल्य) मिळत असतो. त्यामुळे गरीब कुटुंबातील मुलींचे विवाह होतात. परंतु मुलांचे विवाह होण्यात अडचणी येतात. म्हणून लग्नासारख्या बाबीसाठी ज्या कुटुंबात तरूण मुले आहेत अशा कुटुंबांना कर्ज काढावे लागते आणि त्याची परतफेड मालकाकडे वर्षानुवर्षे वेठबिगारासारखे काम करून करावी लागते. योग्य वयात आपले लग्न व्हावे यासाठी गरीब आदिवासी तरूण आणि किशोरवयीन मुले लग्नगडी आणि घरजावई म्हणून कामास राहतात असे ठाणे जिल्ह्यातील मोखाडा तालुक्यातील आदिवासींच्या पाहणीत आढळून आले. या दोन्ही पध्दतीत आदिवासींचे मोठे शोषण होते. या दोन पद्धतींची थोडक्यात माहिती खालील प्रमाणे दिली आहे.

## लग्नगडी पद्धत

आदिवासी भागात अस्तित्वात असलेली लग्नगडी पद्धत ही गुलामगिरीसारखीच आहे. ही पद्धत शेकडो वर्षांपासून अस्तित्वात आहे. या पद्धतीत जेवढी वर्षे मालकाकडे काम करावे लागते तेवढी वर्षे गुलामासारखेच जगणे वाट्याला येते. लग्न करून देण्याच्या अटीवर किंवा लग्नाचा खर्च देण्याच्या अटीवर विशिष्ट कालावधीसाठी आदिवासी तरूण जेव्हा शेठकडे किंवा सधन व्यक्तीकडे काही वर्षे कामासाठी राहतात तेव्हा त्यांना लग्नगडी किंवा लग्नाच्या बोलीवर काम करणारे मजूर असे म्हणतात. सरकारच्या किंवा दानशूर व्यक्तींच्या सामुदायिक विवाह योजनेतील विवाह नातेवाईक व समाज मान्य करत नाही. जेवण,दारू इत्यादीवर तीन-चार दिवस खर्च केल्याशिवाय म्हणजेच गावजेवण दिल्याशिवाय समाज विवाहाला मान्यता देत नाही. त्यामुळे काही वर्षापुरती गुलामी पत्करून आदिवासी तरूण लग्नाच्या बोलीवर गडी म्हणून राबत राहतात. लग्नगडी म्हणून काम केलेल्या आदिवासींकडून प्राप्त झालेली माहिती थोडक्यात खालीलप्रमाणे दिली आहे.

### लेखी करार

लग्नगड्याने अर्ध्यावर काम सोडून जाऊ नये यासाठी आणि मालकाने गड्यांची फसवणूक करू नये यासाठी गडी आणि मालक यांच्यात लेखी करार होतो. या कराराच्यावेळी गावातील किंवा नात्यातील वयस्कर, ज्येष्ठ मंडळी उपस्थित असतात. हा करार शक्यतो लेखीच केला जातो. अशा प्रकारे लग्नगड्यांचे काम मध्यस्थ व्यक्तीमार्फतच मिळते व हे मध्यस्थ दोन्ही बाजूकडील प्रतिष्ठित नागरिक असतात. त्यामुळे शक्यतो दोन्ही बाजूकडून करार मोडला जात नाही. मालक सधन किंवा श्रीमंत असतात. त्यामुळे कराराची कागदपत्रे शक्यतो मालकांकडेच असतात. या कागदपत्रांत लग्नगड्याने किती वर्षे काम करावयाचे? मालकाने लग्नाचा खर्च कसा द्यावयाचा ? इ. संबंधीची माहिती असते.

बिगर आदिवासीबरोबरच सधन आदिवासी सुध्दा आपल्या आदिवासी बांधवांना लग्नगडी म्हणून कामास ठेवतात. लग्नगडी दिवस-रात्र मालकांच्याच ताब्यात असतात. त्यांना मालकांच्याच घरी राहून चाकरी करावी लागते. एखादा मालक चांगला असेल तरच तो गडयांना रात्री मुक्कामास घरी जाण्याची परवानगी देतो.

### कामाचे स्वरूप

नांगरणी, भांगलण, पेरणी, कापणी, मळणी, भुजणी, जनावरे चारणे, लाकूडफाटा तोडणे, गोठ्याची साफ सफाई, ओझी उचलणे अशी अनेक कामे लग्नगड्यांना करावी लागतात. लग्नगड्यांना आपल्या मालकाकडे कष्टाची कामे करावी लागतात. मालकाकडे दिवसभर कष्ट करावे लागतात. बागायत व मोठ्या शेतकऱ्यांकडे तर वर्षभर काम असते. काही आदिवासी मजुरांना कामे झेपत नाहीत. अतिकष्टामुळे मजूर आजारी पडतात. त्यामुळे त्यांना काम सोडून द्यावे लागते.

लग्नगड्यांना सकाळी उठल्यापासून रात्रीपर्यंत कामे करावी लागतात. त्यांच्या कामाच्या वेळा किंवा कामाचे तास ठरलेले नसतात. मध्यरात्री जरी काम लागले तरी ते करावे लागते. बळजबरीला आदिवासी त्यांच्या बोलीभाषेत आगरदंडी असे म्हणतात. आगरदंडी याचा अर्थ मजूर आजारी असतानाही दया माया न दाखवता त्यास कामाला जुंपणे होय.

काही मोठे शेतकरी म्हणजे लग्नगड्यांचे मालक गड्यावर बळजबरी करतात. त्यांना चांगली वागणूक देत नाहीत. घालून पाडून बोलणे, सतत अपमान करणे असे प्रकार करतात. करार संपण्यास थोडा अवधी राहिला असेल तर लग्नाचा खर्च करावा लागू नये यासाठी ते लग्नगड्याला त्रास देऊन पळवून लावण्याचा प्रयत्न करतात. परंतु अशा मालकांचे प्रमाण कमी असते. बहुसंख्य मालक आपल्या गड्यावर बळजबरी करीत नाहीत. परंतु कष्टाची कामे करावयास लावतात.

लग्नगड्यांना कराराचा भंग करता येत नाही. म्हणजे काम सोडून त्यांना जाता येत नाही. काम सोडून एखादा गडी जर गेला तर मालक त्याला झालेल्या कामाचे पैसे सुद्धा देत नाही. त्यामुळे कामे झेपत नसली तरी बहुसंख्य लग्नगडी करार संपेपर्यंत काम करत राहतात.

कराराची मुदत संपल्यानंतर लग्नगडी आपल्या मालकाला सोडून जातात. एखाद्याची मालकाकडे राहण्याची इच्छा असेल तर तो राहू शकतो. परंतु करार संपला की शेठकडून राहण्याची सक्ती केली जात नाही. करार संपल्यानंतर शक्यतो मजुर निघून जातात. कारण लग्नाचा खर्च निघावा हाच त्यांचा

मर्यादित उद्देश असतो. लग्न झाल्यानंतर व करार संपल्यानंतर लग्नगडी स्वतंत्रपणे कोठेही मजुरी करून उपजीविका करतात. लग्नगडी पद्धत ही वेठबिगारी किंवा गुलामगिरी सारखीच पद्धत आहे. या वेठबिगारीतून मुक्त झाल्यानंतरही काही लग्नगडी स्वेच्छने काही मोबदला घेऊन किंवा विनामोबदला त्याच मालकाकडे कामास राहतात. याचा अर्थ अशा लग्नगड्यांना आणि करार संपल्यानंतरही काम करणाऱ्या लग्नगड्यांनासुद्धा आपण वेठबिगारीचे किंवा गुलामीचे जीवन जगत आहोत याची जाणीव नसते.

लग्नगड्याने करार मोडू नये यासाठी मालक दमदाटी करतात. तसेच कराराच्या वेळी जे मध्यस्थ असतात त्यांच्या मार्फतही लग्नगड्यांवर दबाव आणण्याचा प्रयत्न केला जातो. एवढे करूनही गडी कामावर आला नाही तर त्याने जेवढे काम केलेले असते त्याचा काहीही मोबदला मालकाकडून त्यास मिळत नाही.

लग्नगडी म्हणून गड्याने मालकाकडे किती वर्षे काम करावयाचे? हे विविध बाबींवर अवलंबून असते. लग्नगडी म्हणून काम करण्याचा कालावधी सर्वत्र सारखा नसतो. ज्या आदिवासीकडे लग्नासाठी खर्च करण्यास थोडे पैसे असतात ते आदिवासी थोडा काळच लग्नगडी म्हणून कामास राहतात. ज्या आदिवासीकडे लग्नासाठी काहीही पैसे नसतात त्यांना जादा पैसे मिळवण्यासाठी बराच काळ लग्नगडी म्हणून कामास राहावे लागते. एखादा फारच नाडलेला असेल तर मालक त्याच्याकडून जास्त काळ काम करून घेतो. साधारणपणे दोन ते बारा वर्षे आदिवासींना लग्नाच्या बोलीवर गडी म्हणून काम करावे लागते. दोन वर्षे, चार वर्षे, पाच वर्षे, सहा वर्षे, सात वर्षे आणि बारा वर्षे अशा प्रकारे लग्नगड्यांनी त्यांच्या मालकाकडे लग्न करून देण्याचा बोलीवर किंवा लग्नाचा खर्च देण्याच्या बोलीवर काम केले होते.

**लग्नगड्यांच्या लग्नाची माहिती**

करार संपण्यास एक वर्ष किंवा काही वर्षे राहिली असतील तर काही मालक आपल्या गड्याचे लग्न करून देतात किंवा लग्नाचा खर्च देतात. लग्नगड्याचे वय कमी असेल तर त्याला जास्त वर्षे काम करावे लागते. वयाच्या बाराव्या वर्षी लग्नगडी म्हणून कामास राहिलेल्याचे लग्न मालक पाच ते सात वर्षांनी लावून देतो. परंतु त्या गड्याला आपल्या पत्नीसहित लग्नानंतर पाच ते सात वर्षे म्हणजे सुमारे बारा वर्षे लग्नगडी म्हणून राबावे लागते. करारात ठरलेल्या मुदतीच्या आत लग्न लावून दिले तर लग्नगड्याच्या बायकोलाही तेथे कामास राहावे लागते. तिला कामाचा काहीही मोबदला दिला जात नाही. नवरा बायकोसाठी स्वतंत्र छप्पर बांधून दिले जाते. स्वयंपाकासाठी शिधा दिला जातो. वर्षातून दोनवेळा नेसण्यासाठी फडकी(लुगडी) दिली जातात. परंतु तिला आर्थिक मोबदला काहीही दिला जात नाही. अशाप्रकारे करार संपण्यापूर्वी लग्नगड्याचे लग्न करून देण्यास मालक तयार असतात. कारण त्यांना लग्नगड्याची बायको कामासाठी मोफत मिळत असते. लग्नगड्याला आपल्या बायकोबरोबर राहण्याचे समाधान मिळत असल्याने प्रचंड शोषण होऊनही काही लग्नगडी करार संपण्यापूर्वी लग्न करून घेतात.

लग्नगड्यांचे मालक गड्यांच्या लग्नाचा खर्च करतात किंवा लग्नासाठी गड्याला पैसे देतात. मालकाने दिलेल्या पैशातून गडी आपले लग्न करतात. अशा प्रकारे मालक आणि गडी यांना जी पद्धत सोयीची वाटेल त्या पद्धतीचा अवलंब केला जातो. एका

लग्नगड्यास दोन वर्षांचे ४००० रूपये म्हणजे महिना १६७ रूपये मिळाले. दुसऱ्या एका लग्नगड्यास पाच वर्षांचे १००० रूपये व दोन पोती भात/साळ (अंदाजे ७०० रूपये किंमत) मिळाले. म्हणजे त्यास महिना २८ रूपये मिळाले. तिसऱ्या एका लग्नगड्यास ५ वर्षांचे २५०० रूपये व २ पोती भात/साळ (अंदाजे ७०० रूपये किंमत) मिळाले. या लग्नगड्यास महिना ५४ रूपये मालकाकडून मिळाले. अन्य एका लग्नगड्यास दोन वर्षांचे १२० रूपये म्हणजे महिना पाच रूपये मिळाले. आणि ज्याने करार मोडला त्याला सहा महिन्याचा काहीही आर्थिक मोबदला मिळाला नाही. लग्नगड्यांना अशा प्रकारे अत्यंत कमी मोबदला किंवा लग्नाचा खर्च दिला जातो. जरी आर्थिक मोबदला कमी मिळत असला तरी या मोबदल्यात आपले लग्न झाले आणि काही वर्षे मालकाकडे आपली राहण्या व जेवण्याची सोय झाली याचेच लग्नगड्यांना मोठे समाधान असते असे लग्नगड्यांशी झालेल्या चर्चेतून जाणवले.

लग्नगडी पद्धत वेठबिगारीसारखी असली तरी लग्नगड्यांना पत्नी निवडण्याचे स्वातंत्र्य असते, याबाबतीत मालक लग्नगड्यांची फसवणूक करीत नाहीत किंवा लग्नगड्यांवर दबाव आणत नाहीत.

**लग्नगड्यांना मिळणाऱ्या सवलती**

लग्नगड्यांना वर्षातून केवळ चार ते सहाच सुट्ट्या मिळतात. त्यापेक्षा जास्त दिवस सुट्टी घेतली तर तेवढे दिवस करार संपल्यानंतरही काम करावे लागते. दिवाळी, शिमगा अशा सणांना लग्नगड्यांना सुट्टी मिळते. लग्नगड्यांच्या जेवणाची सोय मालकच करतात. दिवसातून तीन वेळा जेवण दिले जाते. जेवणाचा दर्जा फारसा चांगला नसतो. कामावर असताना लग्नगडी आजारी पडला तर मालक खर्च करतात. परंतु आजार किरकोळ असेल तरच खर्च करतात. गंभीर आजार असेल किंवा आजाराचा खर्च जास्त येत असेल, गडी सतत आजारी पडत असेल तर मालक खर्च करत नाहीत. अशा गड्यांना घरी पाठवून दिले जाते. मालक चांगला असेल तरच सिनेमा किंवा तमाशा पाहण्यास परवानगी दिली जाते. वर्षातून दोन-तीनवेळा अशी परवानगी दिली जाते व त्यासाठी काही पैसे दिले जातात. वर्षातून एक ते दोन वेळा लग्नगड्यांना कपडे घेऊन दिले जातात. तसेच बिडी किंवा तंबाखूची सोयही केली जाते.

**समारोप**

लग्नगडी पद्धत ही वेठबिगारीसारखीच असून अशा प्रकारचे काम करणाऱ्या आदिवासी मजुरांना फारसे स्वातंत्र्य नसते. या पद्धतीने कामावर राहणे परवडत नसले तरी गरीबीमुळे व योग्य वयात लग्न व्हावे यासाठी असे काम करावे लागते. पूर्वीच्या तुलनेत आता आदिवासींची आर्थिक स्थिती सुधारत असल्याने लग्नाच्या बोलीवर गडी म्हणून कामावर राहणाऱ्यांचे प्रमाण खूप कमी झाले आहे. तरीसुद्धा प्रत्येक आदिवासी पाड्यावरील दोन ते चार किशोरवयीन मुले व तरूण आदिवासी लग्नगडी म्हणून काम करीत असल्याचे संबंधित पाड्यावरील आदिवासींनी मुलाखती दरम्यान निदर्शनास आणून दिले. आदिवासींची आर्थिक स्थिती जसजशी सुधारत जाईल तसतशी लग्नगडी पद्धत नामशेष होत जाईल. कारण या पद्धतीत लग्नगड्यांना गुलामाचेच जीवन जगावे लागते. आदिवासींनी सरकारच्या सामुदायिक विवाह योजनेस प्रतिसाद दिला तर त्यांना लग्नाच्या बोलीवर वर्षानुवर्षे गडी म्हणून राबावे लागणार नाही. कारण सामुदायिक विवाह योजना आदिवासींच्या फायद्याची असून विवाहाचा खर्च सरकारकडून केला जातो.

## घरजावई पद्धत

आदिवासी ज्याप्रमाणे लग्नाच्या बोलीवर गडी म्हणून काम करतात त्याप्रमाणे घरजावई म्हणूनही राहतात. लग्नाच्या बोलीवर गडी म्हणून आदिवासी आपल्या जमातीबरोबर बिगर आदिवासीकडेही राहतात. परंतु घरजावई म्हणून राहणारी आदिवासी व्यक्ती आपल्या जमातीतील लोकांकडेच राहते. अत्यंत गरीब परिस्थितीतील आदिवासी पुरूष आपले लग्न व्हावे यासाठी काही वर्षे घरजावई म्हणून राहतात. हे आदिवासी ज्यांच्याकडे घरजावई म्हणून राहतात त्यांना मुले सुद्धा असतात. तर काहींना केवळ मुली असतात मुले नसतात. साधारपणे ज्यांच्याकडे भरपूर शेती आहे असे आदिवासी आपल्या जमातीतील गरीब तरूणाला घरजावई म्हणून ठेवतात. घरजावई पद्धतीत तरूणाचे आई-वडील व काही नातेवाईक किंवा गावातील ज्येष्ठ आदिवासी जो घरजावई ठेवण्यास इच्छुक आहे अशा आदिवासी शेतकऱ्याकडे जातात आणि लेखी किंवा तोंडी बोलणी किंवा करार करतात. त्यामध्ये घरजावई म्हणून राहणाऱ्याने किती वर्षे भावी सासऱ्याकडे काम करावायचे? आणि लग्न केव्हा करणार? इ. बाबतची चर्चा होते.

घरजावई पद्धतीत लग्न पाच ते सात वर्षांनी किंवा करारात ठरलेल्या मुदतीप्रमाणे होते. या पद्धतीत संबंधित तरूण भावी सासऱ्याच्या घरीच राहतो. पण पाच ते सात वर्षे त्याला गड्यासारखी कामे करावी लागतात. गडी किंवा मजूर म्हणूनच त्याच्याकडे पाहिले जाते. जर प्रामाणिकपणे काम केले तरच घरजावई ठेवणारी व्यक्ती आपल्या मुलीशी संबंधित तरूणाचे लग्न लाऊन देते. तरूणाचे काम आणि वागणूक पाहून त्याला मुलगी द्यायची की नाही ते ठरवले जाते. घरजावई म्हणून राहिलेला तरूण जर योग्य वाटला नाही तर त्यास घालवून दिले जाते. त्याला मुलगी न देता कामाचा थोडाफार मोबदला दिला जातो. परंतु घरजावई म्हणून राहणारे सर्व तरूण गरीब असतात. त्यामुळे लग्न होईपर्यंत तरी  भावी सासऱ्याकडे ते चांगल्या प्रकारे राहतात.

अशा प्रकारे घरजावई पद्धत म्हणजे आपले लग्न व्हावे, आपल्याला बायको मिळावी यासाठी आपल्या जमातीतील व्यक्तींच्या घरची व शेतातील कामे लग्न होईपर्यंत गड्यासारखी करणे होय. लग्न झाल्यानंतर घरजावई म्हणून काम केलेले पुरूष आपल्या बायकोला घेऊन स्वतंत्रपणे संसार करतात किंवा स्वतंत्रपणे मजुरी करून जीवन जगतात. सासऱ्यांची इच्छा असेल व घरजावईची तयारी असेल तर काही घरजावई सासऱ्याकडेच राहतात. तर काही सासरे लग्न झाल्यानंतर घरजावयाला घराबाहेर काढतात. आपल्या शेतावर मजुरीला सुद्धा येऊ देत नाहीत. अशा प्रकारे शेकडो आदिवासी तरूणांनी विवाह केल्याचे आदिवासींनी मुलाखतीत सांगितले. आजही घरजावई प्रथा अस्तित्वात असून लग्नासाठी या पद्धतीने विवाह करणारे आदिवासी तरूण प्रत्येक पाड्यावर कमीत कमी १ ते २ या संख्येने आढळून येतात.


घरजावई म्हणून राहिलेल्यांना भावी सासऱ्यांकडे भरपूर व कष्टाची कामे करावी लागतात. भावी जावई म्हणून कामात सवलती दिल्या जात नाहीत. थोडक्यात लग्न होईपर्यंत भावी जावयात आणि गड्यात फरक मानला जात नाही. लग्न झाल्यानंतर बहुसंख्य तरूण स्वतंत्रच राहत असल्याने व स्वतंत्रपणे मजुरी करून उपजीविका करीत असल्याने सासऱ्याकडे गड्यासारखी वागणूक मिळण्याचा प्रश्न येत नाही. लग्नानंतर ज्यांना सासऱ्याकडे राहण्याचा प्रसंग येतो त्या तरूणांना पूर्वीप्रमाणेच सासऱ्यांच्या शेतावर राबावे लागते. पण

लग्नानंतर त्यांना विश्रांतीचा काळ अधिक मिळतो. किंवा लग्नानंतर कामातून काही सवलती मिळतात.

**समारोप**

गरीब आदिवासी तरूण आपले लग्न व्हावे यासाठी घरजावई म्हणून कामास राहतात. लग्नगडी पद्धती आणि घरजावई पद्धत यामध्ये काही बाबतीत सारखेपणा आहे. तर काही बाबतीत भिन्नता आहे. लग्नगड्यांना आणि घरजावयांना दोघांनाही पाच ते सात वर्षे राबावे लागते. परंतु लग्नगड्यांची पद्धत जेवढी वेठबिगारीसारखी वाटते तेवढी घरजावई पद्धत वाटत नाही. लग्नगड्यांना मालक आपली मुलगी देत नाही तर घरजावयांना आपली मुलगी देतो. घरजावई पद्धतीमुळे लग्न होत असले आणि बायको मिळत असली तरी घरजावई राहण्याचे प्रमाण आता खूपच कमी झाले आहे. कारण पाच ते सात वर्षे भावी सासऱ्याकडे काम करण्यापेक्षा परगावी जाऊन (स्थलांतर करून) दोन वर्षे काम केल्यास लग्नासाठी पैसे साठवता येतात. तसेच थोडे फार कर्ज घेऊन लग्न करता येते. त्यामुळे घरजावई म्हणून राहणे फायद्याचे वाटत नाही. जर सासऱ्याची शेतजमीन पुरेशा प्रमाणात मिळणार असेल तरच घरजावई म्हणून राहणे परवडते. परंतु काही सासरे केवळ लग्नाचा खर्च आणि मुलगीच देतात. घर किंवा शेती देत नाहीत. त्यामुळे घरजावई म्हणून राहणाऱ्या तरूणांचे प्रमाण कमी होत आहे.

• • •





(पृष्ठ १२ वरुन)

उदाहरणार्थ अत्यंत कमी दरडोई उत्पन्न, आर्थिक विषमता, स्वयंरोजगाराचे अत्यंत कमी प्रमाण, वेठबिगारी, जंगल व इतर नैसर्गिक साधन सामग्रीवरील ताण, बेरोजगारीचे मोठे प्रमाण, कमी बचत क्षमता इत्यादी.

**समारोप**

मोखाडा तालुका हा दुर्गम भागात मोडणारा तालुका असून येथील बहुसंख्य आदिवासींचे वास्तव्य जंगल आणि डोंगराळ भागात आहे. त्यांची घरे लहान व साधी असून घरातील मालमत्ता अत्यंत किरकोळ किंवा कमी मूल्याची आहे. बिगर आदिवासीपेक्षा त्यांची वेषभूषा वैशिष्ट्यपूर्ण आणि वेगळी आहे. बहुसंख्य आदिवासींना काही औषधी वनस्पतींचे ज्ञान असून किरकोळ आजारात ते घरगुती उपचार घेतात. तसेच दवाखान्याबरोबर ते भगताकडे सुद्धा जातात. दारू पिणे आणि लग्नासारख्या समारंभात नाच गाणी करणे त्यांना खूप आवडते. तालुक्यातील आदिवासींच्या अर्थव्यवस्थेची काही लक्षणे महत्वपूर्ण आहेत. उदाहरणार्थ कृषी आधारित अर्थव्यवस्था, साध्या पद्धतीची शेती, काही प्रमाणात वस्तुविनिमय पद्धतीचे अस्तित्व, शहरांचा अभाव, श्रमप्रधान उत्पादनतंत्र ही आदिवासींच्या अर्थव्यवस्थेची ठळक वैशिष्ट्ये आहेत.

• • •